म. ग्रं. सं. ठाणें
स. वा. वा.
क्र. ९८२५



दा० क्र० २४८५

-5 MAY 1977

11 MAY 1977

IRBK-0102585

IRBK-0102585

आ. वा.
७८३५
२-८-५

# मधुकुंज
आणि
# भयभीत

सुशील परभृत

म. ग्रं. सं. ठाणे, वाचनालय शाखा.
वा. क्र. २५५५ नों. दि ........
दि. ...... आ-वा ...... क्र. ......

परभृत प्रकाशन

पुणें

ऑक्टोबर १९४७

किंमत २॥ रु.

प्रकाशक
गं. गो. कुंटे, परभृत प्रकाशन
३५२ शनिवार पुणें २.

प्रथम मुद्रण

मुद्रक
गंगाधर शंकर दाते,
कलागृह छापखाना,
६६६ सदाशिव, पुणें नं. २.

कै० गुरुवर्य बागुल
यांच्या
पवित्र स्मृतीस

सुप्रसिद्ध जर्मन कलावंत थिओडोर डब्ल्यू. स्टॉर्म व
स्टीफन स्वाइग यांच्या Immensee आणि
Fear या उत्कृष्ट कथांचा अनुवाद.

# मधुकुंज .... ....

सूर्यास्त होऊन कांहीं वेळ झाला होता. सुव्यवस्थित पोषाक केलेली दीनानाथांची स्वारी, नेहमींप्रमाणें रस्त्याच्या उतारावरून आपल्या घराकडे वळली होती. बरेच दूरवर फिरून आल्यामुळें त्यांची पाऊलें धीमेपणानें पण मंद पडत होतीं. हातांतील चांदीच्या मुठीची काठी त्यांनीं आतां खाकेंत धरली होती, आणि तिच्याच बरोबर डोक्यावरून काढलेला पिवळसर रेशमी कोशा चुरगळून धरला होता. डोक्यावरील पिकून पांढरेशुभ्र झालेले त्यांचे केश, सायंकाळच्या त्या मंद वाऱ्याच्या झुळुकीनीं इतस्ततः उडत होते. चिरगत तारुण्याची अजूनहि निःसंदेह ग्वाही देणारे त्यांचे काळेभोर डोळे, समोरील देखाव्याकडे आणि मधूनच उजवीकडे खालीं पसरलेल्या नि आतां संधिप्रकाशांत धूसर दिसणाऱ्या कौलारांकडे, आणि मधूनच चमकणाऱ्या एकाद दुसऱ्या दिव्याकडे शांतपणें लागले होते. मधेंच भेटणाऱ्या एकाद्या परिचिताचा नमस्कार स्वीकारीत किंवा मंदस्मितानें एकाद्या बालकाकडे पहात, मूकपणें त्यांची पाऊलें पडत होतीं. गांवांतील लोकांशीं कांहीं ते तसे विशेष परिचित दिसत नव्हते. पण बहुतेक जाणारे येणारे त्यांच्या त्या शुभ्र केशांशी विरोधी दिसणाऱ्या काळयाभोर डोळयांकडे मात्र मोठ्या कौतुकानें पहात असत.

घरांची गर्दी आतां वाढूं लागली होती. एका मोठ्या घराच्या शोभिवंत देवडीसमोर येऊन ते उभे राहिले. समोर उतारावरून खाल दिसणाऱ्या त्या अस्पष्ट घरांकडे त्यांनीं परत एकवार एक दृष्टिक्षेप केल आणि देवडीवरील दाराच्या आंत पाऊल टाकलें. मालकांच्या पाऊलांचा आवाज ऐकून रामप्पा हातांत दिवा घेऊन बाहेर आला आणि तो ओटीवरील जिन्याकडे वळला. वास्तविक पाहतां त्याला थोडा आज उशीरच झाला होता. नाहींतर नेहमीं दीनानाथ बाहेरून घरांत येण्याचे आधींच माडीवरील दिवाणखान्यांत रामप्पा त्यांचा टेबललँप् लाऊन ठेवीत असे. कारण तशी त्याला मालकांची सक्त ताकीद होती. पण आज मात्र त्याला जरी उशीर झाला होता नि भीतीनें त्याचें हृदय धडधडत होतें, तरी दीनानाथांनीं त्याला आपल्या खाकेतील काठीनें खूण करून, 'अद्याप अवकाश आहे,' असें सांगून ते जिन्याकडे वळले.

दिवाणखान्याचें दार उघडेंच होतें. आंत डावीकडे पुस्तकांचें एक भलें मोठें कपाट नि त्याचेच पलीकडे एक लोखंडी अलमारी तशीच पुस्तकांनीं भरगच्च भरलेली दिसत होती. समोर मध्यभागीं एक मोठें गोलमेज आणि त्यावर टेबल पामची चकचकीत पितळी कुंडी दिसत होती. सभोंवार एक प्रशस्त मढवलेला कोच नि दोन तीन मऊ मढवलेल्या खुर्च्या पसरल्या होत्या. दीनानाथांनीं आंत जातांच हातां तील काठी व कोशा कोचावर टाकला आणि आंगातील कोट काढीत काढीत उजवे हाताकडील दारानें ते आपल्या शयनमंदिरांत शिरले.

खोली कांहीं तशी फारशी मोठी दिसत नव्हती. पण होती मात्र अतिशय सुबक नि टापटीपीची. उजवे हाताला पांढरीशुभ्र मच्छरदाणी लावलेला काळाभोर लांकडी पलंग, आणि त्याच्याच उशालगतच्या

भिंतीजवळ पुस्तकांची एक छोटी फिरती अलमारी; समोर डावे हाताच्या खिडकीजवळ एक छोटेखानी टेबल नि त्याच्याजवळेच एक आरामखुर्ची; असाच सुटसुटीत नि साधा होता आंतला बेत.

आंत आल्याबरोबर दीनानाथांनीं आंगांतला कोट खुर्चीच्या पाठील अडकवला आणि ते स्वस्थपणें पाय लांब करून खुर्चीत पसरले. तसेच विश्रांति घेत आज ते कांहींक्षण स्वस्थ बसले. बाहेर काळोख वाढला होता. पण थोड्याच वेळांत पूर्वा उजळूं लागून वद्यपक्षांतील तृतीयेचे चंद्रबिंब क्षितिजावरून डोकाऊं लागलें. सुधाकराचे ते सौम्य किरण एकामागून एक आतां सर्व खोलीभर स्वैरपणें पसरत होते, नि दीनानाथांचे डोळेहि अनाहूतपणें त्या प्रसन्न चंद्रकिरणांच्या मागून तसेच फिरत होते.

त्यांच्या समोरील ती फिकट निळया रंगाची भिंत आतां पूर्णपणें उजळली होती आणि त्यावरील साध्या पण सुबक अशा काळया चौकटीच्या एका चित्राकृतीवर, ते पिवळसर चंद्रकिरण स्थिरावले होते. 'लता!' प्रेमनिर्भर आवाजांत दीनानाथ अस्फुटपणें उद्गारले. भूतकाळांतील अनंत मधुरस्मृति त्यांच्या मनांत मग दरवळूं लागल्या; गत काळाचे जड पडदे क्षणार्धांत एकदम खालीं गळून पडले नि ओपन-कॉलरचा लांडया बाह्यांचा ट्विलचा पांढराशुभ्र शर्ट आणि निळी हाफ् पँट घातलेला छोटा दिना, त्यांच्या डोळयांसमोर नाचूं लागला.

## मधुर बाल्य

" मज वय विसरूं दे । मुग्धमधु बाल्यीं वितरूं दे ।
ते दिन सोन्याचे............" गोड आवाजांत आपल्याशींच

छोटा दिना गुणगुणत शर्टची बटणें लावीत होता.

'दिना, दिना! सुट्टी आहे आपल्याला आज!' हातानें टाळ्या पिटीत नि ओरडत एक सहासात वर्षांची अल्लड बालिका आंत आली. तिच्या मोहक गुलाबी गालांशी स्पर्धा करणारा गुलाबी रेशमी फ्रॉक् तिनें आंगांत घातला होता नि तिचे काळेभोर मखमली कुरळकेश, डोक्यावरील रुंद गुलाबी फितीच्या बाहेर स्वच्छंदानें बागडत होते.

'आज सबंध दिवस नि उद्यांसुद्धां; बरं कां रे, दिना! गंमत आहे नाहीं रे मोठी!' त्याचें बोट पकडून ती सांगत होती.

आनंदानें एक उडी मारून दिनानें आपली बॅग् कॉटवर भिर कावली नि लताचा हात पकडून नाचत ओरडत खोलींतून मागील अंगणापलीकडील बागेंत तो पळत गेला. पिंजऱ्यांतून बाहेर पडलेल्या स्वच्छंदी पाखरांप्रमाणें तीं दोन्ही बालकें मग पाटाच्या पाण्याजवळ कांहीं वेळ बागडत होतीं.

तोंडानें हळु हळु शीळ घालीत दिनाची स्वारी मग गोड जांबाच्या झाडाजवळ तो बांधीत असलेल्या विटांच्या घराजवळ येऊन उभी राहिली. लाकडाच्या पेटीचा सांचा करून त्यानें आपल्या विटा तयार केल्या होत्या, आणि चिंतू मेस्तरीजवळ लाडीगोडी लाऊन त्यानें आपल्या त्या छोटेखानी घराचें लांकूड सामान तयार केलें होतें. घराचें आढें ठोकण्यापर्यंत त्याचें तें घर बहुतेक तयार झालें होतें. एकाद्या इंजिनियराच्या ऐटीनें दिना आतां आपल्या त्या हस्तकौशल्याकडे पहात उभा होता. आणि जरा वेळानें समाधानानें आपली मान एकवार हलवून त्यानें खालीं बैठक मारून कामाला सुरुवात केली. त्याला तसा आपल्या कामांत गुंग झालेला पाहून लता

जराशी फुरंगटून, पाटाच्या बाजू बाजूनें हालत डोलत खालीं हिरव्या-गार गवतावर उमलत असलेल्या इवलाल्या रानफुलांनीं आपले चिमुकले खिसे भरीत चालली होती. आपल्याच नादांत फिरत फिरत ती दिना-पासून आतां कितीतरी दूर आली होती. सूर्याचे कोवळे किरण तिच्या आवतीं भोंवतीं नाचत बागडत होते. रंगीबेरंगी फुलपाखरें वाऱ्यावर इकडून तिकडे भिरभिरत होतीं, आणि बागेंत खेळत असलेला त्यांचा नाभ्या त्या चिमण्या पाखरांमागून उडया मारीत भुंकत धांवत होता.

'लता!' दिना हांक मारीत होता. 'लता! इकडे बघ, झालं हें आढं तयार. अग इकडे ये लौकर!'

'आलें रे आलें!' लताची स्वारी धांवत धांवत येत उद्गारली. तिचे गाल आतां अधिकच लाल झाले होते. 'बघुं दिना बघुं! अय्या! किती छान छान झालं आहें नाहीं रे दिना?' धापा टाकीत ती म्हणाली.

'खरंच लता!' आनंदानें दिना म्हणाला. 'पण दमली आहेस किती तूं लता. एवढं का धावायचं? ये, इकडे ये बसूं आपण पाटांत पाय सोडून; नि मग तुला मी एक गोष्ट सांगेन हं लता!'

हातांत हात घालून तीं दोन्ही बालकें मग पाटाच्या त्या निर्मळ गार पाण्यांत पाय सोडून बसलीं. दिनानें तोंडावरून त्या थंडगार पाण्याचा हात फिरविला नि पाण्यांत पाय हालवीत गोष्ट सांगण्यास सुरुवात केली.

'एकदां कनी, एक होता राजा नि त्याला होत्या दोन राण्या—'

'एहे रे! सद्दा न कदा तीच गोष्ट!' आपली मान वेळावीत लता म्हणाली. खिशांतील गोळा केलेलीं तीं रंगीबेरंगी रानफुलें हळु हळु

पाण्यांत सोडीत नि त्या चिमुकल्यांच्या जलप्रवासाकडे गंमतीनें पहात ती बसली होती. 'मला नको ती गोष्ट. पाठ झाली आहे बघ माझी ती. दाखवूं म्हणून ?'

'बरं बुवा! ती नको तर दुसरी. आपल्याजवळ काय तोटा!' दिना म्हणाला, आणि त्यानें मग सिंहाच्या गुहेंत अडकलेल्या किरा- ताची गोष्ट सांगण्यास सुरुवात केली. कालच त्यानें आपल्या फेअरी टेल्सच्या पुस्तकांत ती वाचली होती.

—'आणि आतां रात्र पडली; बरं का लता!' तो म्हणाला. 'अगदीं काळीकुट्ट रात्र पडली आणि ते सारे सिंह झोंपी गेले. पण मधूनच ते आपले अक्राळविक्राळ जबडे उघडून जांभया देत आणि आपल्या तांबड्या चुटुक जिभांनीं ओठ चाटीत. भयानें थरकांप होई मग त्या किराताचा नि त्याला वाटे कीं आतां उजाडतं केव्हां. पण इतक्यांत त्या गुहेंत चकचकीत प्रकाश पडला आणि त्यानें दचकून वर पाहिलें. त्याच्या समोर सोन्याचा झगझगीत पोषाक केलेला एक यक्ष उभा होता. त्या यक्षानें त्याला आपल्या हातानें खूण केली आणि समोरील खडकांत तो शिरला. आणि काय गंमत, दार उघडल्यासारखी खडकांतली ती चीर आतां उघडली होती.'—

लता आपला हस्तव्यापार थांबवून दिनाकडे पहात लक्षपूर्वक ऐकत होती. 'यक्ष?' ती एकदम म्हणाली. 'खरेच असतात का रे असल यक्ष?'

'अग, गोष्ट आहे ही वेडे!' दिना म्हणाला. 'खरेखुरे नसतात कांहीं यक्ष; समजलं का?'

'चल चल! मला फसवतोस काय!' त्याच्याकडे टक लाऊन पहात लता म्हणाली.

त्यानें थोडं चिडून तिच्याकडे पाहिलें. पण लाडिकपणें त्याचा हात धरून तिनें परत विचारलें, ' मग असं कां रे म्हणतात सारीजणं ? आजी, आजोबा नि बाबांनीं दिलेल्या त्या पुस्तकांतसुद्धां आहे तसं !'

'मला नाहीं माहीत !' तो म्हणाला.

'आणि सिंह पण नसतात का रे खरेखुरे ?' तिनें परत विचारलें.

'सिंह ? सिंह असतात तर ! राणीच्या बागेत पाहिले आहेत मी. आणि तिकडे काठेवाडाकडे कुठे आहेत म्हणतात. आमचे भूगोलाचे सर सांगत होते. मी जाणार आहे मोठा झालों म्हणजे तिकडे, त्या गिरनार पर्वतावर. काय मजा असेल नाहीं तिकडे ? तू येशील का ग लता, माझ्या बरोबरं; येशील ?'

'अरे हो ! येईन कीं.' लता म्हणाली. 'पण आईला मात्र न्यायची हं आपल्या बरोबर; नि तुझ्या पण.'

'छट्, त्यानां नाहीं बुवा !' दिना म्हणाला, 'म्हाताऱ्या होतील त्या किती तरी त्या वेळीं.'

'पण मग मी एकटी कशी रे येऊं ?'

'अग एकटी कशानें ? मी आहे कीं तुझ्या बरोबर.' दिना म्हणाला. 'आपलं लग्न नाहीं का होईल त्या वेळीं ? मग कशाला पाहिजे दुसरं कोणी ?'

'पण आई रडेल कीं रे दिना !'

'अग पण, आपण कांहीं अगद नाहीं राह्यचं तिकडे !' आवेशानें दिना म्हणाला. 'तूं येणार कीं नाहीं, सरळ सांग पाहूं ? अगदीं एकटी माझ्या बरोबर ? नसलीस, तर एकटाच जाईन मी, आणि कध्धीं कध्धीं परत येणार नाहीं मग !'

लता आतां अगदीं रडण्याच्या बेतांत आली होती. ‘ असा रे काय रागावतोस गडे दिना, ’ ती म्हणाली; ‘ येईन मी तुझ्या बरोबर, मग झालं ? ’

‘ ओहो ! गंमत, गंमत ! लता नि दिना, लता नि दिना ! ’ तिचा हात धरून आपल्या आंगाभोंवतीं गिरगिरत ओरडत दिना म्हणाला. तिच्या डोक्यावरील रिबन आतां उडून गेली होती आणि तिचे ते मऊ मखमली कुरळे केश, मोराच्या छोट्या पिसाऱ्यासारखे त्या सोनेरी प्रकाशांत मुक्तबंध नाचत होते. जरा वेळानें त्यानें तिला हळूच खालीं बसवली नि कमरेवर हात टेकून तिच्याकडे गंभीरपणें पहात तो म्हणाला:

‘ अंहं ! तोंडापुरतं बोललीस तूं, मला माहीत आहे. भित्री तूं; तुझ्यानें नाहीं जमायचं तें ! ’

—‘ लता ! दिना ! ’ त्यांना कोणीतरी हांक मारीत होतें. ‘ आलों ग ! ’ त्यांनीं आरोळी दिली, नि हातांत हात घालून तीं पळतच घराकडे गेलीं.

## पहाडेश्वर

मुग्धबाल्याच्या निरागस छायेंत तीं बालकें अशीं स्वच्छंद खेळत बागडत वाढत होतीं. दिनाला लता नेहमीं अतिशय शांत नि थंड वाटे, आणि तिलाहि तो भारी हट्टी नि हूड वाटे. पण तरीहि त्यांचं चांगलंच मेतकूट जमत असे. दोघांचाहि खेळण्याचा नि रिकामपणचा वेळ एकमेकांच्या संगतींतच जायचा. घरांत किंवा बाहेर तिकडे पाटाच्या पाण्यावर नि बाग मळ्यांत ही पाखरांची जोडी जेव्हां पहावी तेव्हां आपली नेहमीं एकत्र रमत गमत असायची.

एक दिवस तर मास्तर वर्गांत लतेवर ओरडले म्हणून तिकडे दिनानें आपली पाटी जोरानें मास्तरांना राग येण्यासाठीं म्हणून बांकावर आपटली. पण त्याचा कांहींच उपयोग झाला नाहीं नि त्याला आपल्याशींच चुळबुळत स्वस्थ बसावं लागलं.

भूगोलाचे शिक्षक होते ते. म्हणून दिनानें यापुढें त्यांच्या तासाला लक्षच न देण्याचं ठरविलं आणि मागल्या बांकावर बसून त्यानें आपला राग एका छोटेखानी कवितेंत व्यक्त केला. त्यांत त्यानें त्या मास्तरांना माजलेला रेडा बनविलें होतें, लतेकडे हरिण बालिकेची भूमिका दिली होती नि तो स्वतः उमदा काळवीट बनला होता. आपल्या अचपळ पायांच्या जोरावर त्या रेड्याभोंवती भिंगरीसारखा फिरत आपल्या अणकुचीदार शिंगानीं तो त्या रेड्याला घायाळ करणार होता. असा घेतला होता त्यानें आपला काव्यमय सूड.

त्या छोट्या कविराजांचें हृदय भावनांनीं इतकें भारावलें होतें कीं त्यांच्या डोळ्यांत लिहितां लिहितांच सहानुभूतीचे व रागाचे अश्रू उभे राहिले होते. पण आपल्या स्वतःचा त्याला आतां मोठा अभिमान वाटत होता. घरीं गेल्याबरोबर त्यानें एक मोठी बांधीव चोपडी पैदा केली आणि त्यांतील शेवटल्या कोऱ्या पानांवर आपलं हें नवकाव्य मोठ्या डौलांत लिहून काढलं. किती समाधान वाटलं त्याला !

त्यानें आतां शाळा बदलली. फक्त मुलांचीच शाळा होती ती. आपल्या वयाचे पुष्कळच खेळगडी दिनानें तेथें पैदा केले. पण लताची नि त्याची मैत्री मात्र तिळभरहि कमी झाली नाहीं. अजूनहि त्यांची जोडी पूर्वीं सारखीच पाटाच्या पाण्यांत खेळत किंवा बाग मळ्यांत नाचत बागडत असतांना साऱ्यांना दिसायची. त्यानें सांगितलेल्या त्या

लतेच्या अतिशय आवडत्या गोष्टी त्यानें आतां आपल्या चोपडींत नीट लिहून काढण्यास सुरुवात केली होती. लिहितां लिहितां त्याची प्रतिभाहि आपल्या चिमण्या पंखांच्या जोरावर भराऱ्या मारायला निघायची. पण कांहीं केल्या त्याला अद्याप तें जमत मात्र नव्हतें, जणुंकाय बाल मनांतील त्या तरल कल्पना, शब्दांच्या जडबंधनांत स्वतःला जखडून घ्यायला नाखूष असत नि त्या स्वप्नमय यक्षभूमींत स्वच्छंद मूकविहार करणेंच त्यांना अधिक मानवे.

सोडून दिला त्यानेंहि मग तो नाद. आणि त्याच्या कानांवर त्या गोष्टी जशा आल्या होत्या किंवा त्यानें त्या जशा वाचल्या होत्या, तशाच त्यानें त्या अगदीं प्रामाणिकपणें लिहून काढल्या. किती अभिमान वाटला लतेला, त्यानें ती चोपडी तिला दिली तेव्हां. अगदीं नीट काळजीपूर्वक तिनें ती चोपडी आपल्या पेटींत ठेऊन दिली. आणि असा संध्याकाळच्या वेळीं तो तिच्याकडे आला कीं ती मग ती चोपडी बाहेर काढी आणि आपल्या आईच्या जवळ बसून त्या ती तिला वाचून दाखवी. आनंदानें नि अभिमानानें फुलून जाई दिनाचें हृदय त्यावेळीं.

—बघतां बघतां सात वर्षें लोटलीं. दिना आतां हायस्कुलांत जाण्यासाठीं दूरच्या गांवीं जायला निघाला होता. त्याच्याशिवाय आपल्याला आतां चैन तरी कसं पडेल याची लताला अतिशय हुरहुर लागली होती. एक क्षणसुद्धां म्हणून त्याला ती विसंबायला तयार नव्हती. नाना तऱ्हेनें त्याच्याशीं ती एकसारखी बोलत राही. परत लौकर ऐकायला न मिळणारे त्याचे शब्दच जणु, काय ती आपल्या हृदयसंपुटांत सांठवून

ठेवीत होती. हरताळकांचं आवरणच जसं कांहीं! आणि लता अशी त्याच्या भोंवतीं एकसारखी चिव चिवत भिरभिरत राहिली कीं दिनालाहि मूठभर मांस चढे. किती गोड आहे नाहीं आपली लता, तो म्हणे. आणि त्यानेंहि मग एक दिवस खुशींत येऊन तिला नेहमींसारख्यां गोष्टी लिहून पाठवायचं कबूल केलं. 'पण तू मात्र कळवलं पाहिजेस हं लता, तुला किती आवडल्या गोष्टी त्या. नाहीं तर बघ, फू गट्टी करीन एका माणसाची!' त्यानें तिला सांगितलें होतें.

हळुहळू त्याचा निघण्याचा दिवस जवळ येऊन ठेपला. पण त्या मधल्या काळांत दिनाची काव्यप्रतिभा कांहीं स्वस्थ बसली नव्हती. अनेक छोट्या मोठ्या काव्यांची त्याच्या चोपडींत भर पडतच होती. त्याचें लतेवरील निरागस अथांग प्रेम त्याच्या त्या चिमुकल्या काव्यांत जसें दुथडी भरून वहात होतें. पण लतेपासून मात्र त्यानें आपलें हें गुपित गुप्तच ठेवलें होतें. लताच त्याची काव्यदेवता होती नि तिच्याच सुभग पायांवर त्यानें आपलीं काव्यसुमनें, बाल्यांतील उत्कट भावभक्तीनें वाहिलीं होतीं.

आतां जून उजाडला आणि दिनाच्या प्रयाणाचा दिवस दोन दिवसांवर येऊन ठेपला. आणखी एकादा दिवस तरी दिनाच्या संगतींत खूपखूप गंमत करायला मिळावी म्हणून लतानें मग पहाडेश्वरला जाण्याचा बेत ठरवला. आपल्या आईच्या नि दिवाणजींच्या संमतीनें तिनें सर्व कार्यक्रम ठरवून आपल्या मित्र मैत्रिणींना आमंत्रणें पण दिलीं. किती आनंद वाटत होता तिला आपल्या बेताला आईनें संमती दिली म्हणून. किती चांगली आहे नाहीं आपली आई, ती म्हणत होती. रात्रभर तिला मग दुसरे दिवशींची स्वप्नें पडत होतीं. कारण आतां कांहीं



अनुक्रम ......
विभाग ......

दिवस तिच्या जवळून दूर जाणाऱ्या तिच्या दिनाच्या संगतींत सर्व दिवसभर उद्यां वागडणार होती ना ती ?

—निघाल्यापासून एका तासाभरांतच त्यांच्या गाड्या पहाडेश्वराच्या पायथ्याशीं जाऊन पोंचल्या. मागील बाजूला बसलेल्या दिनालतांनीं एकदमच गाडीखालीं उडी टाकली, आणि पायांतल्या चपला सरसाऊन सर्वांच्या पुढें चालण्यास त्यांनीं सुरवातहि केली. दिवस जरी चांगला उजाडला होता तरी पायथ्याजवळच्या रस्त्यावर ऊन मात्र अजून पडलें नव्हतें. आणि डोक्यावर तर उंच उंच वृक्षवेलींनीं सुंदर छतच उभारलें होतें. वाट चांगली मळलेली असल्यामुळें सभोंवार दृष्टिक्षेप करीत नि शेजारच्याच झाडींत आलापत असलेल्या कोकीळाला वेडावीत हंसत खिदळत तीं पुढें जात होतीं. एकमेकांच्या सुखद संगतींत त्यांना चढण्याचे श्रम मुळींच वाटत नव्हते. पण दिनाच्या लतेचे गाल मात्र, क्षणक्षणाला शेजारच्या झाडांवरील कोकंबांसारखे, अधिकाधिक लाल होत चालले होते; नि कपाळावरील कुंतलाग्रांच्या सभोंवार घर्मबिंदूंची मुक्तावली अधिकच प्रस्फुट होत होती. दिनाच्या हातांतील रुमालहि आतां जास्तच चुळबूळ करूं लागला होता. पण तरीहि आपली चाल मंदावण्याचें कोणाच्याच मनांत येत नव्हतें.

चढणीच्या मध्यावर आतां तीं येऊन पोंचलीं होतीं. उजवे बाजूकडील दरींत मंद्र आवाजांत घुमत असलेलें पहाडेश्वराच्या धोधाऱ्याचें पांढरें शुभ्र फेसाळ पाणी, आतां त्यांच्या दृष्टीच्या टप्प्यांत आलें होतें नि आतां तीं चढणीचीं दोन वळणें ओलांडलीं, कीं पहाडेश्वर. त्यांनीं मग आनंदानें मागून येत असलेल्या आपल्या दोस्तांना इशारतीची आरोळी

दिली. खालून आलेल्या प्रत्युत्तराच्या आरोळीचा प्रतिध्वनि त्यांच्या आसमंतांत दुमदुमला आणि त्या आवाजानें दचकून समोरच्या आंब्याच्या फांदीवरील सूर्यस्नान करणाऱ्या पाखरांची जोडी किलबिलाट करीत जोरानें उडून गेली.

सर्वच जण आतां पहाडेश्वराजवळील छोट्या आंगणांत येऊन पोंचले होते. लताची आई नि त्यांचे दिवाणजी गडयानीं आणलेल्या सामा-नांतील फराळाच्या डब्यांची झांकणें उघडून सर्वांच्या छोट्या हजेरीची व्यवस्था पहात होतीं. गडयानीं आणलेलीं पळसाचीं पानें घेऊन दिवाणजींच्या सभोंवती सर्वांनीं घाईघाईनें वेढा घातला. त्यांच्या हाता-तोंडाच्या लढाईस सुरुवात झालेली पाहून माईसाहेब तिकडे देवळाकडे गेल्या.

‘ माधव, दिना, अहो ताई ! इकडे पहा जरा. ’ देवळांत माई-साहेबानीं केलेला घंटानाद ऐकल्यानंतर, दिवाणजी बोलत होते. ‘ ऐकता ना रे सर्वजण ? आज झाली आहे थोडी गंमत. श्रीखंडाचा डबा कांही घर्मानें आणला नाहीं. म्हणून झाली आहे पंचाईत. तेव्हां तुम्ही जर सर्वांनीं मनावर घेतलंत, तर जमेल. नाहींतर पुऱ्या नुसत्या कोरडयाच खाव्या लागतील बघा. करवंदं नि आंबे पुष्कळ आहेत इकडे वर. चांगले मोठे आंबे नि मोठमोठीं करवंदं जर गोळा करून आणलींत, तर झकास लोणचं आणि गुळांबा करतां येईल बघा आपल्याला. पहा बोवा ! ’

‘ अहो त्यांत काय दिवाणजी, आंब्यांना गेलाय तोटा ! ’ सर्वजण ओरडले.

‘ हॉ ! तोटा नाहीं गेला. पण माल कसा सुरेख, अगदीं नंबरी

पाहिजे ! बारीक सारीक कचरा नाहीं चालायचा हं. पण आम्ही मात्र कांहीं नाहीं करणार हां ! खूप भटकलों आहोंत आम्ही तुमच्या एवढे होतों तेव्हां; बरं का दिना. तुम्ही येईपर्यंत भात आमटी मात्र ठेऊं तयार तुमच्यासाठीं; तें वेगळं. पळा आतां सारे. पण लबाडी नाहीं करायची हं कुणी, माधव !' एकमेकांत डोळे मिचकावीत असलेल्या माधव शरदकडे पाहून दिवाणजी म्हणाले. 'हं चला पळा. पाहूं कोण कामगिरी चांगली करतं तें.'

'चल लता, आपण जाऊं या दोघं वर.' दिना म्हणाला. 'मला माहीत आहे तें केळ्या आंब्याचं झाड नि करवंदं पण आहेत तिकडे चांगलीं झकास. किती हवीं आहेत दिवाणजींना म्हणावं !'

'ही बघ पिशवी घेऊन तय्यारच आहे मीं !' हातांतील पिशवी हलवीत नि पदर सरसावीत लता म्हणाली.

मोठ्या उल्हासानें वर तळ्याच्या बाजूकडे दाट झाडींत तीं शिरत होतीं. सभोंवार एक प्रकारचें निःस्तब्ध शांत वातावरण पसरलें होतें. मधूनच आलापत असलेल्या कोकीलाच्या आवाजाशिवाय कसलाच आवाज त्यांच्या कानांवर येत नव्हता. वर आकाशांत उंच भरारत असलेल्या घारींचा किर्र असा आवाजहि मधूनच कानांवर येई नि परत सर्व कांहीं शांत होई. पहाडेश्वराच्या धोधाट्याचा आवाजहि त्यांच्या कानावर आतां लांब दुरून मंदपणें येत होता आणि समोरील झाडी पण आतां वाढत चालली होती. दिना पुढें होऊन हातांतील काठीनें लतेसाठीं वाट मोकळी करीत चालला होता. तरीहि आपल्याच नादांत तो पुढे जात असल्यानें लता आतां मागें पडली होती. तिनें मारलेल्या हांकेनें दचकूनच त्यानें थांबून मागें पाहिलें.

'दिना, थांब कीं रे जरा!' लता ओरडत होती. 'हा पदर बघ मेला कसा अडकला आहे तो!'

त्याला ती दिसत नव्हती. तो दोनतीन पाऊलें झपाट्यानें मागें वळला. पांच दहा पाऊलामागेंच रानजाईच्या त्या वेलीच्या आडून तिची मूर्ती त्याला दिसली. रानजाईच्या पानाफुलांचें सुंदर मखरच जणुं काय तिच्या भोंवतीं उभारलेलें दिसत होतें. आणि तिथें काट्याला अडकलेल्या आपल्या पदराशीं ती झटापट करीत होती. त्यानें पुढें होऊन तिचा पदर सोडविला नि हळूच तिचा हात पकडून त्यानें तिला मोकळ्या जागेवर आणली. तिचे केस थोडे विसकटले होते नि केलेल्या झटापटीनें नि चालण्याच्या श्रमानें तिच्या गौरमुखावर आरक्त छटा चिनटली होती. किती गोड दिसत होती ती त्या वेळीं. मुग्ध मोहक वनदेवीच जशी कांहीं! आपल्या त्या बालमैत्रिणीकडे भारावल्या सारखा तो कांहीं वेळ पहात होता.

'पण तुझा तो केळश आंबा कुठे आहे रे दिना?' एक दीर्घश्वास घेऊन लतेनें विचारलें. 'नि करवंदांचा तर पत्ताच नाहीं कुठें!'

'अग इथेच आहे बघ कुठे तरी तो.' भानावर येऊन तो म्हणाला. 'पण हे वनचे राजे आहेत ना, संचार करायला जिकडे तिकडे!'

'हो गडे! त्यांचंच असायचं काम हें,' लता मान हलवीत म्हणाली. 'चल, पुढें जाऊं चल आपण आणखी. मी कांहीं दमलें नाहीं अजून, चल.'

पहाडेश्वरा पलीकडील खडकावरून खालीं दरींत उडी घेणाऱ्या गिरिप्रपाताच्या चिमुकल्या ओघाजवळ तीं आतां येऊन पोंचलीं होतीं. त्याच्या त्या थंडगार पाण्यांतून पलीकडे जातांना किती मौज वाटत

होती दोघांना. पण आषाढ श्रावणाच्या महिन्यांत किती रौद्र होत असेल याचें स्वरूप नाहीं ? त्यांच्या मनांत येत होतें. त्या कल्पनेनेंच लतेचें आंग थरारलें आणि ती अभावितपणेंच दिनाचा हात घट्ट पकडून त्याला चिकटून चालूं लागली.

थोडयाच वेळांत गर्दझाडी मागें पडून उघडया मोकळया रुंद पट्टयावर तीं आतां येऊन पोंचलीं होतीं. रानफुलांचा उन्मत्त तिक्त मधुर मिश्र सुगंध हवेंत दरवळत होता. त्या उन्मत्त सुगंधानें धुंद-कारल्या सारखीच आपल्या पातळ आरक्त नाकपुडया फुलवीत लता त्या सुगंधाचें सेवन करीत होती. 'किती गोड, गोड आहे नाहीं रे वास दिना !' ती म्हणाली.

'अहो पण बाईसाहेब, आपल्याला आंबे बघायचे आहेत ना !' तिच्या खांद्याला हलवीत दिना म्हणाला.

'इश्श ! खरंच की !' भानावर येऊन लता उद्गारली.

पण त्यांच्या त्या साऱ्या भ्रमंतींत मनासारखे आंबे कांहीं त्यांना कुठेंच मिळाले नाहींत. सूर्यहि आतां डोक्यावर येऊन पोंचला होता, आणि इतका वेळ झाडींतून चिवचिवाट करीत हिंडत असलेले ते असंख्य चिमणे जीवहि आतां जणुं काय वृक्षवेलींच्यावर माध्यान्हीची विश्रांती मूकपणें घेत होते. निसर्गाचें असें एकांत निःस्तब्ध वातावरण चहूंकडे अखंड पसरलें होतें.

'किती शांत आहे नाहीं रे इथें !' लता म्हणाली. 'कसलाच आवाज कुठें येत नाहीं बघ. पण अगदीं कुणीच कसे आले नाहींत इकडे, नाहीं ?'

दिनाला नकोच होतं कुणी यायला तिकडे. कसल्यातरी आपल्याच उन्मादांत तो गुंग होता.

'थांब हं पण,' आपला हात वर करीत दिना म्हणाला, 'वारा कुठून वहातो आहे?' पण वाऱ्याची चुकली माकली झुळूकहि कुठें फिरकत नव्हती.

'तो बघ दिना,' लता म्हणाली, 'कुणाचा तरी आवाज ऐकलासा वाटला मला. हो! वसूचाच शब्द तो. मोठ्यानें हांक मार तिकडे.'

दिनानें तोंडाजवळ हात घेऊन मोठ्यानें आरोळी दिली. 'इकडे, इकडे माधऽऽव!'

पण 'माधऽऽव' असा फक्त प्रतिध्वनीच त्यांच्या आसमंतांत घुमला, आणि दुसरा कसलाच आवाज त्यांच्या कानांवर आला नाहीं.

'आतां रे दिना?' त्याचा हात घट्ट पकडून लता म्हणाली.

'अहाहा, वेडाबाई! एवढं भ्यायला काय झालं? आत्तां सांपडतील आपल्याला कोणी तरी. जरा स्वस्थ बसूं या आपण इथे.'

एका मोठ्या थोरल्या बकुळीच्या सांवलीत, कुठून कसला आवाज येतो का ऐकत लता बसली होती. तिच्या समोरच पडलेल्या एका ओंडक्यावर बसून दिना स्वस्थपणें तिच्या त्या किंचित् बावरलेल्या चेहेऱ्याकडे पहात होता. सभोंवार शांततेचें साम्राज्य तसेंच पसरलें होतें. फुलांफुलांवरून हिंडणाऱ्या भुंग्यांचा गुं गुं असा आवाज मात्र तंबोऱ्याच्या सांद्र स्वरासारखा झंकारत होता, आणि दुरून कुठून तरी झाडाच्या फांदीवर होणारा सुतार पक्षाच्या चोंचीचा आघात त्याला मधूनच ठेका देत होता.

'तो बघ, ऐक!' एकदम मान वळवून लता ओरडली. 'घंटेचा आवाज येतो आहे बघ.'

'कुठे ग?' दिनानें विचारलें.

'हा बघ इकडून. आला ऐकूं ? होय, घंटेचाच आवाज आहे हा नक्की.' एकदम उठून लता म्हणाली.

'हं ! आला हं आतां.' एक क्षणभर तिनें दाखविलेल्या दिशेनें ऐकत दिना म्हणाला. 'आतां ग काय, अगदीं सोंपं काम. आत्तां गाठूं आपण सगळ्यांना बघ; चल.'

केळ्या आंबा नि करवंदें आतां झाडावरच राहिलीं. पण दोघांचेंहि आतां तिकडे लक्ष नव्हतें. लौकर इतरांना गांठून पोटपूजा करण्याकडेच त्यांचे लक्ष आतां काय तें एकवटलें होतें. स्वतःचा थकवा विसरून लता नि तिच्या मागोमाग दिना अशीं झपाट्यानें उतारावरून खालीं पहाडेश्वराच्या देवळाच्या दिशेनें चाललीं होतीं. इतक्यांत जवळूनच मुलांचा गलका त्यांच्या कानांवर आला आणि तीं देवळाच्या मागून पुढील आंगणांत उतरलीं.

तिकडे आंगणांत साऱ्यांची एकच कुलबुल चालली होती. मसाल्याच्या भाजीचा खमंग वास चहूंकडे सुटला होता आणि दिवाणजी हंसतमुखानें पत्रावळी मांडीत होते. भांड्यांत लोणचेंहि तयार दिसत होतें नि काळ्याभोर पिकल्या करवंदांचे दोन तीन द्रोणहि त्याच्याजवळच मांडी ठोकून बसले होते. लतादिनाला येतांना पाहून साऱ्यांनीं एकच गिल्ला केला. 'हे आले पहा चुकले फकीर !'

'मशीदींत; अं हं देवळांत !' दिनानें वाक्यपूर्ती केली.

'घटका गेली पळें गेलीं, तास वाजे झणाणा। भोजनाची वेळ झाली, कपडे कांहो काढाना ? ॥' दिवाणजी मिस्किलपणें त्यांच्याकडे पहात म्हणाले. 'इकडून, इकडून ताईसाहेब ! अशा इकडून. हं ! आतां तुमची ती पिशवी ओता पाहूं आमच्या समोर. पाहूं काय आणलं आहे तुम्ही तें.'

'फक्त खणखणीत तहान नि भूक आणली आहे बुवा!' आपल्या पोटाकडे बोट दाखवीत दिना म्हणाला.

'भले महाराज!' दिवाणजी उद्गारले. 'पण आपला करार माहीत आहे ना? हं; वशिला नाहीं हं चालायचा आतां ताईसाहेब!'

'बरं बुवा! आपण आपली भाजीपुरीच खाऊं.' दिना उद्गारला.

'हरहर महादेव'च्या गर्जनेंत नि कांहींच्या 'यंतु नदयो'च्या बडबडण्यांत पंगत सुरू झाली. आणि तिकडे जवळच्या अशोकाच्या झाडावरुन कोकीळानेंहि पंचम स्वरांत आपली सनई चालू केली. —

दिवाणजींच्या सांगीप्रमाणें दिनाला आज आंबे कांहीं मिळाले नव्हते. पण कांहीं अननुभूत आनंद मात्र त्याच्या अंतःकरणाच्या गाभाऱ्यांत गंभीरपणें हुंकारत होता. त्या हुंकाराच्या प्रतिध्वनीनें त्याचें मनोमंदिर दुमदुमत होतें, मधुर कल्पना डोळ्यासमोर नाचत होत्या नि त्याची शब्दसृष्टि त्या रात्रीच्या प्रशांत वातावरणांत कागदावर प्रसन्नपणें विहरत होती.

## कर्णीं ये मृदु साद

मकरसंक्रांत होती त्या दिवशीं. दुपारीं झालेल्या जाड्डयावर त्यानें चांगली सणसणीत झोंपहि ताणल्यामुळें दिनाच्या आंगांत चांगलाच आळस भरला होता. म्हणून डोक्यावर टोपी चढवून कोपऱ्यावरील इराण्याकडे चहा घेण्यासाठीं तो बाहेर पडला. रस्त्यावरील दारासमोर असलेल्या आपल्या नेहमींच्या टेबलाजवळ हॉटेलमधील बॉयला चहाची ऑर्डर देऊन तो बसला. सुटीचा दिवस असल्यामुळें असेल कदाचित, पण दुकानांत फारसें कुणी दिसत नव्हतें. आणि काउंटरवरील तो लाल-

बुंद इराणी नि दुसरा एक नोकर खांद्यावर रुमाल टाकून रस्त्याकडे पहात खांबाला टेकून उभा होता.

दिनानें दिलेल्या ऑर्डरला 'अच्छा साब' म्हणून जबाब दिलेल्या नोकरानें, गरमागरम चहाचा कप नि साहेबांची आवडती खारी बिस्किटें आणून टेबलावर ठेवल्यानंतर, दिनानें चहाचा आस्वाद घेण्यास सुरवात केली. पण आज त्या चहाची लज्जत त्याला तितकीशी आनंद देत नव्हती. रस्त्यावरून लगबगीनें जाणाऱ्या बायकांच्या हातांतील चांदीच्या हलव्याच्या वाट्या नि हळदीकुंकवाच्या कुयऱ्या त्याला घराची आठवण तीव्रपणें करून देत होत्या. त्यानें विमनस्कपणेंच मग आपल्या पुढील चहा संपवला आणि तो आपल्या खोलीकडे वळला. वाडीच्या तोंडाजवळ कसली तरी गर्दी जमली होती. त्याचेहि पाय अभावितपणेंच तिकडे वळले. एक साधारण उतारवयाचा एकाक्ष माणूस चाळ बांधलेल्या हातानें डग्यावर 'घुबु घुबु' असा आवाज करीत मधूनच तबल्यावर कडक थाप देत होता, आणि त्याच्या बाजूला बसलेली एक चौदा पंधरा वर्षांची काळीसांवळी पण नीटस चेहऱ्याची कृशांगी छोकरी, पेटीचा एकच सूर धरून बसली होती. आपल्या मनासारखा सूर जमलेला पाहून तिनें मग उजव्या हातानें मस्तकावरील पदर एकवार सरकावीत, 'जाना है भाई, एक दिन जाना है भाई...' अशी मोठ्या गोड आवाजांत सुरुवात केली.

'वा: वा: बहोत मिठी!' जमलेल्या तमासगीरांपैकीं कोणीतरी रंगराव उद्गारले. आपल्या कृष्णवर्ण पाणीदार डोळ्यांचा एक कटाक्ष तिरस्कारानें त्याच्याकडे फेंकून तिनें आपलें गाणें पुढें चालू केलें. नित्याच्या परिचयाचाच होता तिच्या तो प्रकार. पण त्या तमासगीरां-

मध्यें उभ्या असलेल्या दिनाला मात्र जरा चमत्कारिक वाटलें. तिच्या त्या काळ्याभोर डोळ्यांनीं त्याला कोणाची तरी आठवण झाली. आणि मग अधिकच विमनस्कपणें तो चाळींत शिरला.

त्याच्या मजल्यावरील बायकांची हळदी कुंकवाची नि तिळगूळ वाटण्याची एकच धांवपळ चालली होती. धोतराचा सोगा खांद्यावर टाकून तो आपल्या खोलीकडे चालला होता आणि सभोंवारच्या त्या धांवपळीकडे त्याचें मुळींच लक्ष नव्हतें. शेजारच्या बाकऱ्यांच्या खोलींतून येत असलेला अत्तराचा घमघमाट त्याला क्षणभर सुखवीत पुढे गेला. मधूनच होत असलेला हस्तकंकणांचा मंजुळ नाद नि बालिकांचा निर्भर हास्य विनोद त्याच्या कानांवर आदळत होता. पण आज आतां त्याच्या डोळ्याला फक्त चिरपरिचित घरचें वातावरणच मात्र दिसत होतें.

त्यानें खोलीचें दार उघडलें, आणि कसला तरी सुपरिचित मधुरवास त्याच्याभोंवतीं मंदपणें दरवळला. त्यानें उत्सुकतेनें इकडे तिकडे पाहिलें. त्याच्या अभ्यासाच्या टेबलावर स्वच्छ रुमालांत बांधलेला एक पितळी उभा डबा नि त्याच्याजवळच एक लहानसें पुडकें त्याच्या गैरहजेरींत त्याच्या गांवाकडून आलेल्या कोणीतरी ठेऊन गेल्याचें त्याला दिसलें. घाईघाईनेंच त्यानें तें पुडकें सोडलें. आंत दोन बंद पाकीटें नि एक सुंदरसा स्कार्फ दिसत होता. 'लतेचंच काम असलं पाहिजे हें. दुसरं नाहीं कुणी !' तो मऊ मऊ स्कार्फ मोठ्या हळुवारपणें हातांत घेऊन त्याला येत असलेला गंधराजाचा गोड वास घेत तो पुटपुटला. लतेचंच पत्र त्यानें प्रथम अधीरपणें उघडलें.

'तूं ओळखलंसच असशील दिना, हलवा कुणी केला आहे तो.

आईकडून किती वेळां तरी रागावून घ्यावं लागलं मला त्याबद्दल. पण खरंच सांग हं दिना, झाला आहे कीं नाहीं माझा हलवा सुंदर! खरं-खुरं सांग हं मात्र — दिना! नाहींतर तुला आपली संवयच आहे माझी स्तुती करायची. आणि तो स्कार्फ पण मीच केला आहे बरं का महाराज! सारखी आठ दिवस बसलें होतें त्याच्या डोक्याशीं. तेव्हां झाला कुठे मनासारखा. पण तूं इथें नाहींस दिना, नि संध्याकाळ बघ अशी कंटाळवाणी जाते कीं — काय सांगु! आई आपली बसते तिचा तो चरखा घेऊन आणि माझा मग वेळच जात नाहीं आपला. किती गंमत होती नाहीं तूं असतांना इथें?

'अय्या! पण विसरलेंच कीं रे एक. ती मैना दिली होतीस ना मला तूं मागें, ती पण गेली बघ बिचारी मरून. किती रडलें मी खरंच त्या दिवशीं दिना. हंसलासुद्धां असतास तूं बघ. आणि किती सुरेल गायची नाहीं रे ती? पण तुला आठवण आहे, आईला कट-कटच वाटायची तिची नि तिला गप्प करण्यासाठीं फडक्यानें झांकून ठेवीत असे तिचा पिंजरा ती.

'असं शांत आहे सगळीकडे आतां. तुझा तो इनामदारांचा भय्या मात्र येतो मधूनमधून हं. किती हंसत असस नाहीं रे तूं त्याच्या त्या घेरेदार शेंडीला. त्याला पाहिला कीं मला सुद्धां हंसू येतं ती आठवण येऊन. पण आईला नाहीं हं कळतां उपयोगी. तिचे आवडते भय्या-साहेब आहेत ते!

'आणखी एक गंमत सांगू? माझे फोटो काढले आहेत दोन तीन निरनिराळ्या पोझमध्यें. कुणी, माहीत आहे? तुला नाहीं ओळखणार. त्या तुझ्या भय्यासाहेबानींच काढले आहेत. एक तर असा झकास

आला आहे कीं, माझी मीच खूष होतें त्यावर! आणि तो प्रेझेंट द्यायचा आहे एका माणसाला. अंहं! गुपीत आहे तें आमचं. सांगायचं नाहीं कुणाला एवढ्यांत.

'पण परक्या माणसासमोर असं नटून थटून बसणं मला नाहीं बाई आवडत. पण आमच्या आईसाहेब आहेत ना! नि आणखी ते तिच्या नात्यांतले. म्हणून आळी मिळी गूपचूप!

'तुझ्यावर मात्र रागावणार आहें हं मी दिना आतां. असं रे काय करतोस तूं? एकसुद्धां गोष्ट पाठवली नाहींस तूं गेल्यापासून, बरं का! कित्ती तरी वेळां बोललें मी तसं तुझ्या आईजवळ. पण त्या काय म्हणतात, वेळ नसेल हो होत त्याला आतां लता; नि लहान का आहेस आतां तूं गोष्टी सांगाला. खरं दिना? पण मला नाहीं खरं वाटत तें. मी सांगू — सांगू? पाणी मुरतं आहे कांहीं तरी इथे. लब्बाड!'

आपल्याशींच हंसत दिनानें मग आईचें पत्र उघडलें. आणि मग कांहीं वेळ त्या दोन्ही पत्रांची उजळणीच केली त्यानें अधाशासारखी. लताच्या पत्राचीच अधिक वेळां म्हणा. तरीहि तें वाचून समाधानच होत नव्हतें त्याच्या मनाचें. आतांपर्यंत उत्पन्न झालेली त्याच्या मनाची विमनस्कता आतां उलट अधिकच वाढली आणि अतिशय तीव्रतेनें त्याचें मन घराकडे ओढ घेऊं लागलें. किती वेळ तरी आपल्याशींच पुटपुटत मग तो खोलींत फेऱ्या मारीत होता.

बाहेर आतां दिवे लागले होते. गॅलरींतील गलका बंद झाला होता नि चिमणी पाखरें कुलबुलत आपल्या घरट्यांत परत येत होतीं. त्यानेंहि काडी ओढून आपला दिवा लावला आणि टेबलावरील आपलें लेखनसाहित्य पुढें ओढून खालीं बसत तो अस्पष्टपणें गुणगुणला—

अंधारुन जग आलें भवतीं ।
सखे सोयरे घरास निघती ।
खड्या सुरानें कुणि आलापति ।
परी घुमतसे कर्णी एकच प्रीतीची मृदु साद ॥ ......

## उन्हाळ्याच्या सुटींत

सकाळीं उठल्याबरोबर दिनानें लताच्या घरीं धांव मारली. तोंड धुऊन जेमतेम चहा पिईपर्यंतच त्यानें जसा दम धरला होता.

'लता! लता!' आंगणांत पाऊल ठेवल्यापासूनच त्यानें हांका मारण्यास सुरुवात केली.

'कोण दिना? आल्यें रे आल्यें!' करीत घाईघाईनेंच लताहि बाहेर ओटीवर आली. तिचे विगलितबंध केस तिच्या मुखावर स्वच्छंदानें झेंपावत होते, पदर पाटीवर एकाद्या चक्रवर्तिनीच्या निशाणासारखा फडफडत होता नि तोंडावर हास्याची पखरण उधळली होती.

'अबब! किती मोठी झालीस ग तूं लता!' तिच्या त्या लतेसारख्या सडपातळ उभार मोहक बांध्याकडे पहात दिना उद्गारला; आणि तिच्या मुखावर लज्जेचा रक्तिमा पसरला. पण ती कांहींच बोलली नाहीं. दिनानें मोठ्या आवेगानें तिचा हात पकडला. पण तिनें तो हळूच सोडवून घेतला. दिनानें चकित होऊनच तिच्याकडे पाहिलें. त्याच्या लतेनें अजूनपर्यंत असा आपला हात चुकवला नव्हता. पण आज कांहीतरी नवीनच विकार त्या दोघांमध्यें हा अंतराय उत्पन्न करीत होता. दिना थोडा गोंधळला. त्याची लता आज त्याला दुरावल्यासारखी वाटत होती.

आणि घरीं येऊन त्याला कांहीं दिवस झाले नि न चुकतां जरी रोज लतेकडे त्याची खेप होत होती तरी हा विकार कांहीं दूर झाला नाहीं. तीं दोघं एकटींच अशीं बोलत बसलीं कीं मधेंच कांहीं वेळां तीं स्वस्थ बसत, नि कोणालाच काय बोलावं हें समजत नसे. दिनाला मग मोठं चमत्कारीक होई नि तो आपल्याकडून तसें होऊं न देण्याचा खूप प्रयत्नहि करी. तो नवीनच शिकत असलेल्या वनस्पति शास्त्राच्या अभ्यासांत स्वतःला तो मग गुंतवून घेई आणि लतालाहि त्यानें आस्ते आस्ते आपल्या जोडीला घेण्यास सुरुवात केल्यामुळें त्यांचा वेळ मग जरा बरा जाऊं लागला.

लतेलाहि पसंत पडला तो कार्यक्रम नि पुष्कळ वेळां मग त्या दोघांची जोडी हातांत पिशवी घेऊन संचारासाठीं बाहेर पडायची. आणि आसपासच्या डोंगर दऱ्यांत खूप वेळ भटकून नानातऱ्हेचीं रानफुलें नि वनस्पति गोळा करून तीं दमून भागून घरीं येत. दुसरे दिवशीं मग त्या सर्वांची वर्गवारी लाऊन त्यांचें वर्णन पुस्तकाशीं ताडून पहाण्यांत त्यांचा वेळ मोठ्या गंमतीनें जाई. त्या साऱ्या उद्योगांत लतेला आतां चांगलीच गोडी उत्पन्न झाली होती नि दिनाहि मग खूष असे तिच्या संगतींत.

असाच एक दिवस तिसरे प्रहरचा दिना तिच्याकडे आला होता. माजघराच्या खिडकींत टांगलेल्या पिंजऱ्याला हिरवीगार पानें लावीत लता पाठमोरी उभी होती. पिंजऱ्यामधील तो चिमणा कॅनरी तोंडानें चिंव चिवाट करीत नि मधूनच लाडीकपणें लतेच्या हातावर चोंचीनें आघात करीत आंत फडफडत होता. त्यानें दिलेल्या मैनेची जागा आज त्या कॅनरीनें पटकावली होती. दिनाचें अजूनपर्यंत तिकडे लक्ष गेलें नव्हतें.

'माझ्या मैनेचा हा कॅनरी कसा झाला बुवा, लता?' त्यानें थट्टेनें विचारलें.

'अरे तसं नाहीं दिना,' बाजूला चरख्यावर सूत काढीत बसलेल्या माईसाहेब म्हणाल्या. 'तुझे ते दोस्त भय्यासाहेब आहेत ना, त्यांनीं दिला धाडून आपल्या बंगल्यावरून काल.'

'कुठल्या बंगल्यावरून?'

'म्हणजे तुला माहीत नाहीं वाटतं? गेंडे माळावरील आपल्या मधुकुंजांत असतात हल्लीं ते.'

'मग आजपर्यंत कशा कांहींच बोललां नाहीं, माई?'

'पण तूं तरी एका अक्षरानं विचारलंस का?' माई म्हणाल्या. 'तुझे मित्र ना ते? भारी हुषार आहेत बघ भय्यासाहेब नि केवढी इनामी आहे त्यांची ती!'

त्या मग उठून कॉफी करण्यासाठीं म्हणून तिकडे स्वयंपाक घरांत गेल्या. लतेची पाठ अजून तशीच त्याच्याकडे होती नि पानें लावण्याचें तिचें काम चालूच होतें.

'झालंच हं दिना,' ती म्हणाली. 'ही आलेंच बघ आतां दोन सेकंदांत.'

पण दिनाकडून नेहमीं सारखें कांहीच उत्तर आलें नाहीं म्हणून मागें वळून तिनें त्याच्याकडे पाहिलें. तिला कधींच न दिसलेला असा कांहीं संत्रस्त भाव दिनाच्या डोळ्यांत तिला दिसला.

'काय झालं दिना?' त्याच्याजवळ येत तिनें विचारलें.

'मला?' त्यानें विचारलें. त्याचे डोळे शून्यपणें तिच्याकडे लागले होते नि विचार कोठें तरी दूर भटकत होते.

'किती खिन्न दिसतो आहेस तूं !'

'लता !' तो म्हणाला, 'मला नाहीं आवडत तें पाखरूं.'

कांहीच अर्थबोध न होऊन तिनें त्याच्याकडे आश्चर्यानें पाहिलें. 'किती चमत्कारीक आहेस रे दिना !' ती म्हणाली.

त्यानें तिचा हात आपल्या हातांत धरला नि आसुसलेल्या नजरेनें तिच्याकडे पहात तो कांहीं वेळ तसाच उभा होता. कॉफीचे कप घेऊन माईसाहेब आंत आल्या नि कॉफी पान झाल्यानंतर तीं दोघंहि आपल्या अभ्यासाच्या खोलींत गेलीं.

दोघंहिजण कांहीं वेळ आपल्या उद्योगांत व्यग्र होतीं. कोणीच कोणाशीं बोलत नव्हतें नि घरांतहि सारें कांहीं सामसूम होतें. शेजारच्या खोलींतून माईसाहेबांच्या चरख्याचें कंटाळवाणें एकसुरी संगीत मात्र मंदपणें घुमत होतें. मधूनच हलक्या आवाजांत एकाद्या फुलाचें पारिभाषिक नांव दिना उच्चारी नि लतेला त्याचा उच्चार नीट समजाऊन सांगे.

'अजून ती पांढरी लिली कमी आहे माझ्याजवळ,' चोपडीच्या पानांमधून हातांतील फुलें नीट दाबून ठेवीत लता म्हणाली.

दिनानें आपल्या खिशांतून आपलें पॉकेट बुक बाहेर काढलें नि त्यांतून पांढरी लिली बाहेर काढीत तो म्हणाला, 'हं, ही घे लिली तुला.'

'पाहुं दिना, पाहुं. काय रे लिहिलं आहेस त्यांत एवढं ? गोष्टी वाटतं ?' पॉकेटबुकांतील लेखन पाहून लता म्हणाली.

'अं हं ! गोष्टी नाहींत त्या.' तिच्या हातांत पुस्तक देत तो म्हणाला.

लतानें घाईघाईनें त्याचीं पानें चाळलीं. सगळ्या कविताच दिसत होत्या त्यांत. बहुतेक एकपानीच दिसत होत्या त्या. लता त्यांचीं नावें वाचीत होती. ' भूगोलाचे मास्तर, ' ' पहाडेश्वरावर, ' ' मकरसंक्रांत, ' ' तिचें पहिलें पत्र.' अशीच होतीं नावें बहुतेक.

ती पानें चाळीत असतां दिना तिच्या चेहेऱ्याकडे सूक्ष्म दृष्टीनें पहात होता. लज्जेची मधुर खुलावट तिच्या गौर मुखावर पसरत होती. दिना तिच्या डोळ्यांतील भाव वाचण्यासाठीं अतिशय अधीर झाला होता. पण तिनें वर न पहातांच पुस्तक मिटून त्याच्यासमोर ठेवलें.

' असं नको आहे मला तें;' तो म्हणाला.

आपल्या वेणींतून दोन बकुळीचीं फुलें काढून तिनें तीं पुस्तकांत ठेवलीं नि पुस्तक परत त्याच्या हातांत देत ती म्हणाली, ' ही बघ तुझी आवडती फुलं ठेवलीं आंत; आणि ही कुसरीचीं पण घे, तुझ्या-जवळ कुठें होतीं तीं. '

अखेरीस सुटी संपली नि त्याचा जाण्याचा दिवस उजाडला. आपल्या माईची परवानगी घेऊन लता त्याचेबरोबर स्टँडवर येण्यास निघाली. मूकपणेंच त्यांचा हा प्रवास चालला होता. पण त्याच्या अंतःकरणांत मात्र विलक्षण धडधड चालली होती. मनांतले विचार बाहेर उफाळून येण्यास पहात होते. पण त्याची जीभ बंड पुकारीत होती. तो अस-हायपणें लतेकडे पाही. त्याच्या आयुष्याचें नंदनवन किंवा मरुभूमी बनवण्याचें सामर्थ्य, त्या मुग्ध बालिकेच्या केवळ एका शब्दांत होतें. आणि स्टँड जवळ येत चालला होता तरी त्याचें हृदय मात्र अजून खळाळून बाहेर पडत नव्हतें. पण त्याची पाऊलें मात्र आतां हळू पडूं लागलीं.

'दिना, पाय उचल लौकर,' लता म्हणाली. 'ते बघ दहाचे ठोके पडले आत्तांच.'

तरीहि त्यानें पाऊल जलद उचललें नाहीं. अखेरीस खालीं पहात तो अडखळत बोलूं लागला—

'लता दोन वर्षं येणार नाहीं मी आतां घरीं परत. पण मी परत येईपर्यंत असाच तुझा आवडता दिना राहीन ना मी?'

तिनें आपली मान हलविली नि मोठ्या लाडिकपणें त्याचेकडे पाहिलें......'तुझीच बाजू घेतली मी दिना.' जरा वेळानें ती म्हणाली.

'माझी, आणि कशासाठीं ग?'

'माई म्हणाली, दिना आतां पहिल्यासारखा नाहीं राहिला, म्हणून. काल तूं गेल्यावरचीच गोष्ट बघ!'

दिना एक क्षणभर स्तब्ध होता. मग हळूच तिचा हात धरीत तो म्हणाला, 'अगदीं पहिल्यासारखाच आहें मी तुझा दिना. समजलं लता!'

तिनें विश्रब्धपणें त्याच्याकडे पहात मान हलवली.

त्याचें मुख उजळलें आणि तिचा हात सोडून त्यानें जरा वेगानें पाऊल उचललें. स्टँडच्या जवळ येत असतां त्याच्या मुखावरील समाधान वाढत होतें नि पाऊल जोरानें पडत होतें. त्याच्या त्या जलद चालीनें लताची मात्र धांवपळच उडाली.

'असं रे काय दिना, झालं आहे तरी काय तुला आज?' तिनें विचारलें.

'आमचं आपलं गुपित आहे तें — एक गोड गुपीत!' हंसऱ्या

डोळयांनीं तिच्याकडे पहात तो म्हणाला. 'मी परत आलों कीं मग समजेल तुला लता. पण विसरूं नको हं मी काय बोललों तें.'

मोटार स्टँडवर येऊन तीं पोंचलीं. अगदीं बरोबर वेळेवर आली होतीं तीं. दिना पुढल्या जागेवर बसतांच ड्रायव्हरनें हॉर्न दिला. दिनानें "नमस्ते" म्हणून हात हलविला. लतानेंहि उलट सलामी दिली नि गाडी चालू झाली. गाडी पुढील वांकण घेत असतां दिनानें वळून पाहिलें; त्याची आवडती लता हातांतील रुमाल हलवीत तिथें अजून उभी होती.

## घराकडील पत्र

जवळ जवळ दोन वर्षें लोटलीं होतीं आतां त्या गोष्टीला. दीनानाथ पुस्तक घेऊन आपल्या टेबलाजवळ बसला होता. चोपड्या पेनसिली बाहेर काढून आपल्या मित्राची तो वाट पहात होता. दारावर कोणी तरी टकटक असा आवाज केला. 'ये रे मंगेश, तुझीच वाट बघतों आहें.' पण मंगेश आंत येण्याऐवजीं त्याच्या नांवचें पत्र आंत टाकून पोस्टमननें दार ओढलें.

आश्चर्याचीच गोष्ट. पण दिनानें या दोन वर्षांत लतेला पत्र लिहिलें नव्हतें आणि तिचेंहि त्याला कधीं आलें नव्हतें. दोघांचीहि जणुं एक प्रकारची तपश्चर्या चालली होती. हें आजचेंहि पत्र तिच्या हातचें नव्हतें. त्याच्या आईचें पत्र होतें तें. त्यानें पत्र उघडून त्यावरून डोळे फिरविले नि तो खालील मजकुराशीं आला. —

— 'तुझ्या या वयांत तुला येणारा प्रत्येक अनुभव हा नवीनच असायचा. कारण किती आनंदी असते वृत्ती नाहीं या वयांत ? नि

इकडे सुद्धां काय काय बदल झाला आहे. चमत्कारीक वाटेल तुला आरंभीं आरंभीं तूं परत आलास म्हणजे. आणि वाईटहि वाटेल मला वाटतं, कारण मी ओळखलं आहे तुझं अंतःकरण......

'काल लतेनें अखेरीस भय्यासाहेबांना होकार दिला. हे गेले दोन तीन महिने सारखे तिच्या पाठीवरच आहेत ते. पण तिच्या कांहीं मनाचा ठाम निश्चय होत नव्हता, मला वाटतं. पण अखेरीस आतां झाली आहे कबूल. अल्लडच आहे तशी अजून ती. या पुढल्या महि-न्यांतच धरला आहे मुहूर्त. आणि माई पण जायच्या आहेत बरं का तिकडे तिच्याबरोबर रहायला....'

आसमंतांत सर्व वस्तुजात तेजाळ सूर्य प्रकाशांत अथांग डुंबत होतें पण दिनाच्या डोळ्यासमोर मात्र घनदाट काळोख दाटत होता......

## मधुकुंज

आणखी कांहीं वर्षे लोटलीं.

असा सूर्यास्ताच्या सुमाराला एक तरूण गृहस्थ डोंगर माथ्यावरील कचेरीच्या मागच्या बाजूनें उतारावरील गर्द झाडीमधून जाणाऱ्या रस्त्यानें धिमेपणे खालीं चालला होता. उन्हानें किंचित् काळवंडलेल्या त्याच्या चेहऱ्यावर सामर्थ्याचें मूर्तिमंत तेज दिसत होतें. त्याचे काळे-भोर गंभीर डोळे समोर दूरवर रस्त्यावर लागले होते. त्या उतार वाटे-वरच्या त्याच त्या दृश्यांत कांहीं बदल दिसतो कीं काय, याचाच जणुं कांहीं ते डोळे चौकसपणें शोध घेत होते. पण त्याला अपेक्षित असलेली गोष्ट अजून सांपडलेली दिसत नव्हती. अखेरीस समोरूनच वर त्याचे-कडे रेंगाळत येत असलेला एक बैलाचा छकडा त्याच्या दृष्टीस पडला. गाडीवान खांद्यावर चाबूक टाकून गाडीच्या बाजूनेंच चालत होता.

‘ राम राम, पाव्हणं ! मधुकुंजाचा हाच रस्ता ना ? ’ त्या प्रवाशानें विचारलें.

‘ व्हय दादा, असच तडक चला पुढ. ’ राम राम करीत छकडेवाला म्हणाला.

‘ बराच लांब आहे काय अजून ? ’

‘ न्हाइ दादा. ह्ये आतां हांकेवरच हाय बघा. आनि त्या थोरल्या तल्याजवळच हाय तो कुंज, नव्ह का ! ’

छकडा निघून पुढे गेल्यावर त्या प्रवाशानें पाऊल उचललें. पंधरा-वीस मिनिटांतच ती झाडी संपली आणि पुढल्या खड्या उतारा पलीकडे जुनाट आम्रवृक्षांची लांबच लांब राई पसरलेली दिसूं लागली. त्याच्याच पलीकडे रुंद होत जाणाऱ्या भूपृष्ठावर एक लांब वर्तुलाकार विस्तीर्ण तलाव ऐसपैस पसरला होता. त्याच्या काळ्याभोर प्रशांत पाण्यावर सायंकाळच्या सूर्य प्रकाशाच्या छाया मिश्रित शलाका पसरल्या होत्या. सभोंवतालच्या उंच उंच वृक्षांच्या तांबूस हिरव्या पानांवर सूर्य-किरण नाचत होते. आणि मधुनच दिसणाऱ्या एका उघड्या भागांतून दूर क्षितिज रेषेवर निळेकाळे डोंगर त्या प्रशांत सौंदर्याचें जणु संरक्षण करीत उभे असलेले दिसत होते. त्या प्रशांत सरोवराच्या उजवे बाजूला एक लांबच लांब बागमळा पसरला होता नि त्याच्याच मध्यभागीं एक पांढराशुभ्र सुंदर बंगला आपलें लाल कौलारू मस्तक उभारून बसला होता.

‘ क्रॉंच क्रॉंच ’ असा कांहींसा आवाज करीत पलीकडील झाडा-वरून एक करकोचा वर उडाला आणि त्यानें त्या सरोवराच्या दिशेनें उड्डाण केलें.

'मधुकुंज!' जरा चमकून तिकडे पहात तो प्रवासी आपल्याशींच उद्गारला.

आपल्या प्रवासाच्या आपण आतां टोंकाला आलों अशा आविर्भावानेंच समोर पायांशी दिसणाऱ्या उंच वृक्षांच्या मस्तकांवरून सरोवराच्या जलपृष्ठावर मंदपणें हेलावत असलेल्या मधुकुंजाकडे पहात, तो कांहीं क्षण आतां स्तब्धपणें उभा राहिला. आणि मग एकदम जागा झाल्यासारखाच त्यानें आपला प्रवास परत चालू केला.

रस्ता आतां अगदीं खड्या उताराचा असल्यामुळें अजूनपर्यंत पायाखालीं दिसणाऱ्या वृक्षलतांनीं त्याच्याभोंवतीं परत एकदां गर्दी केली आणि आतांच स्पष्टपणें त्याला दिसलेला मधुकुंज मधून मधून त्याच्या दृष्टीआड होऊं लागला.

सभोंवार पसरलेल्या त्या वृक्षवैभवाचें आकंठ पान करीत तो पुढें चालला होता. परत एकवार रस्ता किंचित वर चढूं लागला नि भोंवतालची झाडी, मधूनच विरळ होत पलीकडे पैस पसरलेले द्राक्षांचे नि अननसांचे मळे त्याला दाखवूं लागली. आजूबाजूला फुललेल्या वृक्षलतांवरून चाललेला मधुमक्षिकांच्या गुंजनाचा सांद्र आवाज त्याच्या कानांत आतां घुमूं लागला. त्यानें समोर पाहिलें. डोक्यावर शुभ्र खादी टोपी नि लांब गुडघाघोळ, खादीचा मुंडेछाट शर्ट घातलेला एक तरूण झपाट्यानें त्याच्याच दिशेनें येत होता. त्या प्रवासी तरुणाला त्यानें हात हलवून मोठ्यानें सलामी दिली.

'सुस्वागतम्, सुस्वागतम् दीनानाथ!'

'नमस्ते, नमस्ते भय्यासाहेब!'

हा वेळपर्यंत ते दोघे जवळ येऊन त्यांनीं एकमेकांचे हात घट्ट

ग्रंथ समता
अनुक्रम
विभाग
क्रमांक

पकडले होते, आणि एकमेकांच्या चेहऱ्याचें एकदोन क्षण निरीक्षण करीत ते तसेच स्वस्थ उभे होते.

‘ किती फरक पडला आहे रे तुझ्यांत, दीनानाथ ! ’ त्याच्या गंभीर चेहऱ्याकडे पहात भय्यासाहेब म्हणाले.

‘ अहो चालायचंच भय्यासाहेब. पण तुमची मात्र अगदीं खूष तबियत दिसते आहे हं ! ’

आपल्या शाळासोबत्याच्या त्या शब्दांनीं भय्यासाहेबांच्या चेहऱ्यावर समाधान झळकूं लागलें. ‘ खरं आहे दीनानाथ. पण त्याचं कारण माहीतच आहे तुला. किती चकीत होईल पण तुला ती पाहून ! अगदीं स्वप्नांतसुद्धां नसेल कल्पना तिच्या ही.’ आनंदातिशयानें त्याचा हात दाबीत भय्यासाहेब म्हणाले.

‘ म्हणजे ! तिला सांगितलं नाहीं वाटतं तुम्ही भय्यासाहेब ? ’

‘ छट् ! अगदीं मुळींच पत्ता नाहीं तिला; आणि माईसाहेबांना पण नाहीं कांहीं माहिती. आश्चर्यानें तिला अगदीं चकित करावं म्हणूनच केलं आहे मी हें सारं. माझा स्वभावच आहे म्हणा तसा.’

दीनानाथांचा चेहरा जरा गंभीर झाला. आणि घराजवळ जवळ येत असतां त्यांचा श्वासहि थोडा जड येत होता.

डावे बाजूकडील द्राक्षांचा मळा आतां संपला होता आणि त्याला लागूनच पुढें अगदीं तलावाच्या कांठापर्यंत भाजीपाल्याचे वाफे पसरलेले दिसत होते. आतांपर्यंत अंतरिक्षांत घिरट्या घेत असलेला तो बगांचा करकोचा खालीं उतरून लांब लांब टांगा टाकीत भाजीच्या वाफ्यांतून फिरत होता.

‘ चलो ए बदमाष ! ’ हातानें टाळ्या पिटीत त्या करकोच्याला उडवीत भय्यासाहेब ओरडले. ‘ असे त्रास देतात हे लेकाचे ! ’

आपल्या पंखांची फडफड करून त्या पक्षानें आस्ते आस्ते वर उड्डाण केलें नि तो पलीकडे घराच्या मागील बाजूच्या लांबच लांब कौलारावर जाऊन बसला. हिरव्यागार केळींची एकच गर्दी दिसत होती त्या बाजूला.

'आमची कॅनिंग फॅक्टरी आहे बरं का ती. दोन वर्षांपूर्वींच बांधली मी ती.' भय्यासाहेब तिकडे बोट करून सांगत होते. 'नवीनच सुरु-वात केली आहे मी त्या धंद्याला. पण आमचा हा मधुकुंज नि सभों-वतालचा हा मळा मात्र आमच्या आजोबांच्या वेळचा आहे हं. पण अजून बांधकाम काय आहे कुंजाचं!'

मळ्याच्या मधल्या छोट्या रस्त्यानें आतां ते कुंजाकडे जात होते. आजूबाजूला दोन तीन कामकऱ्यांच्या झोंपड्या दिसत होत्या. त्यांतील उघडीबागडीं पोरें इतस्ततः सैरावैरां बागडत होतीं. उन्हानें करपलेल्या चेहेऱ्यांचे कामकरी आपल्या मालकांना येतांना पाहून हात जरा जलद् चालवीत होते. एक दोघांनीं त्यांना लऊन रामरामहि केला. दिवस भराच्या कामाची एकदोन प्रश्नांत त्यांच्याजवळ चौकशी करून भय्या-साहेब पुढें झाले.

मधुकुंजाच्या पुढील आंगणांत ते आतां शिरले. मध्यभागीं राख-लेल्या पायवाटेच्या दोन्ही बाजूनीं, नानारंगी देशीविदेशी फुलझाडांचे ताटवे पसरले होते. जागजागीं कमानी करून पसरलेले कृष्ण कमळाचे किंवा जाईजुई नि मधुमालतीचे वेल मोठे सुंदर दिसत होते. बागेच्या डावे हातच्या फाटकापलीकडे लांबवर पसरलेला तो विस्तीर्ण जलाशय, सायंकाळच्या त्या स्निग्ध प्रकाशांत गंभीरपणें हेलावत होता. नि त्याच्याहि पलीकडे दिसणारी ती प्रदीर्घ आंब्यांची राई आपले शेंडे उंचाऊन त्या निळ्याकाळ्या पाण्यांत डोकाऊन पहात होती.

पडवीच्या पायऱ्या चढून ते दोघे ओटीवर पाऊल टाकीत असतांच वाऱ्याच्या एका मंद झुळुकीनें, त्यांच्या स्वागतासाठीं मोतियाचा मधुर सुगंध त्यांच्या अंगावर मुक्तहस्त उधळून दिला.

आंत माजघरांतील प्रशस्त झोंपाळ्यावर कोणीतरी, शुभ्रवसनधारी, सडपातळ गोंडस बांध्याची एक तरुणी, कांहींतरी गुणगुणत बसली होती. त्यांना आंत येतांना पहातांच ती झटकन् खालीं उतरून दोन पाऊलें पुढें आली. पण अर्ध्यावरच, दीनानाथाच्या चेहेऱ्याकडे विस्फारीत नेत्रानीं पहात ती स्तब्धपणें उभी राहिली. आपल्या डोळ्यांवर विश्वासच बसत नव्हता तिचा. 'दीनानाथ!' ती अस्फुटपणें उद्गारली. 'दीनानाथ! खरंच का तूं. किती वर्षांनीं दिसतो आहेस रे?'

'खूपच वर्षांनीं लता.' तो म्हणाला. अधिक कांहींच शब्द त्याच्या तोंडांतून बाहेर पडत नव्हते. तिचा तो सुपरिचित आवाज ऐकल्याबरोबर आपल्या अंतःकरणांत कांहींतरी तीव्र वेदना होत आहेत, असं त्याला वाटलं. पुष्कळं वर्षांपूर्वी मोटार स्टँडवर मोठ्या उल्हसित अंतःकरणानें निरोप घेतलेली तीच ती त्याची गोड लाडकी लता, आपल्या मोहक डोळ्यानीं त्याच्याकडे पहात त्याच्या समोर आतां उभी होती. पण कोण होती त्याची ती आज?

भय्यासाहेब पाठीमागें दाराजवळ आपल्याशींच हंसत उभे होते. 'चकित करून टाकली कीं नाहीं तुला लता?' ते म्हणाले. 'कल्पना तरी झाली असती तुला हा येईल म्हणून?'

धाकट्या बहिणीच्या प्रेमळ नजरेनें तिनें त्यांच्याकडे पाहिलें. 'किती चांगले आहांत तुम्ही.' ती म्हणाली.

'आणि बरं का लता,' तिचा हात हळुवारपणें धरीत ते म्हणाले,

'आतां लौकर नाहीं सोडायचा हं याला. किती दिवस तरी कुठे कुठे भटकंती केली आहे या बेट्यानें. आतां इथें अगदीं आपल्या घरासारखं वाटलं पाहिजे त्याला. दिसतो आहे बघ कसा एखाद्या परदेशासारखा; नि झालाहि आहे आतां तो खूप बडा !'

लतेनें हळूच दीनानाथाकडे पाहिलें. 'या मधल्या साऱ्या वर्षांचा प्रताप आहे तो;' ती म्हणाली.

हातांतील किल्ल्यांचा जुडगा खुळखुळवीत इतक्यांत माईसाहेब आंत आल्या.

'नमस्कार माईसाहेब.'

'कोण, दीनानाथ ! अगदीं ध्यानींमनीं सुद्धां नाहीं आमच्या तुझं. म्हटलं कोण पाहुणे आले आहेत.'

— आवश्यक चहापानास सुरुवात झाल्यानंतर मग अनंत प्रश्नोत्तरांची देवाणघेवाण शांतपणें चालू झाली. भय्यासाहेब एक भला मोठा चिरूट शिलगाऊन संभाषणांत भाग घेत होते. आणि त्यांच्या गप्पा आपआपल्या व्यवसायाबद्दल सुरू झाल्यावर माईसाहेब नि लता दोघीहि आंत स्वयंपाकगृहांत आपआपल्या उद्योगाला निघून गेल्या.

दुसरे दिवशीं सकाळीं भय्यासाहेबांबरोबर दीनानाथ त्यांच्या वेगवेगळ्या मळ्यांतून हिंडत होता. भय्यासाहेब त्याला आपल्या नवीन-कॅनिंग फॅक्टरीची माहिती देत होते. फॅक्टरीच्या कामाचा सीझन सुरू व्हायला अजून अवकाश होता. पण दीनानाथाला आंत फॅक्टरीच्या इमारतींत त्यांनीं सर्व कांहीं टाकाठिकीनें मांडलेलें दिसत होतें. मळ्यावर काम करणारीं माणसेंहि चांगली समाधानी आणि घट्टीकट्टीं दिसत होतीं. आनंद वाटला त्याला तें सर्व पाहून.

दुपारीं जेवणाच्या वेळींहि, सर्वजण एकदमच बसलीं असल्यानें त्यांच्या मनमुराद गप्पा चालल्या होत्या. आणि नंतरहि कांहीं भय्यासाहेबांच्या तर कांहीं लतेच्या संगतींत त्याचा वेळ जात होता. आपला तिसरे प्रहरचा वेळ मात्र दिनानाथ आपल्या खोलींत एकटाच आपल्या कामांत घालवीत असे. गेले कांहीं महिने त्यानें मराठींतलीं लोकगीतें, स्त्रीगीतें, ओंव्या यांचा मिळेल तो संग्रह करण्यास सुरुवात केली होती. बरेंच वाङ जमा झालें होतें आतांपर्यंत, आणि त्याची नीट वर्गवारी करण्यांत नि कांहीं नवीन गीतें मिळविण्यांत तो गुंतला होता.

ते सर्व दिवस लता त्याच्याबरोबर प्रेमानें नि मोकळेपणानें वागत होती. भय्यासाहेबांशीं वागतांना मात्र तिची वृत्ती अतिशय नम्रपणाची नि कांहींशी ओशाळगतीची अशी त्याला दिसे. त्याची पूर्वींची अल्लड, भाबडी, आनंदी पांखरासारखी असलेली लता आतां एकाद्या शांत गंभीरप्रकृति प्रौढेसारखीच त्याला वाटे. तिच्यांत झालेल्या या बदलाचें त्याला मोठें गूढ पडलें होतें.

सायंकाळीं आपलें काम उरकून तो त्या तलावाच्या काठाच्या रस्त्यानें एकटाच फिरावयास जाई. बागेच्या बाजूबाजूनेंच ती सर्व वाट गेली होती. बागेच्या टोंकाला एका लहानशा उंचवट्यावर असलेल्या दोन उंच बकुळींच्या खालीं एक ओबडधोबड बैठक उभी केली होती. समोर पसरलेल्या त्या जलाशयाचा नि त्याच्याच पलीकडील मधल्या मोकळ्या जागेंतून दूरवर दिसणाऱ्या भूप्रदेशाचा मोठा सुरेख देखावा त्या बांकावरून दिसे. लतेची आवडती जागा होती म्हणे ती. सायंकाळीं सूर्यास्ताचा सुंदर देखावा पहाण्यासाठीं ती पुष्कळ वेळां तिथें येऊन बसे.

असाच एक दिवस संध्याकाळीं खूप रपेट करून तो परत फिरला होता. वर आकाश एकाएकीं भरून आल्यासारखें दिसत होतें. वळवाच्या पाऊसाचे चार दोन थेंबहि सट्सट् त्याच्या आंगावर पडले. त्यानें जरा पाऊल उचलून जवळच्याच झाडाखालीं आश्रय घेतला. वळवाची एक लहानशी सर पांचदहा मिनिटें झडून पुढें निघून गेली नि त्यानेंहि परत चालण्यास सुरुवात केली. पण आतां भोंवती अंधार पडला होता. समोर, कांहीं अंतरावरील बकुळीखालील त्या बांकाजवळ कोणा तरी स्त्रीची शुभ्रवस्त्राकृती उभी दिसत होती. त्याच्याच दिशेनें तोंड करून कोणाची तरी वाट पहात ती स्वस्थपणें उभी होती.

लता तर नव्हे ही ? त्याच्या मनांत कल्पना आली. आणि तिला गांठून बरोबरच पुढे जाण्यासाठीं म्हणून त्यानें मोठ्या उत्सुकतेनें जरा पाऊल उचललें. पण त्या आकृतीनें आपलें तोंड फिरविलें आणि जलद् पाऊलें टाकीत ती बाजूच्या पाऊल वाटेनें अदृश्य झाली.

त्याला मोठें चमत्कारीक वाटलें नि लतेचा त्याला थोडा रागहि आला. आणि तरीहि ती लताच होती का, अशी त्याला शंकाहि पण आली. पण तसा तिला सरळ प्रश्न विचारण्याचें धैर्य मात्र त्याला झालें नाहीं. आणि बागेच्या बाजूनें आपण आंत जाऊं लागलों तर समोरच त्या रस्त्यानें ती घरांत शिरतांना कदाचित् दिसेल म्हणून तो ओटीकडील वाटेनेंच घरांत शिरला. पण तसें कांहींच झालें नाहीं.

## मनींचें हितगूज

पांच सहा दिवस झाले होते त्याला आतां येऊन. अशी तिसरेप्रहरची वेळ टळून गेली होती. सर्वांचाच चहा आज उशीरां झाला

होता आणि विशेष कांहीं कामहि नसल्यानें सर्वजण माजघरांतच गप्पा मारीत बसलीं होतीं. सूर्याचे तिरपे किरण बागेकडील दारानें आंत शिरून माजघरांतील भिंतीवर खालींवर नाचत होते. आणि तिकडून तळ्याकडून येणारी वाऱ्याची थंडगार झुळूक मनाला मोठा आल्हाद देत होती.

कांहीं वेळानंतर गड्यानें टपाल आणल्यामुळें दीनानाथ उठून त्या टपालानें आलेल्या नवीन लोकगीतांची व्यवस्था लावण्यासाठीं आपल्या खोलींत जाण्यासाठीं उठला. पण आज सर्वांनींच आग्रह केल्यामुळें लोकगीतांची आपली लावलेली फाईल घेऊन तिथेंच लतेजवळ येऊन तो बसला. 'चल लता, आपण दोघं मिळून वाचूं ये ही गाणीं; पुष्कळ दिवसांनीं आला आहे हा योग.' लतेकडे वळून तो म्हणाला.

'आधीं तूं एकटाच म्हण जरा वेळ, मग म्हणेन मी तुझ्याबरोबर.' लता म्हणाली. पण त्याच्या त्या सूचनेनें ती जरा बावरलीच होती.

दीनानाथानें मग मान हलवून खालच्या आवाजांत आधीं आपल्याशींच गुणगुणून मग जरा मोठ्यानें पण अधिक मोकळेपणानें गाणें म्हणण्यास सुरुवात केली.

'धांव धांव सखये आणि कृष्ण वनमाऽऽळी ग, कृष्ण वनमाळी!'

आपल्या आईच्या तोंडून आपल्या लहानपणीं अनेक वेळां ऐकलें होतें त्यानें तें गाणें. गाण्यांतील तो करुण वत्सल रस आणि आईच्या आवाजांतील, हृदयाला विव्हल करणारा विलक्षण नाजुक गोडवा त्याला अतिशय मुग्ध करी. गोड आवाजाची ही देणगी त्यानेंहि आपल्या आईजवळून मिळविली होती. आणि आतां तर एकतानतेनें ते करुण सूर त्याच्या कंठातून बाहेर पडूं लागल्याबरोबर सारीजणं व्यथित

अंत:करणानें नि नि:स्तब्धपणें जीवाचे कान करून ऐकत होतीं. लतेच्या मनाची तर तें ऐकत असतां विलक्षण कालवाकालव होऊं लागली. तिनेंहि अनेक वेळां तें गाणें तितक्याच भावविवशतेनें म्हटलेलें ऐकलें होतें. आणि म्हणून निरागस बाल्यांतील त्या सुखदकालाची स्मृती तिला तीव्रपणें होऊं लागून तिच्या डोळ्यांतून अश्रु मूकपणें पाझरूं लागले.

'गोकुळीं झाला आकांत कृष्ण बुडाऽऽला ग, कृष्ण बुडाऽला.' तिकडे दीनानाथ गात होता.

'किती सुंदर आहे नाहीं गाणं ?' डोळ्यांतील अश्रु पुसून आणि स्वत:ला जरा सांवरून लता म्हणाली. 'कुणी केल आहे रे गाणं ?'

'हे : !' भय्यासाहिब उद्गारले. 'अग तुझ्या सारख्याच कोणी तरी भोळसट बाईनें केलं असणार. आंतलं बायकी वळणच सांगतं आहे त्याचं !'

'असेल बायकी, नाहीं असं नाहीं. पण त्यांतला उत्कट जिव्हाळा पहाल कीं नाहीं ! असंख्य मुली बाळींच्या तोंडीं खेळत आलं आहे आत्तां पर्यंत तें, नि मला तरी त्याची गोडी अद्याप अवीट अशीच वाटते आहे. स्वत:च्या अंत:करणांतील खळबळ किती साध्या भोळ्या शब्दांत व्यक्त केली आहे पहा त्यांत. कोणतीही वत्सल माता आणि कोणत्याही काळांत असलेच निरतिशय उत्कट बोल आपले म्हणून बोलेल. मानवी स्वाभावांतले हे स्थायीभाव साध्या शब्दांत इतक्या जिव्हाळ्यानें व्यक्त करणं, हेंच या जुन्या गाण्यांचं वैशिष्ट्य आहे. आणि मला वाटतं त्यांचें हें कार्य नि:संशय अनन्यसाधारण आहे ! दुर्दैवानें त्यांची गोडी आजच्या पिढीला मात्र वाटत नाहीं आहे. पण तो त्यांचाच करंटेपणा आहे.' दीनानाथ आवेशानें म्हणाला.

'आतां हेंच, "कुत्स्ना थंबाल ले, थंबाल अपुल्या गाई—" हें सुंदर गाणं पहा. कुणाही सहृदय माणसाला तें निःसंशय मोहून टाकील. आणि तें "ल्हे काळी गोरी;" आठवतं काग लता तुला? आमच्या आईच्याच तोंडून ऐकलं आहे मी तें कितीक वेळां. "प्राणनाथ, तेरे-पर हंडया हरी हां हां! ल्हे काळी गोरी."' त्यानें म्हणण्यास सुरवातही केली. लतेनेंही मग मोठ्या तन्मयतेनें आपला नाजूक लाडिक सूर त्याच्या गोड आवाजांत मिसळला. किती सुंदर मिलाफ होत होता त्या दोघांच्या आवाजांचा! एकमेकांच्या स्वरांची अशी सुरेल मिळणी होण्या-साठींच जणुंकाय त्या दोघांची निर्मिती निसर्गानें केली होती. कांहीसे अरसिक भय्यासाहेब सुध्दां मंत्रमुग्ध झाल्यासारखे कांही वेळ स्वस्थ बसले होते. आणि माईसाहेब तर हातांतील काम थांबवून कौतुक-भरल्या डोळ्यानीं आपल्या लेकीकडे पहात होत्या. दृष्ट काढावीशीच वाटत होती त्यांना तिची आज.

गाणें संपलें नि दीनानाथानें हातांतील फाईल जरा बाजूला ठेवली. तिकडून त्या तलावाच्या बाजूनें सायंकाळच्या त्या मुग्ध शांततेंत, गोवंडां-तून घरीं परत येत असलेल्या गुरांच्या गळयांतील घंटांचा मंद आवाज त्यांच्या कानांवर आला. अभावितपणेंच सर्वांचे कान त्या मंद आवा-जाकडे लागले. स्वच्छंद गात असलेल्या गुराख्याच्या कंठांतली एक लकेर त्यांच्या कानांवर आली:

'अरे कुत्स्ना थंबाल ले थंबाल अपुल्या गाई—'

दीनानाथ प्रसन्नपणें हांसला. 'पहा, कशी पकड घेतली आहे त्या साध्या भोळया जीवाची, त्या गाण्यानें ती!'

'पुष्कळ वेळां ऐकलं आहे मी हें गाणं, इकडे;' लता म्हणाली.

'अग हा संभ्या आपला,' भय्यासाहेब म्हणाले, 'गाई परत आणल्या असतील बेट्यानें.'

कांही वेळ मग तीं सर्वजण तशींच तो आवाज बेड्याच्या मागील बाजूला जाई पर्यंत स्वस्थपणें ऐकत होतीं. 'कितीतरी वर्षे चाललं आहे हें गाणं.' दीनानाथ म्हणाला. 'नि असंच मला वाटतं तें पिढ्यान पिढ्या चालू सुध्दां राहील.'

त्यानें चोपडी परत पुढे घेतली नि आंतील एका पानावर आपले डोळे स्थिरावले. बाहेरील सूर्य प्रकाश आतां अधीकच कमी झाला होता. तळ्यापलीकडील आंब्राईवर निळसर तांबूस रंगाची मनोहर डूब चढली होती. दीनानाथानें मान उंचाऊन एकवार तिकडे पाहिलें आणि मनांत हवा असलेला सूर जुळल्यानंतर परत चोपडीकडे पाहून हळू आवाजांत सुरवात केली. त्याच्यापुढील फायलीचें तें पान हातांत धरून लताही आपल्या मनांत त्याच्या आवाजाशीं साथ करून तें वाचीत होती.

माझ्या मनिंचें हितगुज नव्हतें ठाउक कोणाला।
पितृवचानें दुसऱ्या वरणें आलें मम भाळा ।।
मधुर मनोहर मनिंचीं सारीं स्वप्नें मम विरलीं ।
जीव तडफडे माशावाणी, दुःख मना जाळी ।।
कुणा सांगणें हृदयव्यथा परि, निराशहृदय अतां ।
दिवस कंठणें झुरत मनामधिं, हा धिक् दैवहता ।।

फायलीचें पान थरथरत आहे असें दीनानाथाला वाटलें. त्यानें चमकून लतेकडे पाहिलें. हातांतील पान सोडून देऊन ती आपल्या जागेवरून लगबगीनें उठली नि कांहींहि न बोलतां माजघराच्या दारानें पडवींतून बाहेर पडून बागेंतील कृष्णकमळाचे मंडपाकडे एकदम निघून

गेली. माईसाहेबांनी पण चमकून तिच्या दिशेनें पाहिलें. भय्यासाहेबहि उठण्याच्या बेतांत दिसत होते. पण माईसाहेबांच्या, 'अगबाई ! फुलं काढायचीं असतील लतेला अजून,' या उद्गारानीं ते आपल्या खोली-कडे निघून गेले.

घराबाहेरील सर्व वस्तुजातावर संध्याछाया आतां अधीक वेगानें दाटत होती. समोर तिकडे पलीकडे लांबच लांब पसरलेल्या मळयावर नि तलावापलीकडील झाडींत काळोखाची पायरव चालू झाली होती. तिकडून पाण्यावरून येणारा करकोच्यांचा 'कॉंच कॉंच' असा आवाज किंवा मधेंच येणारा एखाद्या बेडकाचा आवाज, फुलांच्या निशीथ कालीन सुगंधानें भारावलेल्या वाऱ्याच्या थंडगार झुळुकीबरोबर कानां-वर येत होता. मधूनच एखाद्या चुकल्या माकल्या कोकीळाची गोड लकेर घुमत घुमत ऐकूं येई. आणि आतां पलीकडील राईच्या पाना पानांमधून पौर्णिमेचें प्रसन्न चंद्रबिंब आपलें मधुर हास्य पसरीत नि आकाश पूर्णपणें उजळीत आस्ते आस्ते वर येत होतें.

बाहेरील त्या शांत सौंदर्याकडे नि कृष्णकमळांच्या मंडपाच्या दिशेनें लगबगीनें निघून गेलेल्या लतेच्या अदृश्य आकृतीकडे डोळे लावून दीनानाथ चारदोन क्षण तसाच बसला होता. आणि मग हातांतील फाईल बंद करून, 'जरा जाऊन येतो हं,' असं हळून माईसाहेबांना सांगून बागेंतून तळयाच्या दिशेनें तो झपाट्यानें बाहेर पडला.

सभोंवारची वनराई शांतपणें झोंपी जाण्याच्या मार्गाला लागली होती. तलावाच्या भोंवतालच्या आम्रवृक्षांची छाया पाण्याच्या प्रशांत पृष्ठभागावर दूरवर पसरली होती नि त्या पलीकडे मध्यावर चंद्र-बिंबाचा फिकट प्रकाश मंदपणें पसरत होता. पानांची मंद सळसळ

त्या वसंत रात्रीच्या मधुरश्वासाप्रमाणें मधुनमधुन इतस्ततः विहरत होती. दीनानाथ त्या शांत सौंदर्याकडे पहात पहात पण आपल्याच विचारांत गुंग होऊन चालला होता.

समोर आतां त्या जलाशयाच्या मध्याकडील पृष्ठभाग चांगलाच उजळला होता. त्या छायामिश्रित रजत सौंदर्याकडे पहात पहात तळ्याच्या काठाकाठानें तो तसाच अजूनहि संथपणें पुढें चालला होता. आपले डावेहाताला शेंदोनशें कदमांवर, पाण्याच्या पृष्ठभागावर एक पांढऱ्या वॉटर लिलीचें उत्फुल्ल फूल डुलत आहे, असें त्याला दिसलें. त्याचे पाय मंदावले. मुग्धपणें त्या वॉटर लिलीकडे पहात तो कांहींवेळ उभा राहिला. पण मग तें सुंदर फूल काढण्याची इच्छा अनावर होऊन आंगांतले कपडे त्यानें झटकन काढून टाकले, नि तो फुलाच्या दिशेनें पाण्यांत शिरला. किती मोहक दिसत होती ती वॉटर लिली ! पाणी पण उथळच होतें म्हणून खालीं पायाला दगड लागत होते तरी त्याला पोहोतां येत नव्हतें. तो तसाच स्वतःला सांभाळीत पुढें चालला होता. इतक्यांत एकदम त्याचा पाय खोल पाण्यांत पडला नि दोनतीन सेकंदच तो पाण्याखालीं दिसेनासा होऊन पाण्यावर दोनचार वर्तुळें उठलीं. पण दुसऱ्याच क्षणीं तो वेगानें वर आला आणि एक क्षणभर मागें वळून आपण पाण्यांत उतरल्याची जागा त्यानें खुणेनें नीटपणें पाहून घेतली, नि परत तळावाकडे दृष्टी फिरवून त्यानें पाणी कापण्यास सुरुवात केली. तिकडे जरा दूर त्याची ती पांढरी शुभ्र वॉटर लिली, चंद्रप्रकाशांत चमकणाऱ्या हिरव्यागार पर्णसमुदायांत, एकाकीच पण मोठ्या मोहकपणें हालत डोलत होती.

पाण्याच्या हलत्या पृष्ठभागावरून संथपणें हात टाकीत, हातांवरून

खालीं ओघळणाऱ्या नि चंद्रप्रकाशांत चमकणाऱ्या जलबिंदूकडे पहात नि पाण्याच्या शीतलस्पर्शानें आनंदित होत, तो पुढे पुढे चालला होता. पण त्या फुलामधील आणि त्याच्यामधील अंतर अजून कमीच होत नव्हतें. तो पाण्यांत उतरलेली तळ्याची पाळ, आतां बरीच दूर राहिली होती; तरीहि तें फूल अजून पुष्कळच दूर होतें. पण त्यानें तें फूल आज पैदा करण्याचा निश्चयच केला होता. आणि म्हणून तसाच जोरानें पाणी कापीत त्या पांढऱ्या लिलीच्या दिशेनें तो पुढे चालला होता. तें मोहक फूल मोठ्या लाडिकपणें त्याला अजून आवाहन करीत डोलत होतें.

आतां फुलाच्या पुष्कळच जवळ येऊन तो पोंचला होता. चंद्रप्रकाशांत चमकत असलेल्या त्याच्या रजतगौर पाकळ्या त्याला आतां स्पष्टपणें दिसत होत्या. पण त्याच वेळीं आसपास पसरलेल्या जलवेलींच्या विस्तारांत आपले पाय गुंतत आहेत असें त्याला वाटलें. त्यानें सभोंवार पाहिलें. तलावाचा भयाण जलविस्तार त्याच्या भोंवतीं लांबवर पसरला होता. सर्वत्र अगदीं शांत होतें. मधेंच एका माशानें उडी मारल्यामुळें झालेला डुबुक असा आवाज त्याच्या कानावर आला. तो किंचित दचकला. कांहीं विलक्षण भीतीनें त्याचें आंग शहारलें. मोठ्या जोरानें त्यानें आपले गुंतत असलेले पाय सोडवून घेतले आणि आंगांतील शक्तिसर्वस्वच जणुं काय खर्च करून, झपाट्यानें सपासप पाणी कापीत तो मागें किनाऱ्याकडे परत वळला. खालीं पाय लागतांच धांपा टाकीतच त्यानें मागें वळून पाहिलें. ती पांढरी शुभ्र उत्फुल्ल वॉटर लिली, त्या काळ्याभोर पाण्याच्या पृष्ठभागावर, चंद्रप्रकाशांत एकटीच मोठ्या मोहकपणें अजूनहि तशीच हालत डोलत होती ! ... ...

निराशेचा एक दीर्घ सुस्कारा टाकून त्यानें कपडे चढवले आणि त्या फुलाकडे परत एकवार दृष्टि टाकून त्यानें आपलीं पाऊलें साव-काशपणें घराकडे वळवलीं. बागेकडील दारानें त्यानें माजघरांत पाऊल टाकलें. भय्यासाहेबांची कांहींतरी बांधाबांध चालली होती नि माई-साहेब त्यांना मदत करीत होत्या.

'कुठे रे होतास इतका वेळ?' माईसाहेबांनीं विचारलें.

'कोण मी?' त्यानें उत्तर केलें; 'ती वॉटर लिली पहात होतों तळ्यांतून काढाला. पण नाहीं लागली हाताला.'

'कोणाच्याच हाताला लागायची नाहीं कधीं ती,' भय्यासाहेब म्हणाले. 'पण तुला कशाला हवी होती ती वॉटर लिली?'

'माझी एकाकाळची जुनी मैत्रिण आहे ती.' दीनानाथ म्हणाला. 'पण त्यालासुद्धां झालीं आतां पुष्कळ वर्षं!'

## लता

दुसऱ्याच दिवशींची गोष्ट. तिसरे प्रहरचा चहा उरकला होता नि मग कांहीं वेळ इकडे तिकडे केल्यावर लता, दीनानाथाबरोबर फिरण्या-साठीं म्हणून बाहेर पडली. तळ्याच्या काठाकाठानें झाडांच्या थंडगार सावलींतून रमत गमत ती दोघं चाललीं होतीं. भय्यासाहेब दोनतीन दिवसासाठीं बाहेरगांवीं गेले होते. आणि त्यांनीं आपण परत येईपर्यंत दीनानाथाला थांबण्यास सांगितलें होतें. 'तुझी बालमैत्रिण आहेच कीं तुझा वेळ जायला,' ते जातांना म्हणाले होते, आणि लताहि आपल्याकडून तसा प्रयत्न करीत होती. तलावाच्या पलीकडून मागें त्यांच्या मळ्याचा आणि त्यामध्येंच उभ्या असलेल्या त्यांच्या पांढऱ्या

बंगल्याचा देखावा मोठा चांगला दिसत असे. आणि तो पाहण्या-करतांच लता आज दीनानाथाला घेऊन तिकडे चालली होती.

खूप वेळ भटकंती चालली होती त्यांची. अखेरीस चालण्याचा कंटाळा येऊन एका मोठ्या थोरल्या झाडाच्या सावलींत लतेनें बैठक मारली. तिच्या समोरच झाडाच्या खोडाला टेकून तिच्याकडे पहात दीनानाथ उभा होता. पलीकडे कुठेतरी झाडाच्या फांद्यांच्या गर्दीत कोकीळ सुरेल आवाजांत आलापत होता. दीनानाथाला एकदम गतकालांतील त्या गोष्टीची आठवण झाली. अशींच पहाडेश्वराच्या डोंगरावर लता नि तो बसलीं होतीं. त्यानें आनंदानें हंसून लतेकडे पाहिलें नि विचारलें, 'करवंद पाहू या का आपण?'

'अवकाश आहे त्यांना थोडा अजून.' ती म्हणाली.

'पण कांहींतरी पिकाला लागली असतील कीं नाहीं?'

लतेनें मूकपणेंच मान हलविली आणि तिनें उठून परत चालण्यास सुरवात केली. मूकपणेंच त्यांचं फिरणं चाललं होतं. पण त्याची दृष्टी-मात्र चालत असतां एकसारखी तिच्याकडे वळत होती. एखाद्या सलिललहरीप्रमाणें तिचीं पाऊलें मोठया नाजुकपणें पडत होतीं. चालतां चालतां मध्येंच तो अभावितपणें थोडा मागे पडे, आणि मग अगदीं आसुसलेल्या नजरेनें तिच्या त्या मोहक डौलदार हालचालीकडे तो पहात राही.

आतां तीं तलावाच्या पलीकडच्या बाजूला आलीं होतीं. दुतर्फा पसरलेल्या गर्दराईच्या त्या मधल्या उघड्या दिंडी दरवाजांतून पलीकडे, कोवळया पिवळ्या उन्हांत आराम करीत शांतपणें पसरलेला क्षितिज रेषेपर्यंतचा भू भाग अतिशय रम्य दिसत होता. त्या सौंदर्याकडे अनि-

मिष नेत्रांनीं पहात दीनानाथ कांहीं क्षण उभा होता. लतेच्या झालेल्या कांहीं हालचालीनें त्यानें तिकडे पाहिलें, खालीं जवळच उमललेल्या एका रानफुलाकडे त्याचें लक्ष वेधलें. त्यानें तें झटकन तोडून आपल्या हातांत घेतलें. एक क्षणभरच त्याच्या चेहऱ्यावर दुःखाची छटा उमटली. 'तुला माहीत आहे हें फूल ?' त्यानें लतेकडे पहात विचारलें.

'तिनें कांहींशा प्रश्नार्थक नजरेनेंच त्याच्याकडे पाहिलें. 'कुसरीचं फूल आहे तें. पुष्कळ वेळां रानांतून पाहिलं आहे मी तें.'

'माझी एक चोपडी आहे घरीं. त्यांत कविता लिहून ठेवीत असें मी मागें; पण तें संपलं म्हणा कधींच. त्या चोपडींत आहे एक कुसरीचं फूल. सुकून गेलं आहे केव्हांच तें म्हणा. पण तुला माहीत आहे मला कोणी दिलं होतं तें ?'

तिनें कांहीं न बोलतां नुसती मान हलविली. पण तिची दृष्टी मात्र त्याच्या हातांतील त्या फुलावर खालीं लागली होती. दोघंहि कांहींक्षण तशींच स्वस्थपणें उभीं होतीं. जरा वेळानें तिनें वर पाहिलें. तिच्या डोळ्यांत अश्रू तरळत होते.

'लता !' हलक्या आवाजांत तो म्हणाला, 'तिकडे दूर — त्या निळ्या डोंगर माथ्यापलीकडे — आपलं बाल्य आतां कायमचंच निघून गेलं आहे. येतील कां ग ते गोड दिवस पुन्हां ?'

मग कोणीच कांहीं बोललं नाहीं. तळ्याच्या कांठाकांठानें त्यांचा प्रवास परत मूकपणें सुरू झाला. हवेंत ऊष्मा आतां चांगलाच वाढला होता नि तिकडे पश्चिमेकडे काळ्या ढगांची ये जा सुरू झाली होती.

'वळवाचा सरवा येणारसा दिसतो आहे,' जलद पाऊल उचलीत लता म्हणाली. दीनानाथानें कांहीं न बोलतां मान हलवली आणि

दोघंहि झपाट्यानें पाऊल उचलीत तळयाच्या पाळीला वळसा घालून घराकडे वळलीं. लता खालीं मान घालून कांहीं न बोलतां चालली होती. पण तिच्या हाताच्या बोटांचा पदराशीं चाललेल्या चाळयावरून आणि तिच्या उदास चेहऱ्यावरून तिच्या मनांत विचारांचे कांहीं तरी काहूर उठल्याचें स्पष्ट दिसत होतें. दीनानाथ तिच्या खालीं पहात असलेल्या चेहऱ्याचें सूक्ष्मपणें निरीक्षण करीत होता. ओठावाटे व्यक्त होण्यास नाखूष असलेलें तिचें हृदय, त्याच्याशीं त्या अवनत मुखावाटे मूकपणेंच जणुं काय बोलत होतें. आणि त्याची दृष्टि आपल्या चेहऱ्याकडे आहे या जाणीवेने तर लतेचा अस्वस्थपणा वाढतच होता.

बागेच्या फाटकाशीं एक वृद्ध भिकारी व एक अस्थिपंजर बाई तोंडानें गाण्याचे सूर काढीत, केविलवाण्या आवाजांत याचना करीत उभीं होतीं. दीनानाथानें खिशांत हात घातला; पण लतेनें चपळाई करून पोलक्याच्या खिशांतून एक अधेली त्यांच्या हातावर टाकली आणि फाटक उघडून ती झपाट्यानें आंत बागेंत दिसेनाशी झाली. एक अस्पष्ट हुंदका दीनानाथाच्या कानांवर आला. झटकन पुढें होऊन तिला थांबवावें असें एकदां त्याच्या मनांत आलें. पण तो विचार बाजूस सारून तो तिथेंच जरा वेळ उभा राहिला. ती भिकारीणहि अजून ते हातांतले पैसे तसेच धरून चकित झाल्यासारखी स्वस्थ उभी होती.

'आतां काय पाहिजे ?' दीनानाथानें विचारलें.

ती एकदम दचकली. 'कांहीं नको साहेब,' ती मग म्हणाली आणि विस्फारीत नेत्रानीं एकवार त्याच्याकडे पाहून ती मागें वळून चालूं लागली. तो कांहींतरी पुटपुटला. पण तिचें तिकडे लक्ष नव्हतें. आपल्या वृद्ध बापाचा हात धरून ती निमूटपणें झोंपड्यांकडे वळली

होती. म्हातारा आपल्या घोगऱ्या आवाजांत एकतारीवर म्हणत होता. 'एक दिन जाना है भाई — एक दिन...' तिनेंहि आतां त्याची साथ करण्यास सुरुवात केली.

दीनानाथानें चमकून तिकडे पाहिलें. कांहीं आणखी जुन्या स्मृती त्याच्या मनांत जाग्या होत होत्या नि कांहीं जुने सूर त्याच्या कानांत घुमत होते. कांहीं वेळ तसाच फाटकावर हात ठेवून तो अस्वस्थपणें उभा होता. जरा वेळानें आपल्या तंद्रींतून जागा झाल्यासारखा फाटक उघडून तो आंत आपल्या खोलीकडे वळला.

गड्यानें खोलींत दिवा आणून ठेवलाच होता. टेबलावरील आपली फाईल पुढें ओढून त्यानें पानें चाळण्यास सुरुवात केली. पण त्याचे विचार दूर दूर कुठेंतरी सैराटपणें भटकत होते. अर्ध्या पाऊण तासाच्या निष्फळ प्रयत्नानंतर त्यानें फाईल बाजूस सारली आणि तो उठून खालीं आला. आंत माजघरांत कोणींच नव्हतें. दिव्याचा मंद प्रकाश चोंहीकडे पसरला होता. पलीकडे पाटावर लतेचा रेशमी रुमाल पडलेला त्याला दिसला. आत्तां सायंकाळीं फिरायला जातांना तोच तिच्या हातांत त्यानें पाहिला होता. त्यानें तो वर उचलला. पण आपल्या हाताला जणुं कांहीं चटके बसत आहेत असें त्याला वाटलें, आणि त्यानें तो परत तसाच खालीं पाटावर ठेवून दिला.

त्याचा अस्वस्थपणा आतां वाढत चालला होता. तो परत तसाच बागेचें फाटक उघडून बाहेर पडला. आणि कांहीं वेळापूर्वी त्यांनीं दोघांनीं एकत्र पायाखालीं घातलेला तो प्रदेश त्यानें परत भटकून काढला. तो परत फिरला तेव्हां सर्वत्र सामसूम झालें होतें. गुरांच्या गोठ्याजवळच गाडी सोडून ठेवलेली दिसत होती. भय्यासाहेबांना

पोंचवून गडी परत आला होता. त्यालाहि जेवायचें नव्हतेंच, म्हणून तो सरळ वर आपल्या खोलीकडेच गेला. खालीं माजघरांत माई-साहेबांचा आवाज अजून ऐकूं येत होता. खिडकीजवळ पसरलेल्या आराम खुर्चीवर तो स्वस्थपणें बसला. बाहेर चंद्रप्रकाशांत शांतपणें झोंपी गेलेल्या मधु कुंजाच्या शेत जमीनींकडे पहात तो स्वस्थपणें पडला होता. रात किड्यांचा किर्र असा आवाज त्याच्या कानांवर येत होता. पण त्याच्या स्वतःच्या हृदयाची चाललेली धडधडच त्याला अधीक स्पष्टपणें ऐकूं येत होती. खालीं घरांतहि आतां सर्व कांहीं सामसूम झालें होतें. माजघरांतील मोठ्या घड्याळाचे तासा अर्ध्या तासांचे टोले त्याला चांगले ऐकूं येत होते. रात्र वाढत चालली होती. पण त्याची झोंप दूर पळाली होती. बाह्यजगताकडे त्याचें कुठेंच लक्ष नव्हतें. तो तसाच बाहेर पहात स्वस्थ पडला होता. पण त्याच्या मनःसागरावर उसळलेलें वादळ मात्र वाढत्या रात्रीबरोबर अधीकच प्रक्षुब्ध होत होतें.

तासा मागून तास पुढे जात होते. पण तो अजूनही तसाच तिथे बसला होता. विचारांचा वेग अखेरीस असह्य होऊन तो खुर्चींतून उठला आणि खिडकींतून त्यानें बाहेर पाहिलें. पानांची मंद सळसळ सुरू झाली होती. तिकडून कामकऱ्यांच्या खोपडयांकडून कोंबडयाच्या आरवण्याचा आवाज आतां कानावर येत होता. समोरील काळ्या-निळ्या आकाशाच्या पूर्व भागांत पिवळ्या तांबड्या छटा उमटूं लागल्या होत्या; आणि उषःकालीन वायूच्या शीतल झुळुकी त्याच्या तप्त मस्तकाला स्पर्श करून त्याला शांत करण्याच्या प्रयत्नाला लागल्या होत्या. कोंबडयांचा आवाज आतां वाढूं लागला आणि जाग आलेल्या कोकीळानें आपली पहिलीच लकेर वाऱ्यावर उधळली.

दीनानाथ एकदम तेथून आपल्या टेबलाजवळ आला. हातानें चांचपडून त्यानें कागद पेन्सील पुढे घेतली आणि त्या अंधुक उजेडांत एक चिठी लिहून ठेऊन त्यानें आपली कोट टोपी चढवली; आणि कोपऱ्यांतील आपली काठी हातांत घेऊन पायांचा आवाज होऊं न देतां तो खालीं आला.

आंत अजून कोणीच उठलेलें दिसत नव्हतें. पण संधिप्रकाशानें मात्र निखिल वस्तुजात उजळण्याचें आपलें काम, गजांच्या उघडया खिडकींतून मूकपणें तेथेंहि सुरू केलें होतें. एक क्षणभरच माजघराच्या दाराजवळ तो थांबला. जवळच स्वस्थपणें झोंपीगेलेली घरांतली मांजरी मात्र त्याला पहातांच उठून नि आपल्या पाठीची कमान करून त्याच्या पायाला आपलें आंग घाशीत उभी राहिली. बाहेर आतां झाडाफांद्यावरून सुरू झालेली पाखरांची किलबिल, रात्र संपली असेंच साऱ्यांना एकमुखानें सांगत होती.

आंत कोणीतरी दार उघडल्याचा मंद आवाज झाला. कोणाची तरी पाऊलें वाजलीं. त्यानें तिकडे पाहिलें. त्याच्याकडे खिन्नपणें पहात लता उभी होती. तिनें जवळ येऊन आपला हात हळूच त्याच्या खांद्यावर ठेवला. तिच्या ओठांची क्षणैक हालचाल झाली. पण त्याला कांहींच ऐकूं आलें नाहीं.

जरा वेळानें ती म्हणाली: 'परत येणार नाहींस कधीं तूं आतां. मला ठाऊक आहे; खरं सांग, दीना! परत कधींच येणार नाहींस तूं आतां!'

'नाहीं, कधींच नाहीं!' तो उद्गारला.

तिनें एक दीर्घ निश्वास टाकला नि आपला हात जडपणें त्याच्या

खांद्यावरून काढला. पण तिच्या तोंडून कांहींच उच्चार झाला नाहीं. तो तसाच पुढे दाराशीं आला. पण परत एकवार तो मागें वळला. ती होती तशीच त्या ठिकाणीं त्याच्याकडे असहाय दृष्टीनें पहात निश्चल उभी होती. किती करुण रम्य! तो दोन पाऊलें पुढे आला, आणि मोठ्या आवेगानें त्यानें आपले बाहू पसरले. पण मग दुसऱ्याच क्षणीं पराकाष्ठेच्या मनःसंयमानें तो मागें फिरला आणि त्यानें दाराबाहेर ताठरपणें पाऊल टाकलें.

बाहेर सर्व सृष्टी आतां मधुर प्रकाशांत न्हाऊन निघत होती. आणि पानांपानांवरून नि त्यांमधूनच पसरलेल्या कोळयांच्या जाळयांवरून दंवबिंदू मोत्यांच्या सरांसारखे विखुरलेले दिसत होते. एकदांहि मागें वळून न पाहतां तो झपाट्यानें पुढें चालला होता. क्षणाक्षणानें तो विश्रब्ध मधुकुंज त्याच्या मागें अदृश्य होत होता आणि समोर विशाल जगाचें स्वरूप क्रमाक्रमानें विस्तारत होतें. ......

## वृद्ध दीनानाथ

चंद्रप्रकाश आतां खिडकीच्या वर सरकला होता. आणि खोलींत अंधाराची छाया पसरत होती. पण वृद्ध दीनानाथ अजून तसेच आपल्या आरामखुर्चींत छातीवर स्वस्तिकाकार हात धरून, खोलींतील त्या भकास एकांतांत समोर पहात स्वस्थ बसले होते.

आस्ते आस्ते त्यांच्यासमोर पसरलेला तो भकास अंधार वितळून त्याचे जागीं तें विस्तीर्ण सरोवर उभें राहिलें. त्याच्या त्या विशाल पृष्ठ भागावरून काळयाभोर लाटा एकामागून एक पुढें सरकत चालल्या होत्या. आणि त्या सर्वांच्या पलीकडे, आपल्या पार आटोक्याबाहेर,

ती मोहक शुभ्र वॉटर लिली आपल्या रुंद पानांच्या विस्तारांत एकटीच लाडीकपणें डोलत असलेली दीनानाथांना दिसत होती ! ......

दार उघडलें, आणि टेबल लँपचा झगझगीत प्रकाश खोलीभर पसरला.

'शाबास रामप्पा,' दीनानाथ म्हणाले. 'ठेव, टेबलावर ठेव तो.'

त्यांनीं आपली खुर्ची मग जरा पुढें ओढली, टेबलावरील एक उघडेंच पुस्तक पुढें घेतलें आणि आपल्या तारुण्यांतील सर्वशक्ती खर्च केलेल्या त्या विषयांत ते पूर्णपणें गढून गेले.

---

ग्रंथ संग्रहालय,
अनुक्रम............
विभाग...............
क्रमांक
नों. दि.

# भयभीत

झिन्नत आपल्या प्रियकराच्या बंगल्याच्या पायऱ्या उतरत होती. आजहि त्याच अकारण भीतीनें मागील कित्येक वेळांप्रमाणें तिचें अंतःकरण विलक्षण धडधडत होतें. आपल्या डोळयापुढें अंधारी येत आहे नि शरीराचें सारें अवसान गळून पडत आहे असें तिला वाटलें. तिनें एकदम त्या भव्य जिन्याच्या गुळगुळीत कठड्याचा आश्रय घेतला. अगदीं परिचित झाला होता तिला आतां हा प्रकार. अगदीं असंच कित्येक वेळां तिला मागे झालं होतं. बहुतेक प्रत्येक खेपेला त्या आगंतुक नि अकारण भीतीनें तिला भेदरवलं होतं. पण तिथून परत येण्यापेक्षां जाण्याच्या वेळींच खरं म्हटलं तर तिचा सर्व मार्ग धोक्यानें पुरापुरा भरला होता. आणि आतां सर्व कांहीं झाल्यावर भीतीनें तिची अशी गाळण उडावी हें जरा चमत्कारिकच होतं. पण घरांतून बाहेर पडतांना असं वाटणं स्वाभाविक होतं. कारण नाक्यावरच टॅक्सींतून उतरून आपल्या प्रियकराच्या घराचा मार्ग तिनें घाई घाईनें आक्रमला होता. पण नंतर त्या लाघवी नि मोहक वातावरणांतील सुखाच्या अमर क्षणांत तिची भीती केव्हांच पार बुडून गेली होती. पण परत फिरण्याचा क्षण जवळ आला — कीं मग — तें

विलक्षण भय नि स्वतःच्या अपराधाची जाणीव आपल्या तुफानी वेगानें तिला ग्रासून टाकीत. वाटेंतले सारे रस्तेसुद्धां जणूं कांहीं आपले डोळे विस्फारून तिचा निषेध करीत आहेत असें तिला वाटे. आणि सहवास सुखाचे शेवटचे मदिर क्षणसुद्धां या आगामी भीतीनें विषारून जात. पायांतील मऊ मखमली सपाता सरकाऊन नि आपली झिरझिरीत जरीची ओढणी गळयाभोंवती लपेटीत असतां तिचे हात कांपत, नि तेथून बाहेर पडण्याची तिला विलक्षण घाई होई. केव्हां एकदां सुखरूपपणें आपण आपल्या घराच्या सुखद उबाऱ्यांत जाऊन पडतों, असें तिला होऊन जाई. नि मग प्रिय फैय्याझचें तें तिच्या कानाशीं तोंड नेऊन तिला हळुवारपणें कुरवाळीत केलेलें लाडीक बोलणें नि सुखद ओष्ठस्पर्श तिच्या अंतरंगांत शिरत नसे. त्याचे तिला पुनः पुन्हां धीर देणारे ते शब्द तिला कांहींच धीर देत नसत. आपल्या गाडींत शिरेपर्यंत आपल्याला कुणी भेटणार तर नाहींना, या एका भीतीनेंच तिच्या सर्वांगाचा पूर्णपणें कबजा घेतलेला असायचा. जिन्यावरच आपल्याला कुणी गांठणार नाहींना ? खोलीच्या दाराशीं मग थबकून कानोसा घेत कांहीं क्षण श्वास कोंडून ती उभी राही. पण संकट तिच्यासाठीं आज दबा धरून बसलें होतें. तिची छाती त्या आगामी संकट छायेनें आतांच धडधडत होती नि खालच्या मजल्याच्या जिन्याशीं ती येऊन पोंचेपर्यंत तिचा जीव अगदीं उडून गेला.

कांहीं क्षण त्या अंधाऱ्या भागांत जिन्याच्या वरच्या पायरीवर ती थांबली. खालून येणाऱ्या वाऱ्याच्या थंडगार झुळुकींचा तिनें एकदोन क्षण आस्वाद घेतला. कोठेंतरी दाराचा जोरदार आवाज झाला. एकाद्या जंगाली जनावराच्या उपजत बुद्धीनेंच तिनें आपली ओढणी

मस्तकावरून जरा पुढें ओढली नि मग आपलें सर्वांग जणुं काय सांवरून ती झपाट्यानें पायऱ्यांवरून खालीं उतरली. काच्या कसून अथांग जलप्रवाहांत एकाद्या तीरासारखा घुसणाऱ्या जवानाप्रमाणें तिनें वेगानें खालील दार गांठलें. आतां दोन पायऱ्या ओलांडल्या कीं रस्ता — ! पण कोणाचा तरी तिला जोरानें धक्का बसला. समोरून कोणीतरी स्त्री तिच्या रोखानें आंत येत होती. झिन्नत घाईघाईनें, " माफ करा हं, " असें पुटपुटली नि पुढें निसटली. पण त्या आंत आलेल्या स्त्रीनें आपले हात पसरून तिची वाट अडवली. कांहींतरी कर्कश, घोगरा आवाज झाला नि तिच्या कानांवर बोंचक विषारी शब्द पडले.

" अखेरीस सांपडलांत म्हणायच्या बाईसाहेब आपण, अं ! अगदीं वाटच पहात होत्यें आपली मी. चांगला सोन्यासारखा संसार नि नवरा आणि तीं गोजिरवाणी पोरं नाहीं पुरेशी झाली अं, बाईसाहेबांना ? आणि माझ्या गरीबाच्या तोंडचा हा प्रेमाचा घांस आलांत नाहीं हिसकाऊन घ्यायला ? पण..."

" चूक होते आहे तुमची बाई," पुढें निघून जाण्याचा प्रयत्न करीत झिन्नत पुटपुटली. पण त्या बाईनें आपल्या प्रशस्त देहानें तिची वाट पूर्णपणें अडवून धरली होती.

" अंहं; मुळींच फसायची नाहीं मी अशा कांगाव्यानें ! अगदीं बरोबर ओळखली आहे मी तुला. आत्तांच बाहेर पडते आहेस तूं फैय्याझच्या खोलींतून. पण हें बघ, माझा — अगदीं पूर्णपणें माझा आहे फैय्याझ ! समजलीस ? आत्तां समजलं मला, इतका कसला मला भेटायलासुद्धां त्याला वेळ नाहीं तो. तुझे — तुझे आहेत हे सारे पराक्रम बया ! ..."

"पण हलू — मेहेरबानी करून जरा हलू!" झिन्नतच्या सुकलेल्या कंठांतून कसे तरी उद्गार आले.

ती दोन पाऊलें जरा मागें सरली. ती दारांतली स्त्री तिरस्कृत दृष्टीनें आतां तिच्याकडे पहात होती. झिन्नतचा पडलेला चेहेरा नि तिची अगतिक, असहाय स्थिति पाहून त्या स्त्रीला बरेंच वाटत होतें. तिच्या चेहेऱ्यावर आतां समाधान उमटलें होतें नि आपल्या बोंचक डोळ्यांनीं एखाद्या क्रूर जनावराप्रमाणें आपल्या शिकारीचें ती आपादमस्तक निरीक्षण करीत होती.

"बघा, रुबाब बघा बाईसाहेबांचा एकंदर! नि लग्नाची बाईल बरं का ही, चांगल्या घरांतली. पण आमच्या प्रेमांत कशाला ग बाई शिरा?" जरा खालच्या आवाजांत आपल्याशींच पुटपुटल्यासारखी ती बोलत होती. "आणि डोक्यावरील ही ओढणी कशाला ग बाई? तोंड लपवायला, नि परत आपली साळसुरत मिरवायला नाहीं का..."

"कोण पाहिजे तुम्हांला?" झिन्नतनें विचारलें. "मला कांहीं तुम्हांला पाहिलेलं आठवत नाहीं कधीं. चला, उशीर होतो आहे मला......"

"उशीर? हं हं! उशीर होतो आहे नाहीं का तुम्हांला. वाट पहात असतील तिकडे आपले यजमान, नाहीं का? होऽ! आणि सारं कांहीं नीटनेटकं केलं आहे कीं नाहीं नोकरांनीं, तें नको का बघायला बाईसाहेबांना. नि सायंकाळचा सारा साजशृंगारहि व्हायचा असेल ना पुन्हां? पण आमच्या सारख्यांची कुठें कींव यायची आहे तुम्हांला. आमचं हें एकुलतं एक, उरलंसुरलं सुखसुद्धां तुम्ही हिस्काऊन घ्यायला बसलाच आहांत......"

झिन्नतनें आपल्या काळ्या कुळकुळीत लेदर बॅगमधें हात घातला

नि आंतल्या साऱ्या नोटा बाहेर काढून त्या तिनें त्या बयेच्या हातांत कोंबल्या. " हं, हें घे...हे घे सारे पैसे...नि जाऊं दे मला एकदां इथून...परत नाहीं यायची मी कधीं इथें...अंहं, अगदीं कधधी नाहीं...अल्लाची कसम..." झिन्नत घोगऱ्या आवाजांत पुटपुटली.

सूडाचें परत एकवार विषारी हास्य करीत पण अधाशीपणानेंच त्या स्त्रीनें त्या नोटा घेतल्या नि तिनें झिन्नतची वाट सोडली. "वेसवा मेली!" झिन्नत बाहेर पडत असतां ती फुसकारली.

त्या प्रखर फटकाऱ्यानें झिन्नत शरमेनें अगदीं अर्धमेली झाली नि लाजेनें काळवंडलेला आपला चेहेरा ओढणीनें पूर्णपणें झांकून घेऊन जवळजवळ धांवतच तिनें बाहेर रस्त्यावर पाऊल टाकलें. आपल्या आसपासची कसलीच शुद्धबुद्ध तिला आतां उरली नव्हती. रस्त्याच्या पुढल्या कोपऱ्यावर तिची वाट पहात उभ्या असलेल्या टॅक्सीकडे ती झपाट्यानें जात असतां, सभोंवारचें मानवी जग धुक्यानें सारवल्यासारखें तिला भासत होतें. आपलें सारें शरीर कसल्या तरी ओझ्याखालीं दडपत आहे असें तिला वाटलें. कसेंबसें तिनें आपलें आंग गाडींतील त्या मऊ बैठकीवर टाकलें. तिनें आपले पांढरे फिक्कट पडलेले ओठ घट्ट आवळले होते, आणि तिचे सर्व मनोव्यापार जणुं पार थिजून गेले होते. कांहीं क्षण लोटले, तरी तिच्याकडून कांहींच सूचना न आल्यानें ड्रायव्हरनें जरा आश्चर्यानें तिला विचारलें. "कुठे जायचं बाईसाहेब?" पण झिन्नतनें विकारशून्य नजरेनें त्याच्याकडे एक क्षणभर पाहिलें. आणि मग विलक्षण प्रयासानें स्वतःला कसेंबसें सावरून ती म्हणाली, "चलो स्टेशन."

परत एकदम त्या बाईचा चेहेरा तिच्या डोळ्यांपुढें उभा राहिला

नि ती आपल्या पाठीशीं एकाद्या पिशाचिनीप्रमाणें धांवत असेल अशा कल्पनेनें ती पुन्हां घाईघाईनें म्हणाली, "चलो, चलो दौडो जलदी, अगदीं टॉपस्पीड !"

आणि मग भरवेगानें गाडी दौडत असतां तिचेहि विचार दौडत होते. किती घाबरून गेलों आहोंत आपण या आकस्मिक भेटीनें ! आपले हातसुद्धां कसे थंडगार, निर्जीव झाले आहेत; जडजड लोखंडाचेच बनले आहेत जसे. आणि मग तिचें सर्वांग कांहीं विलक्षण रीतीनें थरारलें. तोंड कोरडें पडलें, जीभ जशी कांहीं टाळूला चिकटल्यासारखी तिला वाटली आणि कपाळपट्टी घामानें चिकचिकल्या सारखी भासली. कसें चमत्कारिक घाबरल्यासारखें, कोंडल्यासारखें तिला वाटत होतें. ती विलक्षण भीतिदायक स्मृती दूर घालवून द्यायला आपण आतां मोठ्यानें ओरडावें किंवा कशावर तरी जोरानें आघात करावा असें तिला वाटलें. पण ती आठवण अगदीं खोल खोल गाळांत रुतल्यासारखी तिच्या मस्तकांत जाऊन घुसली होती. अग आईगऽ ! काय तो भेसूर चेहेरा; खुनशी विचारानीं किती विद्रूप दिसत होता तो. आणि एकाद्या घिसाडणीसारखे तिचे ते हावभाव नि आंगाला येत असलेला, ओंगळ घामट वास...ईऽऽऽ ! केवढ्या मोठ्यानें ती ओरडत होती बया नि हात काय नाचवीत होती. शी !... मोटारीच्या वाढत्या वेगानें शरीर खालीवर जोरानें हिसळत असतां तिच्या मनांतल्या त्या विचारानीं तिला जणुं कांहीं किळस येत होती. पण, किती वेगानें चालली आहे ही गाडी ! सांगू का वेग जरा कमी करायला ? आणि मग तिला एकदम आठवलें कीं आपण आपले सारे पैसे त्या बयेच्या डोक्यावर आदळले आहेत. आतां ? — तिनें एकदम गाडी खडी करण्यास सांगितलें, आणि

ड्रॅगेंतली शिलकी चिल्लर ड्रायव्हरच्या हातावर टेवून, आश्चर्यानें तोंडाचा आ करून तिच्याकडे पहात असलेल्या त्याच्या चेहऱ्याकडे न पाहतां, घाईघाईनें टॅक्सीचें दार धाडकन मागें लोटून ती चालूंहि लागली. आतां चालत चालतच घर गांठणें तिला भाग होतें. सभोंवार दिसणारा शहराचा भाग तिच्या फारसा परिचयाचा नव्हता, आणि तिच्याकडे रोखून पहात असणाऱ्या दुकानदारांच्या व येणाराजाणारांच्या मवाली नजरांची तिला अतिशय भीतीि वाटली. तिला आज बसलेल्या भीतीच्या आकस्मिक हादऱ्यानें तिचें सर्वांग अजूनहि थरथरत होतें आणि तिचें पाऊलहि मोठ्या कष्टानें पडत होतें. पण घरापर्यंतची सारी वाट पायानींच रखडणं तिला भाग होतं. म्हणून आंगांतील सारी शक्ती एकवटून ती आस्ते आस्ते वाट चालत होती. पण पाण्यांतून चालल्यासारखेंच तिचें पाऊल मंद पडत होतें. आणि अखेरीस तिनें एकदांचें आपलें घर गांठल्यावर तिला जरा हायसें वाटून धांवतच ती घराच्या पायऱ्या चढणार होती. पण हें काय आज वेगळंच ! शंका नाहीं का अशानें कुणाला यायची ? तिचं तिच्याच मग लक्षांत आलें.

पुढल्या ओटीवर तिची मोलकरीण कपड्यांच्या घड्या घालीत उभी होती. वरून माडीवरून तिच्या अवखळ छोकऱ्याचे हास्यकल्लोळ तिच्या कानीं आले. छोट्या सकीनेशीं हुदडत असेल बहुधा स्वारी, ती पुटपुटली. आपल्या सत्तेच्या घरांत तिनें आतां पाऊल ठेवलें होतें. सभोंवार पसरलेलें तिचें सारं सामान तिचा आत्मविश्वास परत आणीत होतें. आणि आत्मविश्वासाच्या त्या नेहमींच्या मुखवट्याची तिला नाहीं तरी आतां जरूरच होती. आपल्या हातांच्या लालचुटुक नखांच्या नाजूक बोटांनीं तिनें आपलें कपाळ नि भुंवया हळुवारपणें दाबल्या

आणि चेहऱ्यावर आनंदाची नेहमींची पखरण पसरीत जेवणाच्या आंतील खोलींत तिनें पाऊल टाकलें. बॅरिस्टरसाहेब हातांत 'ईव्हिनिंग न्यूज' घेऊन वाचीत बसलेले तिला तिथें दिसले.

"उशीर झाला तुम्हांला आज," किंचित नाखुषीदर्शक आवाजांत ते म्हणाले. आणि मग तिथून उठून जेवणाच्या टेबलाशीं येऊन बसतांना त्यांनीं हळुवारपणें तिच्या पाठीवर थोपटलें.

प्रेमाच्या या नित्याच्या आविष्कारानें आपल्या अपराधाची तिला परत तीव्र जाणीव आली नि चेहऱ्यावरील ते भाव लपविणें तिला मोठें कठीण गेलें. आपल्या नेहमींच्या जागेवर तीं दोघंहि येऊन बसलीं होतीं. हातांतील पेपरवरून दृष्टी न काढतांच बॅरिस्टरसाहेबांनी परत विचारलें; "कांहो, एवढा उशीर कशानें झाला आज?"

"अं...बोलत बसल्यें होत्यें जरा....आपल्या अमीनाबीशीं... नि थोडी खरेदीहि करायची होती तिला...मीहि गेल्यें मग तिच्या बरोबर."

छट; चुकलंच सारं! आधींच नक्की होतं का चांगलसं उत्तर तयार ठेवायला? ही कसली अडाणी सबब. चीड आली स्वतःचीच तिला. नेहमीं ती चांगलीशी सबब आधींच तयार करून ठेवीत असे. पण आज त्या भयानें ती पार गांगरून गेली होती. आणि आतां अझीझला जर का....

"काय ग, काय झालं झिन्नत?" अझीझनें विचारलें, "अशी घाबरली आहेस कां; आणि ही ओढणी काय अजून अशीच ठेवली आहेस इथें?"

तिचा हात एकदम तिचे पाय ओढणाऱ्या त्या घातकी ओढणीकडे

गेला. झालं, पुन्हा घसरलं! घाबरटलेल्या मनानें ती आपल्या खोली-कडे धावली. खोलींतील पूर्ण उंचीच्या आरशासमोर आतां ती उभी होती. किती बावरल्यासारखे दिसत होते तिचे डोळे. छे, हें असं नाहीं उपयोगी. स्वतःच्या मनाला परत नीट सांवरायला तिला मग फार वेळ नाहीं लागला. केंसांवरून हळुवारपणें एकदां कंगवा फिरवून नि चेहऱ्यावर पावडरपफ नाजूकपणें फिरवून, ठाकठिकीनें ती परत जेवणाच्या खोलींत गेली.

वाढपिणीनें रोजच्या सारख्या प्लेट्स् तयार केल्यावर त्यांनीं जेवणास सुरुवात केली. दोघांचेंहि जेवण आज जरा मूकपणेंच चाललें होतें. आणि मधूनच जेव्हां केव्हां चार दोन शब्दांची देवघेव होई तेव्हांसुद्धां त्यानां अडखळल्यासारखें वाटे. झिन्नतच्या डोक्यांत तर विचारांचा नुसता गोंधळ उडाला होता. आणि जरा कुठे विचारांना स्थिरता आली, तर कांहीं तासापूर्वींच झालेल्या त्या कैदाशिणीच्या भेटीचे भयंकर विचारच तिला अस्वस्थ करीत. आणि मग आपल्या अस्वस्थपणाला जरा आवर घालण्यासाठीं आपल्या सभोंवारच्या त्या परिचित वस्तूंकडे अधीरपणें तिनें आपली दृष्टी वळवली. अनेक प्रेमळ स्मृतींशीं निगडित असलेल्या त्या परिचितांच्या दर्शनानें तिच्या मनाला मग थोडी शांति आली. चेहऱ्यावर समाधान स्फुट अस्फुटपणें वावरूं लागलें. आणि थोड्याच वेळांत समोरच्या भिंतीवरील मोठया जर्मन घड्याळाच्या मंद्रस्वरांत पडणाऱ्या ठोक्यानीं त्या खोलींत पसरलेल्या शांततेचा भंग केला नि तिच्या संतप्त शरीरावर एकाद्या कुशल मांत्रिकाप्रमाणें हळुवारपणें फुंकर घालून त्याला पूर्णपणें शांत केलें. नेहमींची आनंदी झिन्नत आतां परत मोकळेपणानें वावरत होती.

सकाळीं बॅरिस्टरसाहेब आपल्या चेंबरमध्यें गेल्यावर नि मुलांच्या आयानें त्यांना बाहेर नेल्यावर मगच झिन्नतला खराखुरा एकांत मिळाला. काल संध्याकाळपासून घडलेल्या साऱ्या गोष्टींचा शांतपणें विचार केल्यावर तिच्या विचारांना जरा स्थैर्य आलें नि मनावर आकस्मिकपणें आलेलें भीतीचें तें जड दडपण दूर फेंकलें गेलें. तिला आतां आठवलें कीं आपण ओढणी चांगली घेतली असल्यानें आपला सारा चेहेरा मोहोरा कांहीं त्या बयेला नीट दिसला नसेल. मग काय, आतां यापुढे थोडें सावधगिरीनें वागणें कांहीं मोठेसें कठीण नाहीं. फैय्याझच्या मकाणांत कांहीं आपण आतां परत कधींच जायचं नाहीं, म्हणजे झालं. मग कांहीं कालच्यासारखी वेळ नाहीं यायची. आणि ती बया आपल्या टॅक्सीच्या मागून येणं पण कांहीं केल्या शक्य नाहीं. मग आपल्या घराचा माग ती कसा काढणार ? म्हणजे एवढं कांहीं भ्यायला नको आहे आज आपल्याला. आणि समजा, जरी आपल्याला तिनें ओळखलं नि आपला पत्ताहि काढला शोधून, तर दुसरा कांहीं रस्ता नाहीं कीं काय तिला गप्प बसवायला ? भीतीचें तें दडपण आत्तां तिच्या मनावर नसल्यानें साऱ्या गोष्टींचा ती नीट विचार करूं शकत होती. असं कालच्या सारखं घाबरून जाऊन कांहीबाहीच करायचं नाहीं. कबूल म्हणून करायचं नाहीं कांहीच. कानावर हात ठेवायचे अगदीं साऱ्या बाबतींत. आणि समजा भिडलंच अगदीं आंगाशीं येऊन, तर पोलीसची भीति दाखवायला कांहीं कमी नाहीं करायचं. अझीझसारख्या एका नाणावलेल्या बॅरिस्टरची ती पत्नी होती. तिच्याहि कानांवर कायद्याच्या चार गोष्टी नेहमीं येत होत्या. आणि अशा प्रकारच्या धाकदपटशानें पैसे उकळणाऱ्या बदमाषांना सरकारचा सणसणीत पाहूणचार

घ्यायला लावतां येतो, असें अझीझला बोलतांना तिनें अनेक वेळां ऐकलेंहि होतें.

मग आतां आधीं चिठी लिहून — ती सुद्धां अगदीं मोजक्या शब्दांत ——कांहीं दिवस तरी आपली भेट होणार नाहीं म्हणून त्याला कळवलं पाहिजे. आणि काल तर फैय्याझची ती शुद्ध गांवढळ प्रेयसी पाहून तिचा अभिमान चांगलाच दुखावला होता. आंधळ्यासारखेच आपण त्याच्याकडे ओढले गेलों होतों, असंच स्पष्टपणें आतां लिहायचं त्याला. प्रेम नाहीं नि कांहीं नाहीं; आपल्या स्वच्छंदी लहरी स्वभावाचाच परिणाम होता तो. आणि खरंच नाहीं तरी ! चांगलं सणसणीत झोंबलं पाहिजे आपलं हें पत्र त्याला.

एक धंदेवाईक बजवय्या म्हणून त्याची नि तिची प्रथम भेट एका चहापानाचे दिवशीं झाली होती; आणि काय होत आहे याची तिला पूर्ण जाणीव होण्यापूर्वींच तरूण फैय्याझच्या ती आहारीं गेली होती. कशाची तिच्यावर एवढी मोहनी पडली होती हें तिचें तिलाच सांगतां येत नव्हतें. तिच्या मनाला भुरळ घालणारें सौंदर्य किंवा मादक आकर्षणहि त्याच्याजवळ एवढं नव्हतं. किंवा समान आवडी निवडी, विचार नि भावना यांचीहि ओढ तिच्या हृदयाला तशी भासत नव्हती. आणि उन्मादक शरीर विकारांनींहि ती एवढी वेडी झाली नव्हती. पण केवळ त्याच्या इच्छेला प्रतिकार करण्याचा कणखरपणा तिच्यांत नसल्यामुळेंच ती अशी त्याची झाली होती. आणि शिवाय आशुक माशुकांच्या प्रणयाराधनेच्या अनुपभुक्त सुखाची गोडी चाखण्यासाठीं सुद्धां ती त्याच्या पाशांत ओढाळपणें अडकली होती. आतांपर्यंतचं तिचं वैवाहिक जीवन तसं मोठं सुखाचं होतं. आणि वैवाहिक जीवनाच्या सर्व आंगो-

पानांचा मनोहर आस्वाद अझीझच्या उमद्या संगतींत तिनें पूर्णपणें घेतलाहि होता. त्या दोन गोड बालकांची गजबजहि तिच्या घरांत चालूं होती. आणि सांपत्तिक स्वास्थ्य तर तिला हवं तसंच, पूर्ण होतं. पण सर्वतोपरि सुखी जीवन हें दुःखपूर्ण जीवनाइतकंच कित्येक वेळां असहनीय होत असतं; आणि वासनांची अतितृप्ती ही अतृप्ती इतकीच त्रासदायक होते. आणि याच, केवळ याच विचारांनीं झिन्नतला या वाममार्गावर आणून सोडलं होतं.

केवळ एक स्त्री म्हणून तिच्याकडे पाहण्याच्या फैय्याझच्या दृष्टीची आरंभीं तिला मोठी मौज वाटली होती. अझीझच्या अशा केवळ वासनामय वागण्याचा तिला कधीं अनुभव नव्हता. नवीन, कांहींतरी नवीन असं तिला फैय्याझच्या त्या दृष्टींत आकृष्ट करीत होतं. फैय्याझच्या वादनांत वावरणारी एक प्रकारची करुणरम्य छटा पाहून ती त्या दिवशीं प्रथम मोहित झाली होती. आणि सदसद्विवेक बुद्धीची कांचणी थोडी बाजूस सारून नि आपली नेहमींची मर्यादा ओलांडून तिनें त्या तरुण बजवय्याचें जवळून निरीक्षण केलें होतें. आणि त्याच्या वादन कौशल्याबद्दलचा आपला आनंद व्यक्त करतांना तिनें वापरलेल्या शब्दांचा आवेग नि नाविन्य पाहून, त्यानें आपलें मस्तक झुकवून तिच्याकडे रोखून पाहिलें होतें. त्या प्रथम धीट दृष्टिक्षेपांतच त्यानें तिच्या हृदयाची पकड घेतली. लाजेनें नि भीतीनें ती थोडीशी बावरली, पण तिला जरा बरेंहि वाटलें. आणि मग झालेल्या अर्थशून्य शब्दांच्या त्या देवघेवींतून हृदयाची भाषा हृदयाला समजली, नि झिन्नतला त्याच्या परत भेटीची पुरी ओढ लागली. त्यानंतर मग सहेतुकपणेंच दोघांच्या गांठी भेटी होऊं लागल्या. एक दिवस मग त्यानें

नवीन बसवलेल्या पदांच्या चाली ऐकण्यासाठीं तुम्ही याल का, म्हणून त्यानें तिला विचारल्यानंतर तर झिन्नतच्या अहंकाराला गोड गुद्‌गुल्याच झाल्या. आणि कां नाहीं होणार? एक विख्यात कलावंत तिच्या अभिजात रसिकतेला आज लवून मुजरा करीत होता. मोठ्या आनंदानें त्याची ती विनंति मान्य करून फैय्याझच्या बंगल्यावर ती त्या दिवशीं गेली. आणि — दोघांच्याहि ध्यानींमनीं नसतां, प्रेमाच्या त्या गोड नशेंत काय झालें तें कळण्यापूर्वीच, फैय्याझच्या बाहुपाशांत झिन्नत स्वतःला विसरून गेली. भानावर आलेली झिन्नत हें कसें झालें याचें आश्चर्य करीत होती. कारण असा बंधनाच्या पलीकडे जाण्याचा विचार तिच्या मनाला अजून शिवला नव्हता. स्वतःच्या अपराधाची आतां तिला जाणीव झाली. आणि तरीहि, स्वतःभोंवतीं पसरलेल्या शिष्टपणाच्या पोशाकी मर्यादांचें सहेतुक उल्लंघन केल्याबद्दल, तिला जरा बरेंहि वाटलें. पण दुसऱ्याच क्षणीं स्वतःच्या त्या दुष्कर्माबद्दल तिला भीतीहि वाटली. तरीपण या साऱ्या संमिश्र भावना केवळ वरवरच्या होत्या. तिच्या खऱ्याखुऱ्या अंतरंगांत त्याच्या त्या तुफानी प्रेमाविष्कारानें चीडच उत्पन्न केली होती. त्याच्या त्या रांगडी धसमुसळेपणानें ती अस्वस्थ झाली होती. त्याचें आवेशपूर्ण वीनवादन तिला आवडलें होतें. पण... तिच्या स्त्रीत्वाचा त्यानें केलेला चुरगळा. ...!

अभावितपणेंच तिला अझीझची आतां आठवण झाली. तिच्या भोंवती चालणारे त्याचे सर्व प्रेम व्यापार, कसे हळुवार रसिकतेनें चाललेले असायचे. आणि त्यांच्या लग्नाला आतां आठ वर्षें झालीं होतीं तरीहि ते तसेच नाजूकपणें आजहि चालू होते. एखाद्या प्रेमळ भाविकाचें देवताराधनच तें!

तरीहि विवाहित पतीशीं एकदां बेइमानी केल्यानंतर आपल्या प्रियकराच्या उत्कंठेची गोडी अशीच चाखीत राहणें हें कांहीं फारसें कठीण नव्हतें. फैय्याझच्या या भेटीगांठीनीं तिच्या सुखांत कांहीं भरहि पडत नव्हती किंवा तिच्या डोळ्यावरील प्रेम मदिरेचा प्रभाव कमी होत नव्हता. पण अधिक कसलीच अपेक्षा तिला नव्हती. प्रियकराविषयींचं तिचं कर्तव्यच तिला ह्या भेटी घ्यायला लावीत होतं, आणि एक प्रकारची तंद्रा तिचा हा वाममार्ग तिला बदलूं देत नव्हती. आणि थोड्याच दिवसांत मग तिच्या इतर नित्यनैमित्तिक कार्यक्रमांतील तोहि एक आवश्यक विषय होऊन बसला. केवळ एका सामान्य जड सुखसोईची भरच जशी कांहीं तिच्या जीवनांत आतां पडली होती. आणि मग थोड्याच दिवसांनीं वैवाहिक बंधनांतील शास्त्रपूत नि शिष्टसंमत सुखापेक्षां या बंधनापलीकडील सुखांत सुद्धां कांहींच अधिक गोडी तिला वाटेनाशी झाली.

आणि म्हणून धोक्याच्या त्या पहिल्याच स्पष्ट सूचनेनें तिच्या त्या अविचारी सुखाचा पोकळपणा झिन्नतच्या लक्षांत पूर्णपणें आला. अजूनपर्यंत दैवानें जशी कांहीं तिची पूर्ण साथ केली होती. अंगदीं लहानपणापासून तिच्या आईबापांनीं तिच्या सर्व बारीकसारीक इच्छासुद्धां पुऱ्या करून तिला अगदीं लाडावून ठेवली होती. आणि या फाजील लाडांमुळें नाजुक हळुवार बनलेल्या झिन्नतच्या मनःसरोवरावर खूप जोराची खळबळ उडवून द्यायला, आगामी संकटाची एखादी झुळूकसुद्धां पुरेशी होई. आणि म्हणूनच फैय्याझसाठीं स्वतःच्या सुखसोईंत एवढासुद्धां कमीपणा चालवून घ्यायला तिचें मन तिला कौल देत नव्हतें.

दुपारीं फैय्याझचें उत्तर येऊन धडकलें. किती अजीजीनें लिहिलें

होतें त्यानें सारें. तिच्या मनांत मग परत गोंधळ सुरू झाला. काय करावं, टाकावे का हे प्रेमपाश तटकन तोडून? कीं नको. कारण पत्रांतल्या त्या प्रकट प्रेमाविष्कारानें तिच्या अहंकाराला परत बाळसें चढत होतें, नि त्याच्या होणाऱ्या दारुण निराशेमुळें तिला थोडी मोहनीहि पडत होती. त्यानें मोठ्या काकूळतीनें एकाच अखेरच्या भेटीची तिच्याजवळ याचना केली होती. माझं कुठें चुकलं तें तरी निदान मला समजेल, असेंहि शिवाय त्यानें लिहिलें होतें. पण त्याच्या या वाक्यानें एक नवीनच गंमत जशी कांहीं ञिन्नतला सांपडली. आपल्या खऱ्याखुऱ्या विचारांचा त्याला पत्ता लागूं न देतां असाच त्याला झुलवीत अधिक ओढ लाऊं या आपण. हां हां! ठीक आहे हा बेत, तिच्या मनांत आलें. आणि लगेच तशी त्याला चिठी लिहून भेटीची जागाहि तिनें ठरवून टाकली. शाळेंत असतांना प्रेमाचा असा लपंडाव मागें एकदां ती खेळली होती. लग्न झाल्यानंतर आतां इतक्या दिवसांनीं ती तोच खेळ परत खेळणार होती. एकदम बरं वाटलं तिला त्या विचारानें. कारण भावनांचा इतका प्रबळ आवेग तिच्या आयुष्यांत आतां परत प्रवेश करीत होता. आणि त्या सुखद संवेदनांनीं तिच्या एरव्हीं संथ असणाऱ्या प्रवृत्ती तिला आतां उल्ह-सित करीत होत्या.

पण आलीच परत तशी वेळ नि भेटली परत ती बया, तर पार अगदीं ती गोंधळूनच गेली पाहिजे, अशा विचारानें तिनें आपली सर्व वेशभूषा अतिशय काळजीपूर्वक नि आमूलाग्र अशी त्या दिवशीं पालटली. आपली ती गडद निळ्या रंगाची ओढणी कपाटांतून तिनें बाहेर काढली. पण मग ती मस्तकावर घेण्यापूर्वी तुच्छतेनें एकवार

नाक मुरडून तिनें परत तिला स्थानभ्रष्ट केलें. एक प्रकारची उद्धत, अधिक्षेपाची भावनाच जणुं काय तिच्या मनांत आतां उसळली होती. कुणाची भीति आहे तिला — खानदानी कुळांतल्या या झिन्नतला, कुणाची भीति आहे असं वावरण्याची ? खरंच नाहीं तरी...

`आणि तरीही आपल्या सुरक्षित घराच्या त्या चार भिंतीबाहेर पाऊल टाकल्याबरोबर, तिच्या हृदयांत भीतीनें ठाणें दिलें. थंडगार, बर्फासारख्या थंडगार पाण्याच्या प्रथम स्पर्शाबरोबर शहारावें, तसें तिचें सर्वांग शहारलें. पण थोड्याच वेळांत भीतीची जागा उल्हासानें घेतली आणि ती करीत असलेल्या साहसाची तिला मौज वाटून तिचें पाऊल डौलदारपणें नि सहज पडूं लागलें. त्यांचें संकेतस्थान जवळच होतें, याचेंच उलट तिला आतां वाईट वाटलें. एकदां रस्त्याला नीट लागल्यावर स्वतःच्या त्या लयबद्ध गतीनें ती कितीहि लांब चालत गेली असती. पण आज तिच्याजवळ वेळ अपुरा होता; ठरलेली वेळ झाली होती आणि फैय्याझ पण तिकडे वाट पहात होता. प्रवेश द्वाराकडे अस्वस्थपणें डोळे लाऊन एका एकांत बांकावर तो बसला होता, आणि झिन्नतनें आंत पाऊल टाकतांच तो अधीरपणें एकदम तिच्याकडे आला. त्याच्या त्या प्रक्षुब्धावस्थेची तिला थोडी गंमत वाटली. आणि तरीहि, हळू, जरा हळू, असा त्याच्या बोलण्याच्या आवेगाला तिला आवरहि घालावा लागला. पण तिनें केलेल्या निश्चयाचें कारणहि मग तिनें त्याला एकदम स्पष्टपणें सांगून न टाकतां उगाच कांहींतरी लांबण लावल्यानें, त्याची ओढ उलट वाढली मात्र. पण आपल्या निश्चयापासून मात्र ती रतिभरहि ढळली नाहीं किंवा कसली आशाहि तिनें त्याला लावली नाहीं. कारण आपल्या अस्पष्टपणामुळें हें असें होईल

याची तिला जाणीव होती. अर्ध्याएक तासांत ती तिथून उठलीहि. पण त्या तेवढ्या वेळांत एकदांहि आपलें मनोदौर्बल्य तिनें प्रकट केलें नाहीं किंवा त्याच्या भावनाकुल भाषणानें मवाळून परत भेटीचें वचन तिनें त्याला दिलें नाहीं.

आणि मग किती तरी दिवसांत न अनुभवलेल्या अशा विजयोन्मादांत ती घरीं परत फिरली. जणुं काय तिच्या अंतरंगांतला तो सुप्त स्फुलिंग एका फुंकराबरोबर तेजाळपणें आतां फुरफुरत होता. वाटेनें येत असतां तिच्या दिशेनें वारंवार वळत असलेल्या सौंदर्य भिक्षुकांच्या नजरा तिला आतां सुखवीत होत्या. आपल्या स्वतःच्या सौंदर्याची इतकी प्रभावी जाणीव तिला आजपर्यंत झाली नव्हती. जातां जातां तिनें हळूच एका पानपट्टीच्या दुकानांतील मोठ्या आरशांत आपलें रूप न्याहाळलें. आणि स्वतःच्या रूपसौंदर्याचा तिला आज अभिमान वाटला. तिच्या शरीरांतला सारा कण नि कण फुलून कारंजासारखा जणुं नाचत होता. विवाहानंतरच्या प्रेमाच्या पहिल्यावहिल्या उमद्या क्षणांत — प्रिय अझीझच्या बळकट बाहुपाशांत सुद्धां तिचें शरीर असें उत्कटपणें मोहरून नाचलें नव्हतें, कीं असला अदम्य आनंद तिला झाला नव्हता. पण उन्मादाचे ते मदिर क्षण विसरून रोजच्या शिळपट वातावरणांत तिला आतां शिरायचें होतें. आणि एकदम तिला मग गळल्यासारखें वाटलें नि जड पाऊलांनीं तिनें घरांत प्रवेश केला. पुढल्या दारांत एक क्षणभर त्या गतक्षणांच्या सौरभाचा आस्वाद घेण्यास ती थांबली नि आपले खांदे रुंदाऊन तिनें एक दोन दीर्घ श्वास घेतले.

तिच्या हाताला एक हिसका बसला नि झिन्नत आनंद शिखरावरून एकदम खालीं आदळली. तिनें झटकन मागें वळून पाहिलें.

" काय ? ... काय पाहिजे तुला आतां. कां आलीस पुन्हां छळा-यला ? " तिच्या मागें हात धुऊन लागलेल्या त्या छळवादिणीची ती कुटिल मूर्ती पाहून एकदम विमनस्क होऊन तिनें चिडून विचारलें.

पण तोंडांतून शब्द बाहेर पडले नाहींत तोंच तिनें आपले ओठ निराशेनें चावले. स्वतःचा आत्मघात तिनें आतां केला होता नि त्या बयेच्या तावडींत ती कायमचीच गेली होती. आत्तांच नव्हता का तिनें त्या बयेला दाद न देण्याचा निश्चय केला ? पण आतां काय, बूंदसे गई ! तिनें पूर्णपणें आपलें नुकसान करून घेतलें होतें आणि त्या बयेचा ससेमिरा आपल्या पाठीशीं कायमचाच लाऊन घेतला होता.

" तासभर वाट पहातें आहें मी आपली झिन्नतबी... "

म्हणजे आतां आपलं नांवगांव पण ठाऊक झालं सारं या बयेला ! पण कसं ? संपलं —संपलं आतां सारं !

" होय, काय म्हणते आहे मी, झिन्नतबी, तास झाला मला; " जरा गुरगुरतच ती म्हणाली.

" आतां काय हवं आहे आणखी ? "

" मी कशाला सांगायला हवं झिन्नतबी, तुम्हांला आहेच कीं ठाऊक. "

" पण तेव्हांपासून त्याला नाहीं भेटलें मी...आतां नाहीं कध्धीं कध्धीं भेटणार...म्हटलं नव्हतं मी तसं...? "

" किती खोटं बोलावं माणसानीं ! अगदीं तुमची दोघांची तिथे गांठ पडेपर्यंत होतें तुमच्या पाठीवर मी, झिन्नतबी. मला ना काम ना धंदा; आमच्या मालकानीं दिली मला हांकून. म्हणे तसं काम नाहीं आतां त्यांच्याकडे. मग एखाद दिवस सुद्धां आम्ही बेगम साहेबांसारखं नुसतं ऐटींत मिरवूं नये वाटतं ? "

तिच्या आवाजांत असा कांहीं बोंचक विषारीपणा होता कीं झिन्नत त्यानें अगदीं पार थिजून गेली. तिचा निर्लज्जपणा झिन्नतला असहाय करून टाकीत होता. आणि त्या दिवशींची ती विलक्षण भीति तिच्या जीवाचा आतां परत थरकांप उडवीत होती. त्या बयेचं बोलणं कुणी नोकरा चाकरांनीं ऐकलं तर? नि अझीझच एकादे वेळीं एकदम आला तर? घाईघाईनें तिनें आपली चांदीची नाजुक जाळीची पर्स एकदम उघडली नि ती त्या बयेच्या खापरखुंट्या हातांत रिकामी केली. पण तेवढ्यानें समाधान न होतां एकाद्या गिधाडाच्या पंजासारखा तो हात अजून तसाच पुढें पसरलेला होता.

"ती तेवढी पिशवी पण द्या कीं, म्हणजे ही चिल्लर नाहीं खालीं पडणार," तिला आणखी खिजवीत ती बया म्हणाली, आणि तिनें आपल्या भसाड्या हास्याची त्याला पुस्ती दिली.

झिन्नतनें एक क्षण आपल्या त्या छळवादिणीकडे टक लावली. तिला तिची शिसारी आली. जाऊं दे ही धिडका एकदां! आणि आपलें तोंड वळवून तिच्या त्या खिजवणाऱ्या डोळ्यांकडे न पाहतां तिनें ती पिशवी तिच्या हातांत कोंबली, नि आंत शिरून तिनें धाडकन दार लावलें आणि तडक वरची खोली गांठली.

अझीझ अजून घरीं आला नव्हता. रोजची वेळ अजून झाली नव्हती म्हणून आपल्या पलंगावर तिनें जरा आंग टाकलें. स्वस्थपणें — उमळून खालीं कोसळलेल्या एकाद्या केळीसारखी, स्वस्थपणें, कांहीं हालचाल न करतां ती पडली होती. पण इतक्यांत बाहेरच्या दिवाणखान्यांत अझीझचा आवाज तिला ऐकूं आला नि ताडकन वर उठून एकाद्या यंत्रासारखी ती जेवणघरांत गेली. सर्व चैतन्य जणुं तिच्या आंगांतून कुणी आतां काढून घेतलं होतं.

आणि मग चिंतेची भीषण छाया झिन्नतचा सारखा पाठपुरावा करूं लागली. कुठेहि केव्हांहि झिन्नतचा पिच्छा तिनें सोडला नाहीं. विचार, वेळ मिळेल तेव्हां सारखा विचार. प्रत्येक भेटीचा बारीकसारीक तपशीलसुद्धां तिच्या डोळ्यापुढें सारखा उभा राही. कसा बरं शोधून काढला असेल आपला पत्ता तिनें? नि नांवसुद्धां! आतां तिला चटक लागली पैशाची. आतां नाहीं आपली ती पाठ सोडणार, नि हें ओझं आपल्याला आतां असंच वागवलं पाहिजे. त्याला कांहीं शेवट म्हणून दिसत नाहीं. तशी पैशाच्या बाबतींत ती चांगली सुस्थितींत होती नि माहेरच्या इस्टेटीचीहि तीच वारस होती. पण अझीझला सारं सांगितल्याशिवाय झिन्नत तरी पैशाला नेहमीं कशी पुरी पडणार होती? आणि तिला हेंहि ऐकून माहीत होतं कीं, एकदां दिलेला हा मुखलेप कांहीं फार दिवस पुरत नाहीं. एकदोन महिने कुठे थोडा स्वस्थपणा लाभतो तोंच भीतीची ती कट्यार परत आपल्यावर उगारली जाते नि मागली सारी आवृत्ती पुन्हां सुरू होते. आणि तितकाच धीर करून पोलिसची मदत जर घ्यायची म्हटली नि त्या विषारी समाज कंटकाला कोर्टापुढें खेंचला तर आपल्याच हातानें आपल्या नि आपल्या घराण्याच्या अब्रूच्या चिंधड्या नाहीं का उडणार? मग त्या डाकिनीला धडा शिकविण्यासाठीं आपल्याच घरावर नि आंगावर अंगार टाकून घ्यायचे?

काय व्हायचं पण मग आतां? झिन्नतला कांहीं केल्या याचें उत्तर मिळत नव्हतें. आणि एकादे दिवशीं अझीझच्याच नांवानें पत्र आलं तर? रागानें अगदीं तांबडा लाल होऊन, आपला हात घट्ट पकडून... काय — काय होईल मग? काय करील अझीझ? कांहींच उत्तर तिला सुचत नव्हतें; कांही कल्पनाच करतां येत नव्हती तिला. विलक्षण —

अगदीं वेड लावणाऱ्या भीतीनें तिच्या सर्वांगाचा थरकांप होत होता. तिला कांहींच सांगतां येत नव्हतें. अझीझच्या त्या खवळलेल्या मनोवृत्तीची तिला कसलीच कल्पना होऊं शकत नव्हती. आपला अझीझ! आपला...पण किती दूर दिसत होता तिला आतां तो! तिच्या आईवडिलांनीं पसंत केलेल्या या विवाहसंबंधाला तिनें केवळ मान तुकवली होती. आणि आज आठ वर्षें झालीं तरी त्या तिच्या झालेल्या अझीझच्या सर्व मनोव्यापारांची किती थोडी ओळख तिला पटली होती? सुखानें, पूर्ण सुखानें तिनें हीं आठ वर्षें घालवलीं होतीं. दोन गोजिरवाणीं बालकेंहि तिला झालीं होतीं नि अझीझचा संसार तिनें सुखाचा केला होता. असंख्य तास न तास तिनें अझीझच्या सहवासांत घालविले होते. पण तरीहि अशा वेळीं तो काय करील, याची मात्र तिला कांहींच कल्पना येत नव्हती. त्याच्या साऱ्या आवडी निवडींचें नि मनोव्यापारांचें सूक्ष्म पृथक्करण ती आतां करूं लागली. बारीक सारीक गोष्टीसुद्धां आठवण्याचा तिनें प्रयत्न केला. पण कसलाच प्रकाश तिच्या मनांत पडे ना. उलट जसजशी ती अधिक विचार करूं लागली तसतसें तिच्या भयाचें स्वरूप अधिक भीषण, उग्र मात्र होऊं लागलें...

नेहमींसारखा तो दिव्यासमोर वाचीत बसला होता, आणि दिव्याचा झगझगीत प्रकाश त्याच्या तोंडावर पडला होता. त्याच्याकडे पहातांच एखाद्या अपरिचित नवख्या माणसाकडे आपण पहात आहोंत असें तिला वाटलें. त्याच्या त्या भरदार भुंवया नि भव्य उन्नत कपाळ, त्याच्या बौद्धिक सामर्थ्याची साक्ष देत होतीं; घट्ट मिटलेले ओठ नि करारी मुद्रा त्याच्या ताठर वृत्तीचींच निदर्शक होतीं. त्याच्या त्या पौरुषयुक्त चेहऱ्यांतील सौंदर्याच्या छटाहि तिच्या दृष्टीस आज पडत होत्या.



अनुक्रम
विभाग

आणि डोळे ! पण ते आतां खालीं पुस्तकावर खिळले होते. पण तिची खात्री होती कीं, त्यांनींच त्याचं खरंखुरं व्यक्तिमत्त्व तिच्यापुढें उघडं केलं असतं. स्वतःशीं विचार करीत, त्याच्याकडे टक लावून पहात ती तशीच उभी होती. आपल्या या मार्गच्युतिबद्दल तो आपली नुसती निर्भर्त्सना करील कीं घटस्फोटाचा अवलंब करून आपल्याला कायमचीच दुःखीकष्टी करून टाकील ? कीं...? छे ! कांहीं कांहींच तर्क चालत नाहीं आपला. पूर्ण अपरिचित, अगदीं नवख्या माणसासारखाच दिसत होता आतां तो. त्याची ती पौरुषपूर्ण आकृति तिला भेदरवीत होती; पण किती उमदा दिसतो आहे नाहीं आपला अझीझ ?—हो, आपला ! ...नि तिला थोडा अभिमानहि वाटला. इतक्यांत त्यानें एकदम मान उचलून वर पाहिलें, आणि झिन्नत चमकून आपल्या डोळ्यांतील ते भाव लपवण्यासाठीं, अभावितपणें मागें सरली.

तीन दिवस मग तिनें घराबाहेर पाऊल टाकलें नाहीं. तिच्यांतील या आकस्मिक बदलानें तिच्या नोकरचाकरांसहि थोडें आश्चर्य वाटलें. तिच्या मुलांच्याहि लक्षांतून ती गोष्ट सुटली नाहीं. आणि तिच्या छोकऱ्यानें तसें तिला विचारलेंसुद्धां. झिन्नतहि जसं कांहींच झालं नाहीं असं दाखवण्याचा आपल्याकडून कसोशीनें प्रयत्न करीत होती. घरांतल्या कामांतहि तिनें थोडी लुडबूड केली. पण त्याचा चाकरमाणसांना अडथळा मात्र झाला नि त्यांची शंकाहि बळावली. भीतीनें उडालेली मनाची चलबिचल तिला एके ठिकाणीं स्वस्थ म्हणून बसूं देत नव्हती. म्हणून दिवसभर कांहीं तरी करीत ती घरांत फिरत राही.

पुढील दारची विजेची किंवा टेलिफोनची घंटा वाजली कीं ती एकदम लाल पडून घाबरी होई. रोजचं तिचं शांत, स्वस्थ जीवन आतां असं विच्छिन्न झालं होतं. आणि त्यांतून सुटण्याचा कांहींच मार्ग दिसत नसल्यामुळें भविष्यकाळ तिला उदास, भयाण नि दुःखपूर्ण भासत होता. तीन दिवसांची ती कैद तिला तीन वर्षांहूनहि दीर्घ नि कंटाळ-वाणी वाटली.

आणि मग तिसरे दिवशीं संध्याकाळीं त्या दिवशींच असलेल्या ईव्हिनिंग पार्टीची तिला आठवण झाली. पण आतां आयत्या वेळीं तिकडे नकार पाठविणं हें शिष्टाचाराला निखालस सोडून दिसलं असतं. नि तेंहि पण एकाअर्थी बरंच आहे. तेवढीच जरा सुटका. नाहींतर आपल्या सभोंवार उभ्या रहात असलेल्या भीतीच्या या अभेद्य भिंतींच्या आंत, आपल्याला कायमचंच बंदिवान व्हावं लागलं असतं. बस्स; पडलंच पाहिजे बाहेर! चार लोकांत जरा मिसळल्याशिवाय, एकांतवासाचं हें घातकी भूत...अंहं! वेड लागेल अशानें नाहींतर. त्या वेगळ्या वातावरणांत नि मैत्रिणींच्या सहवासांतच अधिक सुरक्षित वाटेल मला.

घराबाहेर तिनें पाऊल टाकलें; पण लगेच चटका बसल्यासारखी ती एकदम चमकली. ती बया नसेल ना आपल्या पाळतीवर? स्वप्नांत वावरल्यासारखी घाईघाईने मग पायऱ्या उतरून ती कशीबशी खालीं आली आणि दाराशीं उभ्या असलेल्या गाडींत तिनें पाऊल टाकलें. गाडीच्या त्या जोरदार नि सलील गतीनें तिच्या भीतीचा जोर जरा वेळानें कमी झाला. आणि मैत्रिणीच्या घरांत एकदां पाऊल टाकल्या-नंतर, तर तिला पुष्कळच हायसें वाटलें. आतां निदान कांहीं तास

तरी नेहमींची हंसरी खेळकर झिन्नत वावरायला हरकत नाहीं. छळ-द्वेषांचे घातकी हात तेथें तिच्यापर्यंत पोंचूं शकत नव्हते. आणि आपल्या प्रेमाच्या नि परिचयाच्या माणसांत ती आतां वावरत होती. सुंदर विलासी पोशाकानें नटलेलं नि सोन्यामोत्यांनीं लढलेलं सुख स्वास्थ्याचं गुलाबी वातावरण, तिच्या भोंवतीं आतां पसरलं होतं. अझीझच्या हाताचा आश्रय घेऊन ती दिवाणखान्यांत शिरत असतां, तिच्या सौंदर्यानें आकृष्ट झालेल्या रसिक दृष्टिक्षेपांनीं तिच्या हृदयाला गुदगुल्या झाल्या, आणि स्वतःच्या सौंदर्याच्या या जाणीवेनें तिच्या मोहकपणाला अधिकच भरती आली.

तिकडून शेजारच्या खोलींतून येत असलेले संगीताचे मधुर स्वर तिच्या कानांत झंकारूं लागले नि तिच्या सर्वांगांत गोड झिणझिण्या उत्पन्न झाल्या. सभोंवतालचीं अनेक जोडपीं नृत्याला आतां सुरुवात करीत होतीं; आणि झिन्नतला कळण्यापूर्वींच कोणाचे तरी हात तिच्या कमरेभोंवतीं लपेटले गेले, नि सभोंवारच्या त्या गिरगिरणाऱ्या मानवी समुद्रांत ती जोरानें खेंचली गेली. भीतीचा चुकलामाकला कणसुद्धां तिच्या शरीरांत आतां राहिला नव्हता आणि तिचें सर्व शरीर त्या लयबद्ध गतींत पूर्णपणें विरून गेलें होतें. संगीताचे स्वर थोडे थांबले आणि त्या क्षणिक शांततेंत तिला जरा अस्वस्थ वाटलें. पण ते संगीत ध्वनि परत सुरू झाल्याबरोबर, विस्मृतीच्या मधुर जललहरी परत तिच्याभोंवतीं पसरल्या, नि आपल्या सहचऱ्याच्या सहवासांत, तिचा तो अस्वस्थपणा पूर्णपणें विरून गेला. अशा नृत्यप्रसंगीं तिनें आज-पर्यंत फारसें कौशल्य कधींच व्यक्त केलें नव्हतें. पण आजच्या भीति-मुक्ततेच्या त्या आनंदसागरांत तिचें पाऊल कांहीं न्याऱ्याच कौशल्यानें

पडत होतें. कटिभोंवतालच्या त्या उबदार हस्तस्पर्शांमुळें नि कर्णाग्राजवळ होणाऱ्या ऊष्ण श्वासामुळें, तिच्या आंगांतील रक्त जणुं काय थयथय नाचत होतें. शरीरावरील त्या तलम तंग वस्त्रांचेंहि तिला जणुं बंधनच वाटत होतं; नि कपड्यांचें हें बंधन दूर झुगारून देऊन, आनंदाच्या त्या बेहोष, उन्मनी अवस्थेंत अगदीं निःसंकोच, मुक्तबंध, लहान बालकाप्रमाणें नाचावं असं तिला वाटलं.

" झिन्नत, काय झालं ग ? "

ती एकदम मागें वळली. तिचे डोळे विस्फारले होते, नाकपुड्या फुरफुरत होत्या नि पाऊल सरळ पडत नव्हतें. अझीझच्या दृष्टींत तिला नापसंती स्पष्टपणें दिसत होती. काय झालं ? फारच वाहवलों काय आपण ?

" अं हं...नाहीं...कांहीं नाहीं अझीझ," भीतीनें फिरून एकवार गळून जाऊन कसेंबसें ती म्हणाली.

त्याची ती तरवारीच्या पात्यासारखी तीक्ष्ण नजर तिच्या अंतरंगांत जणुं खोल घुसत होती आणि त्या वेदनांनीं अगदीं ओरडावं असं तिला वाटलं.

" अशी बावरली आहेस कां आज ? " बऱ्याच वेळानें तो पुटपुटला.

त्याच्या मनांतील विस्मय त्याच्या आवाजांतहि उमटला होता. पण त्याचं कारण विचारण्याचं धाडस तिला होत नव्हतं. त्यानेंहि अधिक एक अक्षरहि न उच्चारतां आपलें तोंड वळविलें; आणि त्याचे ते रुंद नि पुष्ट खांदे आणि त्यांच्यावरील ती भरदार गर्दन तिच्या दृष्टीसमोर येतांच, तिच्या आंगावर कांटा उभा राहिला. " एकाद्या

खुन्यासारखे," तिच्या मनांत एकदम चमकून गेलें. तिचा विचारां-वरचा ताबा आतां सुटला होता. तिचा अझीझ — किती भयंकर पण...विलक्षण.... !

नृत्याला परत सुरुवात झाली. एखाद्या निर्जीव बाहुलीसारखी आतां ती नाचत होती. जड जड बेडयांनीं जखडल्यासारखीं तिचीं पावलें जड पडत होतीं आणि सभोंवारचें तें मादिर वातावरण तिला पूर्वी-सारखें हवेंत तरंगत ठेवण्यास असमर्थ ठरत होतें. तें नृत्य अर्धवटच सोडून ती मागें फिरली. तिनें समोर पाहिलें आणि अझीझ तिचीच जणुं काय वाट पहात उभा असलेला तिच्या दृष्टीस पडला. त्याच्या डोळयांत अजूनहि तीच ती आव्हानाची मूक गर्भितछटा तिला दिसली. काय बरं याचा अर्थ? आपलं गुपित तर फुटलं नाहीं ना? खांद्या-वरील शाल आंगाभोंवतीं घट्ट लपेटून आपलें वक्षस्थळ जणु तिनें त्याच्या रोखलेल्या दृष्टीपासून झांकून घेतलें. त्याचं तें कठोर मौन तिला आतां सहन होत नव्हतं.

"निघू या का आपण?" तिनें अस्वस्थपणें विचारलें.

"हं!"

त्याचा आवाज कठोर नि रागाचा येत होता. तो पुढें झाला आणि ती निमूटपणें त्याच्या मागून चालूं लागली. तेच ते बलशाली, भीति-दायक खांदे आणि ती ताठर मान तिला परत दिसत होती. तिच्या आंगावरील ती गरम उबदार शाल तिनें परत सरसावली, पण तिच्या आंगाचा कंप अजून थांबत नव्हता. एकमेकांशीं एक अक्षरहि न बोलतां तीं घरीं येऊन पोंचलीं. पण चोहोंबाजूंनीं संकट आपल्याला आतां वेढीत आहे असंच तिला आज वाटत होतं.

आणि मग एक अतिशय उदासवाणं स्वप्न त्या रात्रीं तिला पडलं. कांहीं विलक्षण संगीत ध्वनीनीं वातावरण भारावलं होतं नि सर्व दिवाणखाना विद्युद्दीपांनीं नुसता झगमगत होता. रंगीबेरंगी पोशाक केलेलीं कितीतरी तरुण जोडपीं तिच्या सभोंवार नाचत होतीं. आपल्या नाजुक कमरेभोंवतीं हात गुंफून नाचत असणाऱ्या तरुणाचा चेहरा तिला परिचितसा वाटत होता. पण पूर्ण ओळख मात्र तिला अजून पटत नव्हती. संगीताच्या मधुर आलापांनीं तिचं अंतःकरण उल्हसित होऊन, एखाद्या स्वच्छंद पांखरासारखी त्या गुळगुळीत जमिनीवरून ती भिरभिरत होती. नाचत नाचत वाऱ्यावर तरंगल्यासारखे, असंख्य दीपांनीं प्रकाशलेल्या कितीतरी दिवाणखान्यांतून आपण वाहवत आहोंत असें तिला वाटलें. वर उंच टांगलेले ते सोनेरी विद्युद्दीप अनंत तारकापुंजांप्रमाणें तिला भासत होते. सभोंवार जिकडेतिकडे लावलेल्या असंख्य बिलोरी आरशांतून आपल्या हंसऱ्या चेहऱ्याचीं बिंबप्रतिबिंबें, अनंतरूपांनीं आपल्याकडे हंसत हंसत पहात आहेतसें तिला दिसत होतें. संगीताची मादकता वाढत होती नि त्याचबरोबर आपलाहि उन्माद वाढत आहे असें तिला वाटलें. आपल्या आंगाभोंवतालची हाताची पकड अधिकाधिक घट्ट होत आहे, त्या सुखद स्पर्शानें आपलें आंग पुलकित होऊन आपला श्वास जोरानें चालत आहे, नि आपण आनंदानें वर त्या तरुणाच्या डोळ्यांकडे दृष्टि लावली आहे. आणि... पण हा तर फैय्याझ! मोठ्यानें आतां ती त्याचें नांव उच्चारणार, तोंच त्याच्या आवेगी चुंबनानें तिचे ओंठ पूर्णपणें झांकले गेले. प्रेमाच्या त्या अद्वैतांत कितीतरी वेळ तीं मग नाचत होतीं. भोंवतालचें सारें जग जणुं पार वितळून जाऊन त्यांच्या भोंवतीं तरंगत होतें. काळ-

वेळाचा पार विसर पडला होता. आपले पाय जडबंधनांतून मुक्त होऊन आपण बेहोषपणें हवेंत विहरत आहोंत असें तिला वाटलें. आणि मग कोणी तरी तिच्या खांद्याला स्पर्श केला. ती थांबली, वाद्यांचे आलाप थांबले, दिव्यांनीं पोबारा केला नि भोंवतालच्या तरुणतरुणी नाहींशा होऊन, त्यांच्या मागील भिंती जणुं जवळ जवळ येऊन तिचा कोंडमारा करूं लागल्या. " दे माझा मला परत तो," आपल्या बर्फा-सारख्या थंडगार हातांनीं तिचें मनगट घट्ट पकडून, ती कैदाशीण ओरडत होती. तिच्याशीं झगडण्यासाठीं झिन्नतनें आपलें सर्व शरीर-सामर्थ्य गोळा केलें. त्या दोघींची ओढाताण सुरू झाली. पण झिन्नतचें सामर्थ्य लटकें पडत होतें आणि त्या बयेनें तिच्या गळ्यांतील मोत्यांची एकावली हिसकावली नि आंगावरील नाजुक रेशमी कपड्यांच्या चिंध्या केल्या. सर्व बाजूंनीं लोक आतां धावून येत होते आणि " तूंच चोर-लास माझ्या जवळून त्याला; हलकट वेसवा मेली !" अशा त्या बयेच्या किंचाळ्या ऐकत असतां तिरस्कारानें ते झिन्नतकडे पहात होते. कुठे जावें, कुठे आपलें तोंड लपवावें, असें आतां झिन्नतला होऊन गेलें. तिच्या त्या उघड्या शरीरभागांकडे अधाशीपणें पहात सभोंवार गराडा घालीत असलेल्या लोकांकडे ती कावरीबावरी होऊन पहात होती. असहायपणें मदतीसाठीं तिनें चौफेर दृष्टि टाकली. दूर तिकडे दाराच्या त्या सावलींत तिचा अझीझ उभा असलेला तिला दिसला. आपला उजवा हात पाठीमागें धरून तो निश्चलपणें उभा होता. भयानें एकदम किंचाळून पाठीशीं लागलेला लोकांचा तो घोळका टाळण्या-साठीं ती सैरावैरा पळत सुटली. बेभानपणें ती पळत असतां तिच्या आंगावरील ते फाटके कपडे घसरून खालीं गळत होते. स्वतःच्या

देहाच्या लज्जारक्षणासाठीं तसेच ते हातांनीं घट्ट आवरून नि समोरील दार धाडकन उघडून, वाऱ्याच्या सोसाट्यासारखी पायऱ्यांवरून धडधडत ती खालीं आली. सुटलों आतां आपण. पण छे! समोरच ती कैदाशीण आपले ते राकट हात पसरून तिथें उभी होती. एकदम बाजूला उडी घेऊन भेदरलेल्या चिमुकल्या सशासारखी झिन्नत पुढें पळत होती; आणि ती पिसाट कुत्री तिच्या पाठीवर. कितीतरी वेळ न संपणाऱ्या त्या रस्त्यांवरून ही शिकार चालली होती. रस्त्यावरील सारे दिवे तिच्याकडे पाहून भेसूरपणें दांत विचकीत होते. आपल्या पाठीशींच त्या पावलांचा आवाज होतो आहे आणि तरीहि समोर कोपऱ्याकोपऱ्यावर तीच वक्रदृष्टि आपल्यावर रोखली आहे, असें तिला वाटत होतें. सभोंवारच्या प्रत्येक घरांतून तें भूत आपल्याला भेडसावीत आहे नि आपला मागूनपुढून कोंडमारा करीत, प्रतिक्षणीं अनंत वाढत्या रूपांनीं आपल्यावर झडप घालून आपल्याला गुदमरून टाकीत आहे, असें तिला वाटलें. तिच्या आंगांतील सारें अवसान आतां गळून गेलें नि आपण आतां खालीं पडणार असें तिला वाटूं लागलें. पण अखेरीस कसेंबसें आपलें घर तिनें गांठलें आणि अतिशय जोर करून दाराकडे तिनें झेंप टाकून दार धाडकन मागें लोटलें. पण हातांत सुरा घेऊन तीक्ष्ण भेदक नजरेनें तिच्याकडे पहात अझीझ तिथें उभा होता. "कुठें गेली होतीस?" त्यानें कठोरपणें विचारलें. "कुठे नाहीं," असें आपण पुटपुटल्यासारखें तिला वाटलें. पण तेवढ्यांत तो कर्कश आवाज झाला; "मी पाहिली आहे तिला, मी पाहिली आहे!" अझीझनें आपला सुरा वर उगारला. "धांवा, धांवा!" झिन्नत कळवळून ओरडली.

ती बिछान्यावर उठून बसली नि डोळे चोळून तिनें आसपास पाहिलें. तिच्या शेजारींच अझीझ तिच्याकडे अस्वस्थपणें पहात असलेला तिला दिसला. त्यानें बटण दाबून उजेड केला होता. आपण घरींच आहोंत, नि हें सारें स्वप्नच तर मग? पण अझीझ आपल्याकडे असा, आपण आजारी असल्यासारखा कावराबावरा कां पहातो आहे? नि हा उजेड कुणी केला? असा हा निश्चल, मुक्तस्तंभासारखा कां बसला आहे? भीतीनें तिचा श्वास रोधला. तिनें हळूच त्याच्या हाताकडे पाहिलें. त्याच्या हातांत सुरा दिसत नव्हता. निद्रेची झांपड तिच्या डोळ्यांवरून आतां दूर झाली. एकूण झोंपेतच आपण असे घाबरून ओरडलें म्हणायचें, नि हा जागा झाला. पण असा हा रोखून कां पहातो आहे आपल्याकडे?

तिनें जरा हंसल्यासारखें केलें.

"काय झालं? इतका कां गंभीर दिसतो आहेस? कांहीं नाहीं! झोपेंत थोडी घाबरलें मी."

"किती मोठ्यानें ओरडलीस पण तूं? त्या खोलींतसुद्धां ऐकूं आलं मला तें."

"काय बरं मी बोलल्यें असेन? किती कळलं आहे आपलं गुपित त्याला!" तिच्या मनांत येत होतें. तिच्यानें त्याच्या दृष्टीला दृष्टि भिडवे ना. पण तो अगदीं विलक्षण स्तब्ध बसला होता आणि तिच्या चेहेऱ्यावर त्याचे डोळे खिळले होते.

"काय झालं आहे तुला झिन्नत? कांहीं तरी बिघडलं आहे खास. गेले तीनचार दिवस अशीच अस्वस्थ दिसते आहेस तूं. एखाद्या तापकऱ्यासारखी चिडखोर नि गडबडून गेल्यासारखी दिसतेस तूं. आणि आत्तां तर ही अशी ओरडलीस..."

परत एकदां तें हंसण्यावारी नेण्याचा तिनें प्रयत्न केला.

" अं हं, असं लपवून नको ठेवूं माझ्यापासून कांहीं. कसला हृद्रोग लागला आहे तुला ? कुणी भीति घातली आहे तुला ? सगळ्या घराच्या लक्षांत आला आहे तुझ्यांतला हा बदल. मलासुद्धां नाहीं का सांगायचं झिन्नत ? "

तो तिच्या थोडा अधिक जवळ सरकला. त्याचीं बोटें तिच्या हातावरून हळुवारपणें फिरत होतीं. पण त्याचे डोळे कांहीं वेगळेच दिसत होते. असंच त्याला आतां घट्ट घट्ट विलगावं नि सांगून टाकावं सारं कांहीं. हो ! आत्तांच, आपली ही तळमळ त्याला दिसते आहे, तेव्हांच व्हावं मोकळं झालं; तिच्या मनांत येत होतं.

पण तो कठोर दिवा तिच्या तोंडावर भगभगीतपणें प्रकाशत होता; नि लाजेनें ती अगदीं चूर होऊन गेली.

" कांहीं नाहीं, अझीझ," हंसण्याचा परत प्रयत्न करीत ती म्हणाली. तिचें सर्वांग थरारलें. " जरा कीं नाहीं, थोडा त्रास झाला होता मला. जाईल आतां तें पण—"

तिला कुरवाळणारा त्याचा हात एकदम मागें झालां. त्याचा चेहरा पांढराफटक दिसत होता; आणि कपाळावर विषादपूर्ण आंठ्या पसरल्या होत्या. मंदपणें बिछान्यावरून उठून तो आतां उभा राहिला.

" कां कोण जाणें, पण हे गेले दोन दिवस मला वाटतं आहे, उगाचहि असेल तें, कीं तुझ्या मनांत मला कांहीं तरी सांगायचं आहे...आपल्या दोघांपुरतंच आहे कांहीतरी...अगदीं तूं आणि मी...मग, दुसरं कोण आहे बरं आतां इथें ? झिन्नत...!"

त्याच्या त्या रोखलेल्या डोळ्यांनीं भारल्यासारखी ती स्वस्थ पडली

होती. अगदीं दोनच शब्द, 'चुकल्यें बरं का मी,' असें एकदां उच्चारलें कीं सारं कांहीं सुरळीत नीट पहिल्यासारखं होईल नाहीं ?' तिच्या मनांत आलं. पण हा उजेड किती भगभगीत पडला आहे.... हा दिवा नसता तर, काळोखाच्या छायेंत सारं सारं आपण सांगून टाकलं असतं....पण त्या कठोर उजेडांत तिचं अवसान पार गळून जाऊन तिला धीर होत नव्हता.

"मग नाहीं ना, कांहीं नाहीं ना सांगायचं माझ्याजवळ तुला ?"

त्याचा आवाज मृदु नि प्रेमळ येत होता. आपलं अंतःकरण उघडं करण्याचा तिला अतिशय मोह होत होता. पण तो मेला — नष्ट दिवा. ...

आंग झाडल्यासारखें करून ती म्हणाली :

"मला नाहीं समजलं तूं काय म्हणतो आहेस तें." पण तिच्या आवाजांतील बेगडी आनंद तिचा तिलाच भेसूर वाटला. "झोंप जरा चाळवली म्हणून तुला वाटतं आहे कीं यांत कांहीं गुपित आहे हिचं. हेः ! काय वेडेपणा. दुसरी कसलीसुद्धां तुला शंका यायची एखाद वेळ."

तिच्या आवाजांतील नकली धार तिची तिलाच भयंकर वाटली आणि तिनें आपली मान वळवली.

"बरं तर. नीट नीज आतां;" तो तुटकपणें म्हणाला. त्याच्या आवाजांतील मार्दव नाहींसें होऊन तो भेदक झाला होता नि गर्भित धमकीच त्याच्या आवाजांत तिला जणूं प्रतीत होत होती.

त्यानें दिवा घालवला. झिरतला त्याची शुभ्र रेखाकृति दारांत दिसत होती. एखाद्या पिशाचाकृतीसारखा, आवाज न करतां तो दिसेनासा होत होता. मागें दार बंद झालें आणि आपल्याला कोणी

तरी खालीं थडग्यांत खोल दडपून टाकीत आहे, असें तिला वाटलें. सभोंवारचें सारें जग जणूं मृतप्राय झालें आहे, आपलें हृदय तुफान वेगानें धडधडत आहे आणि बाकी सारें शरीर शून्य झालें आहे. वेदना, वेदना — फक्त तीव्र वेदना तिला प्रत्येक ठोक्याबरोबर होत होत्या.

दुसरे दिवशीं सकाळचें जेवण उरकून तीं बसलीं होतीं. आपल्या दोघां मुलांचें झालेलें कडाक्याचें भांडण आत्तांच तिनें मिटवलें होतें; इतक्यांत मोलकरणीनें तिच्या हातांत एक पत्र आणून दिलें.

" आपलं आहे तें बाई, नि तो माणूस उभा आहे उत्तरासाठीं."

झिन्नतनें घाईघाईनें तें पत्र फोडलें नि आंतील मजकुरावर दृष्टि जातांच तिचा चेहेरा पांढरा फिकट पडला. " कृपा करून येणाऱ्या माणसाबरोबर शंभर रुपये पाठवून द्यावे." पत्रावर ना तारीख ना सही; आणि अक्षरहि मुद्दाम काढल्यासारखें दिसत होतें.

झिन्नत एकदम उठून पैसे आणण्यासाठीं आपल्या खोलींत गेली. पण तिच्या ट्रंकेची किल्ली कुठें तरी गळबटली होती. सारी खोली उलथीपालथी केल्यावर कुठे ती किल्ली सांपडली. थरथरत्या हातांनीं तिनें एकदां नोटा मोजल्या नि त्या एका पाकिटांत घालून स्वतःच त्या माणसाच्या हातांत नेऊन दिल्या. मोहनास्त्राच्या गुंगींत वावरल्या-सारख्याच तिच्या सर्व क्रिया होत होत्या. चुकून एकदांसुद्धां तिचे ते व्यापार गोंधळल्यासारखे होत नव्हते. साऱ्या क्रिया कशा एकापुढें एक झटझट चालल्या होत्या. दोन मिनिटेंसुद्धां झालीं नाहींत तों ती परत देखील आली.

सारेजण तिच्याकडे निःस्तब्धपणें टक लावून पहात होते. कांही तरी बोलून ती सारें साजरें करणार, तोंच तिची दृष्टि आपल्या पाया-जवळ गेली आणि तिच्या तोंडचें पाणीच पळालें. कोणालाहि वाचतां येईल अशी ती चिठी तशीच तिथें उघडी पडली होती. तिनें हळूच ती उचलून आपल्या खिशांत कोंबली, आणि मग तिचे डोळे अझी-झच्या डोळ्यांशीं भिडले. कधींच न दिसलेले असे भेदक, अधिक्षेपाचे पण तीव्र मनोवेदनायुक्त असे भाव तिथें उमटलेले तिला दिसले. अंतः-करणांत तिखट सुरी बोंचल्यासारखें तिला वाटलें. कशा टाळायच्या या तीव्र वेदना ! हीच बोंचक नजर काल नाचाचे वेळीं त्यानें तिच्यावर रोखली होती. झोंपेंतहि नजरेची हीच तिखट धार तिला हैराण करीत होती. तिचं डोकं एखादी चांगलीशी सबब शोधून काढण्यांत गुंतलेलं होतं. आणि मग अझीझनेंच फार दिवसांमागें सांगितलेली एक गोष्ट तिला आठवली.

त्या वेळीं एका फौजदारी खटल्यांत गुंतला होता तो. त्या वेळच्या एका सरकारी वकिलाची अवखळ साक्षीदारांना छेडण्याची एक युक्ति होती. अधू दृष्टि असल्याप्रमाणें, समोरील कागदांत अगदीं डोकें खुप-सून ते नेहमीं बसलेले असायचे. पण एखादा निर्णायक प्रश्न विचार-ण्याची वेळ आली कीं मान एकदम वर उचलून तलवारीच्या पात्या-सारख्या अशा कांहीं भेदक दृष्टीनें त्या साक्षीदाराकडे ते पहात, कीं तो बिचारा पुरापुरा गर्भगळित होऊन घोकून घोकून पाठ केलेली त्याची सारी खोटी जबानी, पत्त्यांच्या पानांप्रमाणें वाऱ्यावर सैरावैरा उधळून जाई. तोच प्रयोग चालला आहे काय आपल्यावर ? आणि आरोपीच्या नि साक्षीदारांच्या मनोभूमिकेची मानसशास्त्रीय छाननी

तो किती कसोशीनें करी, हें तिला आठवल्यावर तर तिचा जीव पार उडून गेला. आरोपीच्या मनोविकारांचे दुवे एकांत एक अडकवीत त्यांची सुसूत्र सांखळी गुंफण्याचा त्याला विलक्षण नाद होता. एखाद्या जुवेबाजासारखी त्याची त्याला नशा चढे. स्वतःच्या तहानभुकेचीसुद्धां आठवण त्याला मग रहात नसे. न सुटलेल्या त्या कोड्यानें त्याची झोंपहि उडून जाई. सारा दिवस धूम्रपान करीत नि कोणाशीं एक अक्षरहि न बोलतां खटल्याचा तो दिवस उजाडेपर्यंत आपली अशी परिपूर्ण तयारी करण्यांत तो नेहमीं व्यग्र असे. एकदांच त्याच्या बरोबर ती कोर्टांत गेली होती. प्रतिवादीचा वकील म्हणून तो उभा होता. पण त्याच्या त्या वक्तृत्वपूर्ण भाषणांतील विषारी आवेश आणि डोळ्यांतील क्रूर छटा पाहून कोर्टाची पायरी परत म्हणून चढायची नाहीं, असा तिनें निश्चय केला होता. आणि आतां तिला —— त्याच्याच पत्नीला या भेदक, छडणाऱ्या नजरेचा मारा सहन करायचा होता.

हे सारे विचार एका क्षणांत तिच्या मनांत चमकून गेले आणि ओंठापर्यंत आलेले शब्द जागच्याजागींच थिजून गेले. तशीच मुकाट्यानें कांहीं क्षण ती बसली होती. पण तिच्या त्या मौनाचा परिणाम तिच्या ध्यानांत येतांच तिचा अस्वस्थपणा सारखा वाढत चालला. पण सुदैवानें बाहेर कुणी आल्यानें अझीझ उठून गेला आणि मुलेंहि ओरडा करीत मागील दारीं पळालीं.

आतां खोलींत ती एकटीच होती. तें घातकी पत्र खिशांतून बाहेर काढून झिन्नतनें त्यावर परत दृष्टि टाकली. "कृपा करून येणाऱ्या माणसाबरोबर शंभर रुपये पाठवून द्यावे." तिचा राग अनावर झाला आणि त्या पत्राचा पार चुरगळा करून तिनें तें कोपऱ्यांत फेंकलें. पण

लगेच मनांत कांहीं विचार येऊन तिनें तो घातकी कागद वर उचलला आणि त्याला झटकन काडी लावली. त्या विषारी कागदाची जळून राख होत होती. आगाशीं भिडलेल्या त्या संकटांतून सुटल्याचा तिनें मग निश्वास टाकला नि बाहेर जायला ती मागें वळली.

पण तिचा हेतु सफळ व्हायचा नव्हता. बाहेर पावलांचा आवाज झाला आणि अझीझचें दारांत पाऊल पडलें. अचानक पकडल्यासारखा तिचा चेहेरा लाजेनें गोरामोरा झाला. तो जळका कागद अजून तिथेंच दिसत होता. त्याच्या आड उभें राहण्याचा तिनें कसाबसा प्रयत्न केला. अझीझ काडी ओढून सिगारेट पेटवीत होता. त्या अर्धवट उजेडांत त्याच्या नाकपुडया फुरफुरत आहेतसें झिन्नतला वाटलें. त्याच्या रागाचें तें निदर्शक होतें. तरीहि तो शांतपणें तिच्याकडे पहात आतां बोलत होता :

" तुझीं खाजगी पत्रं मला दाखवण्याची कांही जरूर नाहीं. तुझी तशी मर्जी असली तर तुझं गुपित तुझ्या जवळच ठेवायला तूं पूर्ण मुकत्यार आहेस. एवढंच सांगायला मी परत आलों होतों. "

झिन्नत टाळूला जीभ चिकटल्यासारखी उभी होती आणि डोळे वर करण्याचा तिला धीर होत नव्हता. एकदोन क्षण त्यानें वाट पाहिली आणि सिगारेटचा धूर एकदां जोरानें बाहेर सोडून तो धिमेपणानें खोलीबाहेर निघून गेला.

— तिनें आतां विचार करण्याचें सोडून दिलें. तिला शांतता हवी होती. आणि कांही तरी निरर्थक कामांत ती आपला वेळ घालवीत होती. तिचें घर तिला खायला उठलें होतें. आणि आपण आतां चार-

चौघांत जर मिसळलों नाहीं तर भीतीनें आपल्याला वेड लागेल असें तिला वाटूं लागलें. कांहीं दिवस तरी पुरतील नाहीं ते शंभर रुपये त्या बयेला ! जरा बाहेर जाऊन आलं तर बरं वाटेल आपल्याला. कांहीं खरेदीपण करायची होती तिला. आणि तेवढीच साऱ्यांच्या रोखलेल्या नजरेंतून थोडी सुटका. कारण आपल्या तऱ्हेवाईक वागणुकीचें साऱ्यांनाच नवल वाटत आहे हें तिच्या पूर्ण लक्षांत आलें होतें.

पण नेहमींपेक्षां कांहीं निराळयाच पद्धतीनें ती आज घराबाहेर पडली. आधीं डोळे मिटून एकदोन क्षण ती दाराजवळ उभी राहिली नि मग पाण्यांत बुडी घेतल्यासारखी रस्त्यावरील त्या जनप्रवाहांत ती एकदम घुसली. पायाला त्या कठीण दगडांचा स्पर्श झाल्याबरोबर त्या ऊबदार मानवीसमुद्रांत शक्य तितक्या झपाट्यानें आपण पाऊल उचलूं, असें तिला वाटत होतें. त्या बयेची भेसूर नजर आपल्याला दिसूं नये म्हणून आज ती डोळे खालीं लावूनच चालत होती...म्हणजे मग कसं कळेल आपल्याला ती आपल्या मागावर आहे कीं काय तें ? तरीहि भीतीचें तें भूत तिच्या मानगुटीवर बसलेंच होतें. आणि जरा कोणाचा थोडा धक्का लागला कीं तिचा जीव कसा गुदमरे! सभोंवतालचा प्रत्येक आवाज तिचा जसा छळवाद मांडी; तिच्या मागें पडणारें प्रत्येक पाऊल भयसूचक घंटेसारखें खणाणे; आणि रस्त्यावरील प्रत्येक सावली तिला अशुभसूचक वाटे. सुरक्षित असं म्हणून तिला कुठेंच वाटत नव्हतं.

"सलाम अलेकुम, झिन्नतबी," समोरून कोणी तरी म्हणालें. तिनें चमकून वर पाहिलें. त्यांच्या परिचयाचे एक वृद्ध गृहस्थ होते ते. झिन्नतला नेहमीं त्यांच्या बडबडया स्वभावाचा नि नेहमीं आपल्या

बारीकसारीक तक्रारी सांगत बसण्याचा मोठा राग यायचा; आणि ती त्यांना शक्य तों टाळायची. पण आज त्यांना तसेंच जाऊं दिल्याबद्दल तिला पश्चात्ताप झाला. उगीच सोडलं आपण त्यांना. किल्ल्याच्या तटासारखा आपल्याला त्यांचा उपयोग झाला असता, त्या बयेनें हल्ला केला असता तर. आणि या विचाराबरोबर त्यांना हांक मारण्यासाठीं ती अर्धवट वळलीहि. पण कोणी तरी आपल्या दिशेनें गडबडीनें येत आहेसें तिला वाटलें. कोण येताहे तें नीट पहायलासुद्धां न थांबतां आपोआपच झपाट्यानें पाऊल उचलून ती तीरासारखी पुढें चालूं लागली. पण पावलांचा तो आवाज तिच्या मागोमाग अजून येतच होता. आत्तां आपल्या खांद्यावर कोणी तरी हात टेवणार अशा कल्पनेनें तिनें आंग चोरलें. तीं पावलें अधिक जवळ येत होतीं. कसं निसटावं आतां? तिचे पाय थरथरूं लागले नि तिला चालणं कठीण होऊं लागलं. आलीं, आलीं जवळ तीं पावलें; भिडलीं आतां आपल्याला. कोणाचा तरी निग्रही पण मृदु आवाज तिच्या कानांत घुसला. "झिन्नत!" अं, पण आपल्याला भेदरवणारा हा आवाज नव्हे. ती थांबली; आणि इतक्या झपाट्यानें मागें वळली कीं, फैय्याझ तिच्या अंगावर जवळ जवळ कोसळलाच. त्याचा चेहरा मनःक्षोभानें पांढरा पडला होता. पण तिची ती गोंधळलेली मुद्रा पाहून तो लाजेनें लाल झाला. नेहमींसारखा त्यानें आपला हात पुढें केला; पण तिनें कांहींच हालचाल न केल्यानें खजील होऊन त्यानें तो मागें घेतला. त्याची अशी ही भेट ध्यानींमनींहि नसल्यामुळें, आपल्या अशा या पाहण्यानें तो खजील होऊन गेला आहे, हें तिच्या लक्षांत यायलासुद्धां चांगलीं एकदोन मिनिटें लागलीं. भीतीनें तिची सारखी पाठ धरल्यापासून तिनें फैय्या-

झचा एकदांहि विचार केला नव्हता. आणि आतां त्याची ती फिकट नि प्रश्नार्थक मुद्रा आणि भकास गोंधळलेली दृष्टि पाहून तिचा राग सोसाट्यानें वर उसळला. तिच्या थरथरणाऱ्या ओठांतून आरंभीं तर एक अक्षरहि बाहेर उमटे ना; आणि तिच्या तोंडावर स्पष्ट उमटलेला संतापाचा तो जळजळीत आविष्कार पाहून फैय्याझ तर पार विरघळून गेला.

"काय झालं झिन्नत?" त्यानें कसेंबसें अडखळत विचारलें. तिनें अधीरपणें आपली मान उडवली आणि तो अगदीं मवाळून जाऊन म्हणाला; "चुकलं माझं कुठे कांहीं?"

तिनें त्वेषानें त्याच्याकडे परत दृष्टि रोखली, आणि मग, "चुकलं! छे, छे; कांऽऽहीं नाहीं केलंत आपण — सगळं कसं छान सुरेख सुंदर, गोड गोड अगदीं!" उपहासानें ती उद्गारली.

फैय्याझ विस्मित होऊन आ करून नुसता उभा होता.

"पण, झिन्नत...झिन्नत...!"

"पुरे पुरे, चारचौघांत नको इथें तमाशा!" अधिकारयुक्त स्वरांत ती म्हणाली. "आपला तो नाटकीपणा नको आहे मला आतां; आपली ती नाजुकसाजुक मैत्रीण असेल नेहमींसारखी आपल्या पाळतीवर; आणि पांच मिनिटांतच येईल माझ्या पाठीवर पुन्हां, दोन पावलें मी गेलें नाहीं तोंच..."

"कोणाविषयीं बोलते आहेस तूं?"

त्याच्या त्या गयाळ चेहऱ्यावर चांगलीं पांच बोटं उठवावींसें वाटलं तिला. त्या खत्रूड कुतरड्याइतकी चीड तिला अजून कोणाची आली नव्हती.

" पण झिन्नत...झिन्नत," अधिकच निराश होऊन तो अडखळत म्हणाला; " काय केलं मी ? मला कधींच न भेटण्याचा तूं एकदम निश्चय केलास...रात्रंदिवस वाट पहात होतों मी तुझी...नि आज तर एकदोन क्षण तरी तुझ्याजवळ बोलायला मिळावं, म्हणून सारा दिवस तुमच्या बंगल्याजवळ उभा होतों. ..."

' वाट पहात होतास ? तूं —— तूं सुद्धां ? '

रागानें ती आतां पुरी आंधळी झाली होती. दोन तोंडांत द्याव्या चांगल्या नि व्हावं मोकळं, तिला वाटत होतं. पण आपल्या रागाला तिनें आवर घातला. तिरस्कारानें फक्त त्याच्याकडे पहात, सांगावं का याला काय वाटतं आपल्याला त्याच्याविषयीं तें, असा विचार करीत ती उभी होती. पण पूर्व संस्कारांनीं अखेरीस तिच्यावर विजय मिळवला. ती एकदम मागें वळली आणि इकडेतिकडे कुठेच न पहातां समोरील जनसंमर्दांत ती मिसळून गेली. फैय्याझ अगदीं सर्द होऊन कसलीच हालचाल न करतां अगतिकपणें उभा होता. अखेर, वाऱ्यावर भिरभिरत खालीं जलप्रवाहांत पडून असहायपणें ओघाबरोबर वाहत जाणाऱ्या एखाद्या पानासारखा, सभोंवारच्या त्या मानवीसमुद्राबरोबर तोहि निमूटपणें पुढें वाहून गेला.

—— आतां कांहीं दिवस तरी आपल्याला शांतता लाभेल अशी झिन्नतला वाटत असलेली आशा, दुसरेच दिवशीं परत आलेल्या निकडीच्या मागणीनें पार विरघळून गेली. तिची भीति परत चेकाळून उठली. या खेपेला दोनशें रुपयांची मागणी केली गेली होती. तिनें गुपचूप ते पैसे पोंचते केले. पण अशा या वाढत्या मागण्या कोणाला

न समजतां पुरवायला संपन्न झिन्नतसुद्धां असमर्थ होती. उद्यां या दोनशेंचे चारशें होतील. आणि असें हें वाढत कुठपर्यंत जायचें ? नि मग हें अशक्य झाल्यावर ? मग निनांवी पत्रांची मालिका सुरू होईल; आणि नंतर —— अटळ सत्यनाश ! आतां फक्त ती आपल्याच पैशानीं वेळ विकत घेत होती. आणि तोसुद्धां भीतीच्या जीवंत कांचणींत. तिच्या हातून हल्लीं शिवण टिपण किंवा वाचनहि होत नव्हतें. एखादे-वेळीं तर तिला इतकं बेचैन होई कीं, तिचें डोकें गिरगिरूं लागून हातपाय गार पडत नि ती मटकन खालीं बसे. आणि तिच्या देहाला जरी इतका शीण येई तरी रात्रीचा मात्र तिचा डोळ्याला डोळा म्हणून लागत नसे. तरीहि तिला नेहमींचं तें हंसरं जीवन बेमालूमपणें नटवावं लागे. पण या साऱ्यांचा तिच्या मनावर नि शरीरावर पडणाऱ्या ताणाची पुरी कल्पना कोणाला तरी आली असती काय ?

तिच्या भोंवतीं वावरणाऱ्या साऱ्या व्यक्तींतल्या फक्त एका व्यक्तीला काय ती तिच्या अंतःकरणांत पेटलेल्या खाईची कल्पना होती. कारण तो फक्त एकटाच तिचं सारखं निरीक्षण करीत होता. आणि ही जाणीव —— नव्हे खात्री —— झिन्नतला अधिक सावधगिरी बाळगायला लावीत होती. आणि तिनेंहि आपल्या पतीच्या हालचालीवर तशीच बारीक नजर ठेवली होती. रात्रंदिवस अशीं तीं दोघं एकमेकांवर कठोरपणें, डोळ्यांत तेल घालून पहारा करीत होतीं. त्यांच्यांतील हा सामना सुरू झाल्यापासून अझीझ पुष्कळच बदलला होता. त्याची आरंभींची संशयी चौकस वागणूक आतां जाऊन, तिची जागा, त्यांच्या विवाहानंतरच्या प्रारंभींच्या काळांतील मार्दवानें आणि विचारशीलतेनें घेतली होती. ती जणूं आजारी असल्याप्रमाणें तो तिच्याशीं हळुवारपणें वागे आणि

तिनें आपलें हृदय त्याचेजवळ उघड करावं, अशा प्रत्येक अनुकूल क्षणाला तो सहानुभूतीनें तिला चुचकारी. आपल्या यजमानांची ही सहृदयता झिन्नतला स्पष्टपणें कळून चुकली होती. आणि म्हणूनच लज्जेनें तिचा अधिकच संकोच होऊन त्या उदार हृदयाजवळ आपलं हृदय मोकळं करण्यास ती मुळींच कबूल होत नव्हती.

एक दिवस तर अझीझ स्पष्टच बोलला होता. झिन्नत त्या दिवशीं बाहेरून अशी फिरून येत होती. घराच्या पायरीजवळच अझीझचा अधिकारयुक्त दृढ स्वर, बाईचा तक्रारवजा चढा आवाज नि मुलांचं मुसमुसून रडणं या सर्वांचा संमिश्र आवाज तिच्या कानांवर आला. तिच्या मनांतली भीति एकदम जागी झाली. पत्र तर नाहीं ना येऊन पडलं आपण बाहेर गेल्यावर; तिच्या मनांत आलं, आणि ती चांगलीच हादरली. पण जरा वेळानें स्वतःला सावरून ती पायऱ्या चढून वर गेली. कांहीं नाहीं, त्यांच्या आत्याबाईनीं कांहीं दिवसांपूर्वीं दिलेल्या झुलत्या घोड्यावरून मुलांचं कांहींतरी भांडण चाललं होतं. शरफूला दिला होता घोडा, आणि तो सुंदर घोडा त्याला दिल्यामुळें सकीनेला मोठाच घुस्सा आला होता. आणि तो तर तिला त्याला मुळीं हात-सुद्धां लावून देत नव्हता. त्याचा जणूं सूड म्हणून तिनें तो मोडून-तोडून त्याचे तुकडेसुद्धां पार लपवून ठेवले होते. कांहीं केल्या अप-राध म्हणून ती कबूल करी ना. अखेरीस नाइलाज म्हणून बाईनीं मालकांसमोर फिर्याद गुदरली होती. झिन्नत आंत आली तेव्हां फिर्या-दीची सुनावणीच चालली होती. आरोप सफा नाकबूल करणारी सकीना, बाई साक्षीदार आणि शरफू फिर्यादी. अखेरीस सकीनाच्यानें धीर निघे ना आणि ती अगदीं हमसाहमशीं, स्फुंदून स्फुंदून रडूं लागली.

झिन्नतचे डोळे एकट्या अझीझकडे लागले होते. सकीनेऐवजीं आपलाच इन्साफ करण्यासाठीं तो बसला आहे असें तिला वाटलें. आपल्यालासुद्धां नाहीं का आज ना उद्यां असंच सकीनेसारखं, अपराधी म्हणून थरथरत, भेदरट आवाजांत कबूली देत त्याच्या समोर उभं रहावं लागणार आहे? सकीना जोंपर्यंत आपला अपराध कबूल करीत नव्हती तोंपर्यंत अझीझ तिच्याकडे रागानें पहात होता नि कठोरपणें बोलत होता. पण तिनें कबूली द्यायला सुरुवात केल्याबरोबर तो मवाळला. तो मृदुपणें तिची चूक तिला आतां पटवून देत होता नि तिचा दुष्टपणा तिच्या नजरेस बरोबर आणीत होता. आणि स्वतःच्या दुष्टपणाची पूर्ण जाणीव झाल्याबरोबर सकीनेला पण परत एकदां जोराचा उमाळा येऊन तिनें मोठ्यानें रडत सर्व कांहीं कबूल केलें.

झिन्नत घाईघाईनें सकीनेजवळ धांवत गेली, पण तिनें तिला दूर ढकललें. अझीझनेंहि तिच्या या अकाल नि दुबळ्या सहानुभूतीबद्दल तिला दोष दिला. त्याच्या मनांतून सकीनेला अशी — शिक्षेवांचून जाऊं द्यायची नव्हती. दोघांहि मुलांना सकाळीं त्यांच्या मित्राच्या वाढदिवसाला जायचं होतं. आणि दोघंहि त्या वेळेची अधीरपणें कितीतरी दिवस वाट पहात होतीं. पण, सकीनेला आतां तिकडे जायला मिळणार नव्हतं.' आपल्या वडिलांच्या त्या कठोर शब्दांबरोबर सकीनेनें अगदीं निराशेनें मोठा गळा काढला. शरफूनें तिकडे आनंदानें खोलीभर नाचायला सुरुवात केली. पण दुसऱ्याच्या दुःखावर अशा डागण्या देणं चांगल्या माणसाला शोभत नाहीं, म्हणून अझीझनें त्यालाहि सटकावलें; आणि त्याची शिक्षा म्हणून त्यानेंहि वाढदिवसाला जायचं नाहीं म्हणून फर्मावलें. आपल्या दोघांच्याहि आनंदाचा विरस झाला



संग्रहालय,
अनुक्रम
विभाग
क्रमांक

म्हणून अतिशय खिन्न होऊन तीं दोघंहि भावंडें गुपचूपपणें खोली-बाहेर पडलीं. आपण दोघंहि समदुःखी आहोंत एवढंच एक त्यांना त्यांतल्या त्यांत बरं वाटत होतं.

तीं दोघं पतिपत्नी आतां खोलींत एकटींच होतीं. आणि सकीने-वरून बोलतां बोलतां, आलं तर आत्तांच आपल्याला स्वतःचं हृदय आपल्या पतीजवळ मोकळं करतां येईल, नाहींतर कधींच नाहीं, असं झिन्नतच्या मनांत येत होतं. सकीनेची आपण तरफदारी करूंया आणि ती जर अझीझनें नीट ऐकून घेतली तर मग आपणहि धीर करायचा कीं नाहीं, तें ठरवितां येईल.

" अझीझ, खरंच का त्या छोकऱ्यांना तूं उद्यां तिकडे जाऊं देणार नाहीं आहेस ? किती निराशा होईल बिचाऱ्यांची, नि सकीनेची तर फारच. एवढा का घोर अपराध आहे तिचा ? शिक्षा जरा जादा कडक आहे असं नाहीं तुला वाटत ? तुला नाहीं अझीझ दया येत त्या पोरीची ? अयाई ! "

त्यानें तिच्याकडे निश्चल दृष्टि लावली.

" दया ! हो आली होती मला दया. पण आतां तिला तिची जरूर नाहीं. तिचं मन आतां सर्व कांहीं संपल्यामुळें अगदीं हलकं हलकं झालं आहे. आतां जायला मिळत नाहीं, म्हणून तिला वाईट वाटणारच. त्या मोडक्या घोड्यासाठीं आपण सगळं घर काल पालथं घालीत होतों आणि तो कोणी मोडला याचा तपास करीत होतों, त्या वेळीं आपण आतां सांपडणार कीं काय, अशा भीतीनें तिची तारांबळ उडत असतां-नाच तिची खरीखुरी कींव मला येत होती. ही असली भीतीच शिक्षे-पेक्षां जास्त तापदायक असते. कारण शिक्षा ही आपल्याला स्पष्ट उमजतां

तरी येते, तिला निश्चितपणा असतो. पण भीतीनें मनाला पडणारा प्रखर ताण, हा फार जाचक असतो. मी शिक्षेचा उच्चार केल्याबरोबर त्या छोकरीच्या मनाची फाजील ताणलेली तार तटकन तुटली आणि तिला मोकळं वाटलं. आणि तिला आलेला उमाळा तसाच तिथे किती वेळ तरी दाबलेला होताच. आतां मात्र तिला कांहींच छपवायचं नाहीं. आत्तांचे तिचे हे अश्रु हे हृदय मोकळं — खुलं झाल्याचे दर्शक आहेत. त्यांचं कांहीं तुला एवढं वाटायला नको. ते तसे दाबून, कोंडून ठेवलेले अश्रुच अतिशय जाचक असतात...!"

कोणाविषयीं बोलतो आहे हा, सकीनेबद्दल कीं माझ्याबद्दल? तिनें त्याच्याकडे प्रश्नार्थक नजरेनें पाहिलें. पण तिकडे न पाहिल्यासारखा तो पुढे बोलत होता:

"माझं ऐक तूं, असंच होत असतं नेहमीं. अनेक खटले हाताळलेल्या माझ्यासारख्या वकीलाला निदान एवढं तरी कळतंच. आरोपीला जोंपर्यंत कांहीं लपवायचं असतं, तोंपर्यंतच त्याची केविलवाणी अवस्था असते. उघडकीस येण्याचं भय, आणि सतत सारखं सुसंगत खोटं बोलत राहण्याची ती आपत्ति, हीं मुरलेल्या गुन्हेगारालासुद्धां गडबडवून टाकतात. प्रश्नांची सारखी चाललेली सरबत्ती, आपल्याला आतां कोंडीत कोंडीत सारं कांहीं ओकायला लावणार, या कल्पनेनें आरोपीला होणाऱ्या वेदना मी पाहिल्या आहेत. एखादे वेळेस तर शब्द त्याच्या अगदीं ओठाशीं आलेले असतात. पण कांहींशी भीति आणि कांहींशी मग्रूरी हीं त्यांना परत आंत खेंचतात. मग परत ती झटापट सुरू होते. कित्येक वेळां न्यायदेवतेलाच याचा अधिक त्रास होतो. आणि आरोपीला मात्र ती शत्रुसमान वाटत असते. वस्तुतः

तीच त्याची खरी साहाय्यकारी असते. आरोपीचा वकील म्हणून, कांहीं झालं तरी त्यानें आपल्या जबानीला घट्ट चिकटून रहावं म्हणून मी नेहमीं पहात असतों. तरी पण एखादे वेळीं शिक्षा सुनावली जाऊन त्या बिचाऱ्याच्या यातना थांबाव्या, म्हणूनहि मला बघावं लागतं. पण ज्यांना पुढें आपल्या अपराधाची कबुली देण्याचं धैर्य होत नाहीं, त्यांना त्या साहसाच्या रस्त्यानें जाण्याचं आधीं धाडसच कसं होतं, हें मात्र मला अजून उमगलं नाहीं. आणि स्वतःच्या अपराधीपणाचा कबुलीदर्शक तो एकच शब्द, इतका त्रासदायक नि भीतिदायक ठरावा, हें तर मला त्या अपराधापेक्षांहि अधिक निंद्य नि करुणास्पद वाटतं. ..."

"अशा वेळीं भय हेंच एक मुख्य कारण असतं, असं का वाटतं तुला अझीझ? लाज पण नसेल का होत याला कांहीं कारणीभूत? साऱ्याचं स्पष्टीकरण करणं, सारं कांहीं चारचौघांत असं उघडंनागडं करणं याची लाज नसेल...?"

त्यानें गोंधळून आणि चकित होऊन वर पाहिलें. अशी वाद-विवादांत ती कधीं उदमेखून भाग घेत नसे. तिच्या शब्दांची त्याला गंमत वाटली.

"लाज? भीतीचं तें केवळ एक वेगळं रूप आहे. त्याचा दर्जा भीतीहून वरचा आहे हें मला मान्य आहे. आणि शिक्षेच्या भीतीनें पण लाज उत्पन्न झालेली नसते, हेंहि खरं. पण ती कांहींशी...हं, हं! आलं लक्षांत. ..."

आपल्या जागेवरून तो उठला आणि अतिशय आवेगानें तो खोलींत फेऱ्या मारूं लागला. कांहीं तरी त्याच्या जिव्हारीं बोंचलें होतें.

तो एकदम तिच्यासमोर थांबला आणि भावनाविवश होऊन आतां-पर्यंतची आपली वेंचक, सूत्रमय भाषा त्यानें बदलली.

"कबूल! चारचौघां परक्या माणसांसमोर, आणि खालच्या दर्जाच्या वृत्तपत्रांतील गटार उपसणीस चटावलेल्या तेल्यातांबोळ्यां-समोर, अशी कबुली देण्याची लाज वाटेल, हें अगदीं कबूल. पण आपल्या आवडत्या माणसाजवळ कबुली द्यायला लाज कां वाटावी, हें नाहीं मला समजत!"

"पण असं पहा," झिन्नत त्याच्या डोळ्यांतील चमक सहन न होऊन आणि आपला आवाज कांपरा येतो आहे हें पाहून मान बाजूला वळवून बोलत होती; "आणि जर...तें माणूस आवडतं असल्या-मुळेंच जर लाज वाटत असली तर?"

भारल्यासारखा तो स्तब्ध उभा होता.

"म्हणजे...म्हणजे तुझं म्हणणं—" अडखळत तो हे शब्द उच्चा-रीत असतां त्याचा आवाज मृदु नि लाडिक झाला होता — "म्हणजे तुझं म्हणणं असं...कीं, सकीनेनें आपली चूक बाईजवळ जितकी लौकर कबूल केली असती, तितकी...?"

"होय, माझी खात्री आहे तशी. ती अशी आडमुठ्यासारखी नि हेकटपणानें वागली याचं कारण तुमच्या मताची तिला अधिक किंमत आहे, कारण...दुसऱ्या कुणापेक्षां तुमच्यावर तिचं अधिक प्रेम आहे; कारण..."

झिन्नत अडखळली आणि अझीझ परत आपल्या फेऱ्या थांबवून तिच्यासमोर उभा राहिला.

"असेल, तसं असेल...नाहीं, तसंच असलं पाहिजे...पण

माझ्या ध्यानांत कशी नाहीं आली ही बाजू; आश्चर्य आहे! पण तुझंच म्हणणं खरं आहे, आणि मी इतका कठोर पण नाहीं. अंहं; तसं नाहीं तुला कधीं वाटतां कामा. मलाहि काळ वेळ समजते..."

त्याच्या त्या दृष्टीपुढें ती गोंधळून लाल झाली. सहजच का बोलतो आहे हा, कीं जाणूनबुजून, हेतुपुरस्सर...आपल्यालाच कांहीं सुचवायच आहे त्याला...? तिच्या मनाचा कांहीं निश्चय होत नव्हता.

"कोर्टानें ही शिक्षा रद्द केली आहे." तो हंसत म्हणाला. "सकीनेला पूर्ण मोकळीक आहे आतां. मीच जातों तिला ही गोड बातमी द्यायला. आतां झालं ना तुझ्या मनासारखं? कीं आणखी आहे कांहीं इच्छा? चला, राजा उदार झाला आहे...ओः, केवढा अन्याय करीत होतों मी! किती मोकळं वाटतं, झिन्नत, किती मोकळं वाटतं नेहमीं, असं जेव्हां..."

त्याला काय सुचवायचं आहे तें झिन्नतला दिसत होतं आणि अभावितपणेंच ती त्याच्याजवळ गेली. तिला मुक्त करणारा तो शब्द तिच्या ओठाशीं थरथरत होता. तिला चुरगळून टाकणारं तिच्या मनावरील तें दडपण आपल्याच हातांनीं जणूं दूर करण्यासाठीं तोहि तिच्या थोडा जवळ सरकला. तिचे डोळे त्याच्या डोळ्याला भिडले. किती आतुरतेनें तिच्या कबुलीची ते वाट पहात होते?— आणि तिचा निश्चय एकदम ढासळला. तिचे हात निर्जीवपणें खालीं गळले आणि ती मागें फिरली. "अशक्य," तिच्या मनांत आलें. "मला नाहीं जमायचं तें. माझ्यानें नाहीं कबुली देववायची. माझ्या हृदयाला शांति देणारे ते शब्द माझे ओठ उच्चारूं शकत नाहींत!" पण तिच्या खोल खोल अंतःकरणांत मात्र, या साऱ्या यातनांचा शेवट करण्याची आतुरताच तिला लागून राहिली होती.

आणि तिच्या या आतुरतेला अपेक्षेपेक्षांहि लौकर फळ येणारसं दिसूं लागलं. गेले पंधरा दिवस हा कोंडमारा ती सोशीत होती आणि त्या विलक्षण ताणानें झिन्नतचं अवसान सुटण्याच्या अगदीं बेतांत आलं होतं. या गेल्या चार दिवसांत त्या बयेनें कांहीं हालचाल केली नव्हती हें खरं. पण भीती ही आतां झिन्नतच्या आंगांत पुरी मुरली असल्यानें, कसल्याहि आवाजानें ती कमालीची दचके. प्रत्येक क्षणाला तिच्या पत्रावर ती कशी टपून बसली होती. आणि तिच्या मनांतील अस्वस्थपणाची जागाहि हळू हळू आतुरतेनें घेतली. कारण तिनें दिलेल्या प्रत्येक लांचागणिक, विकत घेतलेला निदान तो एक दिवस तरी तिला स्वस्थता मिळत होती, आणि आपल्या मुलांच्या संगतींत ती खेळूं-बागडूं शकत होती. किंवा मोकळेपणानें बाहेरून कुठून फिरून येऊं शकत होती.

दारावरची विजेची घंटा घणघणली आणि झिन्नत स्वतःच दार उघडण्यासाठीं खालीं धांवली. ऐटबाज पोशाकांत कोणीतरी एक बाई बाहेर उभी होती...छे, कोणी तरी कशी ? त्याच राक्षसिणीचा मुखडा तो...

"सलाम, सलाम झिन्नतबी; थोडं जरूरीचं काम आहे माझं तुमच्याजवळ." आणि झिन्नतच्या बोलावण्याची वाटहि न पाहतां सरळ आंत घुसून तिनें आपली शाल पुढल्या दिवाणखान्यांतील टेबलावर टाकली. स्वतःच्या मालकीच्या घरांत असल्यासारखीच ती वागत होती. आणि अशा ऐटबाज बंगल्यांत घुसल्याबद्दल तिला समाधानहि वाटत होतें. दिवाणखान्यानजीकच्या खोलींत तिनें न विचारतां आतां दरत प्रवेश केला.

" इथेच बसूं या, नाहीं आपण ? " तिनें खवचटपणें विचारलें.

भीतीनें गारठलेली झिन्नत तिला अडवणार तोंच ती हात वेळावून लघळपणें म्हणाली :

" असूं दे, असूं दे; तसा कांहीं फार वेळ नाहीं लागायचा आपल्याला. आणि वाटलंच तितकं आपल्याला तर उरकूं आणखी झटपट."

झिन्नतनें निमूटपणें तिच्यामागून आंत जाऊन दार ढकललें. " निर्लज्ज कोडगी मेली," ती आपल्याशींच पुटपुटली. " घरांतच घुसली आतां बया. इतकी धिटाई करीलशी कल्पना देखील नव्हती मला." एखाद्या दुःस्वप्नानें धास्तावल्यासारखी ती दिसत होती.

" सुंदर, सुंदर; झकास आहे अगदीं हां ही ईझिचेअर ! " खालीं बसत ती आगंतुक बया म्हणाली. " आणि, बाई माझे ! या तसबिरी तरी किती आहेत इथें ! नाहीं तर आमची ती भिकार खोली. खरंच, झिन्नतबी, सारं कसं अगदीं झकास सुबक नि टुमटुमीत आहे हं !"

त्या बदमाष बयेचा तो उद्धटपणा आणि तिचं तें दुसऱ्याच्या घरांत स्वतःच्या घरांतल्यासारखं निःसंकोच वागणं पाहून झिन्नतचा स्वतःवरचा ताबा सुटला, आणि कितीतरी दिवस कोंडलेला मनांतील संताप आतां अगदीं उफाळून बाहेर आला.

" किती पैसे उकळायचे आहेत आतां या बदमाषीनें ? " ती मोठ्यानें ओरडली. " एवढी आतां घरांत घुसलीस हं माझ्या ? पण आतां नाहीं तुझा छळ मी सोसणार. अगदीं निश्चय केला आहे मी तुला..."

" अं हं; जरा हळू. नोकर माणसं ऐकतील तुमचीं; मला नाहीं त्याचं म्हणा कांहीं. तुम्ही काय म्हणतां तें खरं आहे. आणि जरी गेलेंच

मी तुरुंगांत, तरी या माझ्या आजच्या जिण्यापेक्षां बराच आहे तो. पण आपलं तसं नाहीं बेगमसाहेब! आपण अधिक काळजी घेतली पाहिजे. निदान तें दार तरी नीट घट्ट लावा, असा ओरडा करण्यापूर्वी. आणि हें पहा — तुम्ही किती जरी आरोप केलेत नि दमदाटी केलीत तरी माझ्यावर त्याचा कांऽऽहीं परिणाम व्हायचा नाहीं."

रागानें झिन्नतला एक क्षणभरच काय तें अवसान चढलें होतें, पण त्या बयेचा तो बर्फासारखा थंडपणा पाहून तिचें अवसान आतां हळुहळू गळत होतें. आणि आपल्या त्या स्वतःच्याच खोलींत, आतां काय आणखीं नवीन येणार याची वाट पहात, एखाद्या लहान पोरासारखी साशंक नि दीनवाणी, ती उभी होती.

"बरं तर झिन्नतबी, आतां मी स्पष्ट बोलतें हं. आजकाल माझा संसार आपला खुट्टुरुटूच चालला आहे. घरभाडंहि थकलंय पुष्कळ — आणि मालकहि आला आहे मेला तेरीमेरीवर. दुसरीं देणींहि आ करून आहेतच. आणि कांहींतरी करून हीं सारीं तोंडं मला मिटवलींच पाहिजेत. म्हणून आल्यें आहें मी तुमच्याकडे बरं. एक चारशें रुपये द्या फक्त."

"मुळींच शक्य नाहीं इतके मला. इतके मुळीं शिल्लकच नाहींत माझेजवळ. तीनशें रुपये दिले आहेत आत्तांपर्यंत मी माझ्या खासगींतून. आतां कुठून आणूं मी हे पैसे?"

"तुम्हांला सांपडेल हो वाट, त्याची नको काळजी. हवेत म्हटलं कीं, तुमच्यासारख्या श्रीमंतांना काय, कुठेंहि मिळतील. पण हवेत म्हणण्याचा ठाम निश्चय बरीक पाहिजे, बरं का! जरा विचार करा झिन्नतबी; म्हणजे सांपडेल बघा वाट..."

"पण माझ्याजवळ खरंच नाहींत पैसे. असते तर दिले असते. अगदीं खरं खरंच सांगतें मी. आत्तां जास्तींत जास्त फार तर शंभर एक..."

"पण मी सांगितलं ना चारशें तरी हवेतच मला, सारं मिटवायला." झिन्नतच्या शंभरांना डावलून ती बया म्हणाली.

"खरंच नाहींत हो माझ्याजवळ!" झिन्नत कळवळून म्हणाली. कोणत्या क्षणीं अझीझ आंत येईल नि ही बया त्याला दिसेल या भीतीनें तिचा जीव अगदीं खालवर होत होता. "अगदीं कसम खाऊन सांगतें मी, एवढे नाहींत माझ्याजवळ..."

"तेवढी हालचाल करून जरा शोधा."

"अं हं!"

तिनें झिन्नतकडे एकदां आपादमस्तक पाहिलें; जणूं काय तिचीच किंमत ती करीत होती.

"ही आंगठी आहे कीं हिऱ्याची! गहाण टाकायचाच काय तो अवकाश. आतां, असल्या जिनसांचा अदमास नाहीं म्हणा मला. कारण आमच्याजवळ कुठले गरीबाजवळ हिरे! पण चारशें काय, त्यावर सहज मिळतीलसं वाटतं मला."

"ही आंगठी?" नुसत्या सूचनेनेंच भेदरून जाऊन झिन्नत म्हणाली. तिच्या विवाहमांगल्याचं प्रतीक होतं तें. कधींहि त्या आंगठीला ती विसंबत नसे. आंतला तो खडाहि मोठा पाणीदार नि त्याचं कोंदण तरी किती मोहक!

"त्याला काय झालं? पावती आणीन कीं मी गहाणाची! केव्हांहि सोडवतां येईल तुम्हांला ती. आंगठी नक्की परत मिळेल बघा तुम्हांला;

मी कांहीं घेणार नाहीं ती. मला गरीबाला हो कशाला, असली भारीं-तली आंगठी ?"

"कां छळते आहेस पण मला अशी ? कां माझ्या इतक्या राशीस लागली आहेस ? माझ्यानें नाहीं सोसवत हें आतां; खरंच ! थोडीसुद्धां नाहीं का तुला दया येत ?"

"माझी कुणी आजपर्यंत कींव केली आहे ? भुकेनें कुजत पडल्यें होत्यें मी आत्तांपर्यंत. आणि आपल्यासारख्या नवाबजादीची मला कां म्हणून कींव यावी ?"

झिन्नत कांहींतरी उत्तर देणार इतक्यांत व्हरांड्यांतील दार वाजलें. अझीझ कोर्टांतून परत आला होता. आपण काय करतों आहों हें कळण्यापूर्वीच झिन्नतनें बोटांतून आंगटी ओरबाडून काढली आणि ती तिच्या हातांत टाकली.

"अशा घाबरूं नका. मी चाललें;" ती बया म्हणाली. झिन्नतचे कावरेबावरे डोळे आणि तिची उडालेली घाबरगुंडी यांवरून बाहेर वाजलेलें धिमें पाऊल आपल्या या सावजाच्या यजमानांचेंच आहे हें तिनें बरोबर ओळखलें होतें.

तिनें दार उघडलें आणि तिच्याकडे बेफिकीरीनें दृष्टिक्षेप केलेल्या घराच्या त्या मालकाला लवून सलाम करून ती रस्त्यांत दिसेनाशी झाली.

ती दिसेनाशी झाल्यावर झिन्नत आपल्या निस्त्राण गात्रांना कसेंबसें स्थिर करून अझीझकडे वळून दुबळेपणानें म्हणाली, "कांहीं तपास करायला आली होती ती." तिचं संकट निदान आतांपुरतं तरी टळलं होतं. बॅरिस्टर साहेबांचें तिकडे लक्ष नसल्यासारखें दिसलें. ते सरळ आंत जाऊन चहाच्या टेबलाजवळ बसले. आणि त्यांच्या चहा-पानास सुरुवात झाली.

पण झिन्नतमात्र अस्वस्थ होती. आंगठीची ती रिकामी जागा तिला जशी कांहीं आंतून भाजीत होती. आणि आपली आंगठी जागेवर नसल्याचेंहि साऱ्यांचे ध्यानांत येणारच, असें तिला वाटत होतें. हात कसाहि ठेवला तरी अझीझचे डोळे तिकडे लागल्यासारखे तिला वाटत. तिकडून साऱ्यांचें लक्ष काढून घेण्यासाठीं मग तिची तीव्र धडपड चालू झाली; आणि अझीझजवळ ती कांहींतरी सारखी बोलत सुटली. मधूनच मुलांची थट्टाहि ती करी. अशी संभाषणाची गाडी तिनें कशी-बशी भरधांव दौडत ठेवली. पण अखेरीस त्या फाजील उत्साहानें तिलाच दमल्यासारखें झालें आणि संभाषणाचा ओघ मग हळुहळू मंदावत जाऊन अखेरीस साऱ्यांवरच ती अस्वस्थपणाची तापदायक छाया पसरून राहिली. परत एकदां खोलींत नेहमीचें हंसरें वातावरण उत्पन्न करण्यासाठीं ती पुढें सरसावली. तिनें आपल्या छोट्याबच्चांना थोडें खुलविलें — पण त्यांची कळी कांही उमलेना. त्या दोघांत रोजच्यासारखी तिनें कलागत पण लावून पाहिली. तरीहि तीं कांहीं केल्या तिला आज बधत म्हणून ना. काय बरं झालं आहे आज साऱ्यांना? माझं हें उसनं अवसान ओळखलं आहे बहुतेक त्यांनीं; नाहींतर माझे हे सारे प्रयत्न असे निष्फळ नसते झाले! अखेरीस मग तीहि निराशेनें कंटाळून स्वस्थ बसली.

चहा पितांना काय कोणाची हालचाल नि आवाज होत असेल तेवढाच. बाकी सारं कांहीं जसं शांततेंत पार बुडून गेलं होतं.

"तुझी आंगठी कुठे आहे ग खड्याची?" अझीझनें एकदम विचारलें.

अखेरीस आलाच तर तो प्रश्न; ठीक आहे! अखेरचा प्रयत्न हा

केलाच पाहिजे आतां. बरं तर, हें घे उत्तर म्हणावं. झिन्नत स्वतःशींच असं एकवार म्हणून मग म्हणाली: " थोडी साफसूफ करायला दिली आहे मी ती." या उत्तरानें तिलाहि थोडें बरें वाटून ती पुढें म्हणाली: " एकदोन दिवसांत होईल ती तयार बहुधा."

पण आतां दोन दिवसांत आंगठी परत आणण्याची जबाबदारी तिच्यावर आली, कशी सोडवायची पण ती आंगठी ? तरीहि आपल्या यातनांचा शेवट जवळ आला, आपल्याला तो निश्चित दिसूं लागला, या कल्पनेनें तिला हायसें वाटलें. ती निर्णायक घटका तिला नजीक दिसत होती. आणि एक प्रकारचं आत्मिक धैर्य तिच्यांत उत्पन्न झालं. — एक तर जीवन किंवा मृत्यू. कशालाहि आपण आतां तोंड देऊं !

जीवनमरणाच्या निर्णायक घटकेच्या जवळ येण्याच्या या जाणीवेनें, तिचा विचारांचा गोंधळ एकदम अकल्पितपणें संपला. तिला सारखी सतावणारी तिची कावरीबावरी — चिडखोर वृत्ती नाहींशी होऊन, तिथें सुसंगत विचारांचें स्थैर्य आलें. भीति दूर पळाली नि तिची जागा मानसिक समाधानानें घेतली; आणि अंतरंगांतील या सामर्थ्यानें एखाद्या द्रष्ट्यासारखी स्वतःच्या आयुष्याचा ती आतां नीट विचार करूं लागली. आपल्या आयुष्यांत खरोखरीच कांहीं स्वयमेव सार आहे काय? ...नाजूक तराजूंत जोखल्यासारख्या साऱ्या गोष्टी ती पारखून पहात होती...आहे, जगण्यांत अजूनहि कांहीं अर्थ आहे; अजूनहि आपल्याला तें जीवन खरंखुरं उपयुक्त करतां येईल. पण तें आपल्याला आधीं निर्मळ नि उदात्त केलं पाहिजे — कारण तिच्या दृष्टीला तिचं तें आजचं जीवनहि दिसतच होतं. आणि सत्याच्या, निर्मळ सत्याच्या भक्कम नि अविनाशी पायावरच असलं अधिक निर्मळ

नि पवित्र जीवन आपल्याला उभारतां येईल; नाहीं तर नाहीं. पण तें परित्यक्तेचं जीवन, एखाद्या सामान्य जारिणीचं तें डागळलेलं विषारी जीवन ?......अशक्य ! या झिन्नतला तरी तें केवळ अशक्य आहे. आणि आतां हा तापदायक लपंडाव, तरवारीच्या धारेवरील हा घातकी नाच — आतां नाहीं आपल्याच्यानें यापुढें रेटणार. आतां नाहीं आपल्यांत ती ताकद. आपला पति, आपलीं तीं वछडीं, तीं नोकर माणसं — सारं सारं घर जसं कांहीं संशयी नि अस्वस्थ झालं आहे. आपले आपणच किती संशयी झालों आहोंत ! नि कुठे निघून जाणंहि नाहीं दिसत शक्य. कारण कुठेंहि गेल, तरी ती बया नाहीं आपला माग काढल्याशिवाय रहायची, नि तो कबुलीजबाबाचा मार्गहि आतां आपल्याला बंद आहे ! एकच — फक्त एकच एक मार्ग आपल्यापुढें खुला आहे...पण त्या रस्त्यावरून गेलेला कोणताच प्रवासी कधीं परत येत नाहीं !...

•

दुसरे दिवशीं झिन्नतनें आपले सर्व कागदपत्र धुंडाळले. आणि चोरट्या चिठ्याचपाट्या जाळून टाकल्या. इतरहि कांहीं बारीकसारीक आवराआवर केली, आणि मुलाबाळांकडे मुळीं ती फिरकलीच नाहीं. मनाशीं निश्चित केलेल्या आपल्या विचारांत मुळींच चलबिचल होऊं नये म्हणून आपल्या आयुष्यांतील साऱ्या गोड, मोहक गोष्टींपासून नि स्मृतींपासून ती दूर दूर अशी फिरत होती. आणि सारं कांहीं मनासारखं लागल्यावर ती बाहेर पडली. त्या कैदाशिणीची तिला आतां भेट हवी होती. कशी तरी, कुठे तरी ती बया भेटेल म्हणून ती विमनस्कपणें इकडेतिकडे भटकत होती. तिचा जीवात्मा दमून गेला होता

आणि झगडण्याची धमकहि तिच्यांतून कायमची दूर निघून गेली होती. किती वेळ तरी ती अशी एकाच आशेनें हिंडत होती. पण तिला हवी असलेली ती व्यक्ति तिला कुठेंच दिसत नव्हती. पण खिन्नतला निराशाहि आतां सतावूं शकत नव्हती. कदाचित् पडलीहि नसेल ती बया आज बाहेर, कुणास ठाऊक! सभोंवार वावरणारे सारे चेहरे तिला निर्जीव, अस्पष्ट, तिकडे दूर अंतरावर असल्यासारखे दिसत होते. आणि तिला त्यांच्याशीं कांहीं कर्तव्यहि नव्हतें.

तिकडे रस्त्यापलीकडे तिला अझीझचा भास झाला आणि ती क्षणभर पार भेदरून गेली. पण ती भीतिदायक आकृति त्याच क्षणीं एका लॉरीच्या आड दिसेनाशी झाल्यामुळें तो अझीझ नसेलच मुळीं, या कल्पनेनें तिनें आपलें समाधान करून घेतलें. कारण कोर्टांत असेल तो या वेळीं, तिला आठवलें. पण तिच्या त्या भटकंतींत वेळेचें अवधान कांहीं तिला राहिलें नाहीं; आणि घरीं चहाला यायला तिला उशीर झाला. पण अझीझलाहि उशीर झाला होता; आणि तिच्या मागोमाग दोनचार मिनिटांनींच संत्रस्त अशा मनःस्थितींत तो आंत आला.

सायंकाळ व्हायला किती अवकाश आहे पण अजून? आणि हें घड्याळ तरी मेलं किती रेंगाळत चाललं आहे! आणि आपल्याला तर काय, सारीं पांचदहा मिनिटंच पुरतील साऱ्यांचा निरोप घ्यायला. किती भरलेलं आहे आपलं सारं हें घर? पण यांतली एक तरी आहे का वस्तु आपल्याबरोबर येण्यासारखी? एकट्यालाच आपल्याला क्रमायचा आहे तो अखेरचा मार्ग. काय किंमत आहे मग यांची? आणि तिला आश्चर्य वाटलं या विचारानें. एक प्रकारचा सुंदपणा आतां तिच्या आंगावर आला होता नि एखाद्या निर्जीव यंत्रासारखी ती घरा-

बाहेर पडली. सभोंवारचें सारें चालतेंबोलतें जग तिला शून्य झालें होतें, आणि तिचीं पावलें विचारशून्यतेनें कुठें तरी पडत होतीं. तिकडे रस्ता ओलांडतांना एकदां तर ती गाडीखालीं जवळ जवळ सांपडतच होती. पण ड्रायव्हरनें एक गलिच्छ शिवी हांसडून नि दांतओंठ चाऊन गाडी कशी तरी बाजूला घेतली. पण याचा कसलाच परिणाम तिच्या मनावर न होतां झिन्नत पुढें चालू झाली. तिला कांहींच करावं न लागतां तिचं पाऊल कसं विनासायास आतां जगाबाहेर पडलं असतं. विचारांचा कांहीं त्रास नाहीं; नुसतं असं एखाद्या पानासारखं तरंगत तरंगत, अखेरची जाणीव मनाला शिवतां शिवतां प्रवासाचं टोंक गांठायचं; कीं संपलं !!

मध्येंच एकदां डोळे वर करून आपण कुठें आहोंत तें झिन्नतनें पाहिलें. आणि आपल्या या हेतुशून्य भटकंतींत आपण फैय्याझच्या घराशीं आलों आहोंत, हें उमजतांच ती भयभीत झाली. पण सूचक तर नसेल ना हें? कदाचित् होईलहि मदत त्याची. निदान त्याला पत्ता तर असेल माहीत त्या बयेचा. मुक्ततेच्या या सुखद विचारानें तिचें आंग थरारलें. आधीं कसं नाहीं पण आपल्या ध्यानांत आलं हें? मनाच्या या उल्हासाला तिच्या शरीरानेंहि मग प्रत्युत्तर दिलें. तिच्या हातापायांतील जडता कमी झाली, आशेनें औदासीन्याला पळवून लावलें आणि तिच्या विचारांतील गोंधळ पार नाहींसा झाला. त्या बयेच्या घरीं फैय्याझला आपण आपल्याबरोबर यायला लावूं नि मग साऱ्या गोष्टींचा पुरता सोक्षमोक्ष करून टाकूं, असा तिनें मग विचार केला. फैय्याझ देईल तिला चांगली सणसणीत ताकीद; आणि कदाचित् एखादा शेवटला चांगला भरघोस घांस तिला चारून हा

गांवदेखील तिला आपण सोडायला लावूं...उगीच आपण फैय्याझशीं इतक्या कठोरपणें वागलों...पण तरीहि करील तो आपल्याला मदत; अगदीं निश्चित! इतका सोपा उपाय नि तो आपल्याला अशा शेवटच्या घटकेला सुचावा हें नवलच आहे...पण बचावाचा हा उपाय तर खराच!

ती घाईघाईनें जिना चढून वर गेली आणि दारावरील घंटेचें बटण तिनें दाबलें. दार अजूनहि बंदच होतें. पण कुणी तरी हळूच चौब्यांवर चालत आहे असा तिला भास झाला. तिनें परत बटण दाबलें. तरीहि तीच निगूढ शांतता — आणि दारामागें परत तोच अस्पष्ट, कपड्यांचा खसखस असा आवाज...तिला आतां धीर निघे ना. अगदीं निकराचा प्रसंग आहे आतां. तिनें परत बटणावर जोरानें बोट दाबलें, आणि ती घंटा आंत सारखी घणघणत राहिली....

अखेरीस दाराचा बोल्ट वाजला आणि दार अर्धवट उघडलें गेलें. त्याबरोबर दाराशीं तोंड नेऊन ती अधीरपणें कुजबुजली :

“ मी ती. मी झिन्नत! ”

फैय्याझनें दार साफ उघडलें.

“ तुम्ही...तुम्ही, झिन्नतबी? माझी...छे...माझी नव्हती कल्पना तुम्ही इथें याल अशी...पण माफ करा हं मला, माझा हा पोशाक”...फक्त एक मुंडेछाट पैरण त्यानें आंगांत अस्ताव्यस्तपणें अडकवली होती.

“ थोडं बोलायचं आहे मला तुझ्याजवळ. अतिशय जरूरीचं आहे तें. तुझी मदत हवी आहे मला.” धापा टाकीत ती म्हणाली. “ तिकडे आंत येऊं दे मला जरा. कांही फार नाहीं वेळ लावणार मी.”

"पण...थोडा कामांत...म्हणजे काय थोडी..."

"तें कांहीं नाहीं. माझं हें एवढं ऐकलंच पाहिजे तुला; कारण तुझाच दोष आहे सारा तो. तुझं कर्तव्यच आहे मला मदत करण्याचं; अगदीं केलीच पाहिजेस ती तूं. माझी ती आंगठी दे आणून परत. नाहीं तर, निदान तिचा पत्ता तरी...जिथें जाईन तिकडे जशी पाठ धरली आहे माझी त्या बयेनं...आणि आत्तां हवी आहे, तेव्हां भेटत नाहीं आहे मेली! झालंच पाहिजे एवढं हें — काय म्हणतें आहें मी — केलंच पाहिजेस तूं हें एवढं माझ्यासाठीं..."

आश्चर्यानें चकित होऊन तो तिच्याकडे नुसता पहात होता.

"असं!" झिन्नत पुढें म्हणाली, "कांहीं माहीत नाहीं असं ढोंग चालवलं आहे वाटतं आतां! मग ऐक तर. आपलं आधींचं प्रेमपात्र हो तें, मी म्हणतें आहे तें. माझ्या पाळतीवर होती वाटतं ती बया...आणि अशी सारखी छळते आहे मला त्या दिवसापासून, दमदाटीनें पैसे उकळून — पण त्याचा आतां सोक्षमोक्ष लावायचा निश्चय केला आहे मी. विटलें अगदीं जीवाला...माझी ती आंगठी मला परत हवी आहे...अगदीं शिकस्त म्हणजे दिवे लागण्यापूर्वी... करशील ना एवढं तूं? सांग मला तिचा पत्ता..."

"पण झिन्नतबी..."

"अं हं! एकच; होय कीं नाहीं तें सांग फक्त."

"पण मला खरंच माहीत नाहीं तुम्ही कोणाविषयीं बोलतां तें. असल्या बदमाषांबरोबर माझा कधींच संबंध नव्हता..."

"तुला' नाहीं माहीत? सारं खोटं, अगदीं मनचंच सांगितलं तिनें? आणि माझा नांव गांव पत्तासुद्धां तिला माहीत! हा उकळा

उकळीचा धंदाहि नसेल तिला माहीत, नाहीं ? माझ्याच मनचे आहेत सारे हे पोरखेळ, होय ?"

ती विलक्षणपणें हांसली. तिच्या डोळयांतील ती चमक पाहून फैय्याझला भीति वाटली. हिला वेड तर नाहीं लागलं ? तिच्याकडे तो अस्वस्थपणें पहात होता.

"थोडया शांत व्हा, झिन्नतबी. चूक होते आहे तुमची कांहीं तरी. पण तुम्हांला असं कां वाटावं...छे ! अशी कोणी बाई नाहीं माझ्या ओळखीची...इथें आल्यापासून...आणि तुम्हांला माहीतच आहे तें — एक तुमचीच काय ती...खरंच खुदाची कसम...चूक होते आहे तुमची कांहीं तरी..."

"म्हणजे याचा अर्थ तूं मदत नाकारतोस, असाच करायचा ना मीं?"

"नाहीं, तसं नाहीं. तयार आहें मी काय शक्य तें करायला."

"बरं तर मग. आपण तिच्या मकाणांत जाऊं या......"

"कुणाच्या मकाणांत ?" त्यानें विचारलें आणि खरंच तिला वेड लागलं कीं काय अशी त्याला भीति पडली.

"त्या बयेच्या मकाणांत. यायचं आहे कीं नाहीं तुला ?"

"अलबत, अलबत. तुमच्यासाठीं काय लागेल तें..."

"ठीक तर. तूं ओळखलं असशील आतां, कीं माझ्यापुरता तरी निकराचा प्रश्न आहे हा अगदीं."

फैय्याझला आपलें हांसें आवरत नव्हतें. पण मग मोठ्या आदरानें तो म्हणाला :

"पण झिन्नतबी, आत्तांपुरतं माफ करा मला; दुसऱ्या कामांत आहें मी...एक शिकवणी आहे चालू...जरा कठीण आहे आत्तां..."

" आतां मात्र कळस झाला हं ! अशी या तऱ्हेनें चालली आहे होय शिकवणी ! शीः ! पक्का लफंगा आहेस तूं..."

पण मग एकदम कांही तरी स्फूर्ति झाल्यासारखी त्याला ढकलून ती आंत शिरली.

" इथेच असेल ती जथा रहात आणि दोघंहि खेळतां आहांत हा डाव, नक्की. अगदीं निर्मेनिम करतां कीं नाहीं बांटणी ? पण मी आतां पिच्छाच पुरवणार आहें याचा. भीतिबीती कांहीं नाहीं आतां..."

फैय्याझनें तिला अडविण्याचा प्रयत्न केला. पण त्याचा हात हिसडून झिन्नत त्याच्या शयनगृहाकडे वळली.

तिच्या येण्याबरोबर कोणी तरी घाईघाईनें तिथून निघून गेलें. कानोसा घेत उभं होतं कोणी तरी. त्या स्त्रीच्या विस्कळलेल्या वस्त्राकडे झिन्नतची दृष्टि गेली. पण तिला हवी असलेली ती स्त्री नव्हती.

" माफ कीजिये ! " झटकन मागें फिरून ती म्हणाली. " सचमुच, माफ कीजिये...मी सांगेन सारं उद्यां. खरं म्हटलं म्हणजे — पण मला कांहीं समजत नाहीं — अगदीं गोंधळून गेल्यें आहे मी... "

एकाद्या अपरिचितासारखी ती फैय्याझशीं बोलत होती. एका काळचीं हीं लैला मज्नु असतील, असं कोणीहि म्हटलं नसतं त्या वेळीं. तिचं मस्तक भ्रमत होतं. कोणी तरी एक खोटं बोलतं आहे खास. पण ती अतिशय श्रांत झाली होती; तिच्यांत विचारसुद्धां करण्याची ताकद नव्हती; समोरचंसुद्धां ती कांहीच पाहूं शकत नव्हती. तिनें डोळे मिटून घेतले आणि वधस्तंभाकडे चाललेल्या एखाद्या कैद्यासारखी जडपणें पायऱ्या उतरून ती खालीं आली.

— बाहेर रस्त्यावर काळोख पसरला होता. रस्त्यावर नसेल ना ती आपली वाट पहात ? इथेंच जवळपास नसेल का कांहीं मुक्तीचें साधन ? येईल का तो पतितपावन माझ्या साहाय्याला धावून ? जर थोडी एक-दोन महिन्यांची उसंत मिळाली...तर दूर दूर तिकडे आपल्या खेड्या-वर जाऊं आपण. मग त्या हिरव्यागार, मऊ गवताळ कुरणांतून धाव-तांना त्या भरघोस द्राक्षांच्या मळ्यांत, तेवढीच जरा सुटका...तिनें हळूच खालीं वर, इकडे तिकडे रस्त्यांत पाहिलें. तिकडे रस्त्यापलीकडे त्या दारांत कोणीतरी छपत होतें....पण जरा पुढें गेल्याबरोबर ती व्यक्ति अदृश्य झाली. एक क्षणभरच तिला तो आपला अझीझसें वाटलें. आत्तां आपल्या या असल्या स्थितींत जर पडली त्याची गांठ — किती भयंकर...ती स्तब्ध उभी राहिली आणि तिनें त्या दिशेनें नीट निरखून पाहिलें. पण त्या काळोखांत कांहींच दिसत नव्हतें. तिनें परत पाऊल उचललें. पण आपला पाठलाग कोणी तरी करीत आहे, पाठीशीं कट्यार अगदीं भिडली आहे, असें सारखें तिला वाटत होतें. मधूनच ती मागें वळून पाही, पण कोणी चिटपांखरूंहि तिच्या आसपास फिरकत नव्हतें.

'मादन ड्रग स्टोअर' — शिरत आंत जाऊन तिनें काउंटरवरून प्रिस्क्रिप्शन् आंत सारलें. सभोंवार फळ्यांवरून नि कपाटांत रांकेनें पसरलेल्या त्या लहानमोठ्या लेबल लावलेल्या बाटल्या, तो ताजवा सारें कांहीं तिला स्पष्टपणें दिसत होतें. समोर भिंतीवरील घड्याळ संथपणें टिक् टिक् आवाज करीत प्रवास करीत होतें. आणि सारीकडे औष-धांचा तो उग्र, ओंगळ दर्प जसा उतू जात होता. तिला आपल्या लहानपणची आठवण झाली. किती हौशीनें त्या वेळीं आपण अशा

दुकानांत येत असूं. आणि त्या रंगीबेरंगी बाटल्यांची नि तिथे पसर-लेल्या ऊग्र दर्पाची आपल्याला किती हौस वाटायची ! आणि आतां अशी आईची आठवण झाल्याबरोबर, आपण तिचा निरोप घेतला नाहीं याची जाणीव तिला अतिशय व्यग्र करूं लागली. किती वाईट वाटेल बिचारीला ! पण तो दुकानदार आतां तिचें औषध निळया बाटलींत ओतीत होता...एक टीचभर बाटली, पण जलाल मृत्यु !... कसं सळसळत जाईल नसानसांतून...तिचें सर्वांग शहारलें. भारल्या-सारखी, बूच लावीत असलेल्या त्या बोटांकडे टक लाऊन ती पहात होती. पॉयझनची लाल चिठी त्यानें बाटलीवर आतां डकवली नि बूच लावून ती कागदांत नीट गुंडाळून, त्यानें रॅपिंग सील करून बंद केलें. तिचें सर्वांग पार बधिर झालें. पुढचा तो नुसता विचार...

" दोन रुपये सहा आणे, " काउंटरवरून शब्द आले.

झोंपेतून एकदम जागी झाल्यासारखी झिनत दचकली. तिनें सभों-वार स्तिमितपणें पाहिलें नि पिशवी उघडून पैसे टेबलावर ठेवले.

तिचा हात कोणीतरी मागें ओढला आणि काउंटरवर कोणीतरी पैसे फेंकले. कोणाच्या तरी हातानें ती बाटली पण उचलली.

तिनें मागें वळून त्या आगंतुक व्यक्तीकडे टक लावून पाहिलें. आपले ओठ घट्ट आवळून अझीझ तिच्या समोर उभा होता. त्याचा चेहेरा हिरवानिळा झाला होता आणि कपाळावर घर्मबिंदू चमकत होते.

तिच्या डोळयांपुढें अंधारी आली आणि काउंटरचा आधार घेऊन तिनें स्वतःला जरा सावरलें. त्या दाराच्या सावलींत लपतछपत अस-लेला तो अझीझच होता तर; आणि आपल्याच पाळतीवर आहे तो मग !

"चला आतां," तो तुटक स्वरांत म्हणाला.

आणि मुलींसुद्धां कूरकूर न करतां अगदी निमूटपणें त्याच्या मागोमाग ती बाहेर कशी पडली, याचें तिलाच आश्चर्य वाटलें; आणि आपण काय करतों आहोंत याची नीट जाणीवहि न होतां त्याच्या बरोबर ती चालूंहि लागली. वाटेंत तीं एकमेकांकडे पहात नव्हतीं. ती बाटलीपण अजून अझीझच्याच हातांत होती. फक्त एकदांच कपाळावरचा घाम पुसण्यासाठीं तो थोडा थांबला. तीहि त्याबरोबर आपोआप न कळतच थांबली. तरी त्याच्या चेहेऱ्याकडे पाहण्याचा धीर तिला अजून होत नव्हता. तीं कोणी एक शब्दहि उच्चारीत नव्हतीं. पण रस्त्यावरील आवाजांच्या लाटा मात्र त्यांच्या आवतींभोंवतीं खालीं वर होत होत्या.

दारांतून तिला प्रथम आंत जाऊं देण्यासाठीं तो बाजूला झाला. पण त्याचा आधार सुटल्याबरोबर तिचें पाऊल लटपटलें. त्यानें झटकन आपला हात तिच्याभोंवतीं लपेटला. पण त्या स्पर्शाबरोबर तिचें सर्वांग संकोचलें आणि तिनें गडबडीनें दारांतून आंत पाऊल टाकलें. ती आपल्या खोलींत पोंचली आणि अझीझचें पाऊलहि तिच्या मागोमाग आंत पडलें. आंत स्पष्ट कांहींच दिसूं शकत नव्हतें. अजूनहि त्यांनीं कोणी एकमेकांशीं अक्षरहि उच्चारलें नव्हतें. अझीझनें बाटलीवरील वेष्टन टरकावलें, बाटली बाहेर रिकामी केली आणि ती रिकामी बाटली, जोरानें दूर भिरकावली. फुटणाऱ्या कांचेच्या खळ्ळकन झालेल्या आवाजानें झिन्नतच्या आंगावर शहारे आले.

आणि तरीहि अजून त्यांनीं मौन धरलें होतें. अखेरीस तो तिच्याजवळ—अगदीं जवळ सरकला. त्याचा येणारा जड श्वास तिच्या आतां

चांगला ध्यानांत येत होता. आगामी वादळाच्या पहिल्या कडाडण्याची ती स्वस्थपणें वाट पहात होती. आणि त्याच्या हाताची पोलादी घट्ट पकड तिला जाणवल्याबरोबर तिचें सारें अवसान गळलें. पण तरीहि अजून तो स्तब्ध होता. आणि तिच्या मग एकदम ध्यानांत आलें कीं तिच्या आंगाचा थरकांप करणारा कठोर अझीझ तेथें नसून तिचा पूर्वीचा प्रेमळ अझीझ तेथें आतां उभा होता.

" झिन्नत, किती दिवस असं छळायचं आपण एकमेकांना ? "

झालं. गेल्या कित्येक दिवस कोंडलेल्या तीव्र मनस्तापांचा बंधारा फुटून कोलमडून आतां पार वाहून गेला; आणि झिन्नतचे हुंदके जोरानें बाहेर फुटले. आंतून खळाळून बाहेर पडणाऱ्या हुंदक्यांच्या त्या विलक्षण आवेगानें झिन्नत हतबल होऊन खालीं कोसळली. पण अझीझनें आपल्या बळकट बाहुपाशांत तिला झटकन सावरलें.

" झिन्नत, झिन्नत ! " तिला आश्वासित तो पुटपुटला.

हळुवारपणें तिला कुरवाळीत नि हळुहळू तिच्या कानाशीं कळवळून कुजबुजत, आपल्या प्रेमाच्या आवेगी आविष्कारानें तिच्या प्रक्षुब्ध, खवळलेल्या मनोवृत्तींना तो आतां जणुं निववीत होता. पण झिन्नतच्या ओठांतून उत्तरादाखल एक अक्षरहि बाहेर फुटत नव्हतें. मनःक्षोभाचे येणारे कढावर कढ तिला हतबल करून त्याच्या बाहुपाशांत ती नुसती असहायपणें स्फुंदत, मुसमुसत आपल्या आवेगाला बाहेर वाट काढून देत होती. अझीझनें तिला तशीच उचलून कोचावरील मऊ मखमली ऊबदार गादीवर नेऊन निजविलें. पराच्या गुबगुबीत गिरद्या तिच्याभोंवतीं सारल्या नि मऊ रगानें तिचें आंग त्यानें पार लपेटून टाकलें. पण तिचे हुंदके अजून थांबले नव्हते. त्या हुंदक्यांनीं तिचें शरीर जसें हादरत होतें आणि आंगाला कंप सुटला होता.

त्यानें तिचे हात आपल्या हातांत घट्ट धरले आणि अत्यंत आवेगानें त्यानें तिच्या मिटलेल्या डोळ्यांवर, मुखावर नि मऊ कुरळ्या केसांवर चुंबनांचा वर्षाव केला. तिच्या गालांवरून अश्रू खालीं पाझरत होते आणि मस्तकावरील शिरा जशा ताडताड उडत होत्या. अझीझ आतां अस्वस्थ होऊं लागला. तिच्या कोचाजवळ खालीं बसून नि आपलें तोंड तिच्या अगदीं जवळ नेऊन तो कुजबुजला:

" झिन्नत, प्यारी झिन्नत, असं काय बरं आतां? झालं, संपलं सारं तें! आतां नको त्रास करून घेऊं असा. कध्धीं कध्धीं परत नाहीं येणार, बघ आतां ती..."

परत एकदां बाहेर फुटणाऱ्या हुंदक्यांनीं तिचें शरीर हादरलें. पण त्यानें आपले हात तिच्या भोंवतीं लपेटून तिला आतां हृदयाशीं घट्ट धरलें होतें. तिच्या त्या शोकावेगानें तो अस्वस्थ झाला होता नि स्वतःची तो निर्भर्त्सना करीत होता. परत आवेगानें तिच्या मुखाचें त्यानें चुंबन घेतलें. आणि तरीहि अतृप्ततेनें तसेच ओठाशीं ओठ लाऊन तिच्याशीं कांहीतरी असंबद्धपणें तो कुजबुजत होता:

" नाहीं, प्यारी! आतां नाहीं कधीं. अगदीं अल्लाची कसम, परत नाहीं कधीं तुला तोंड दाखवणार ती. एवढी तूं अशी घाबरून जाशील अशी मला कशी बरं यावी कल्पना? पण त्याचा नाद सुटून आपल्या प्रेमाच्या संसारांत, आपल्या लाडक्या मुलाबाळांत तूं परत रमावीस एवढाच होता माझा हेतू. कर्तव्याची नुसती जाणीव तुला करून द्यायची होती मला. किती हवी आहेस तूं आम्हां साऱ्यांना, झिन्नत! माझा तरी काय बरं होता दुसरा इलाज? स्पष्टपणें कसं बरं हें सारं बोलतां आलं असतं मला? आणि लौकरच उमजेल तुला तुझी चूक,

असं वाटलं होतं मला. पण मग तुला असा भीति घालण्याचा केला उपाय झालं. कारण मला मुळीं धीरच निघत नव्हता. तिनें सुद्धां अगदीं नाइलाजानें केली माझी कामगिरी. पण आतां कळते आहे माझी मला चूक. पण मी तरी काय करूं झिन्नत — किती किती हवी होती माझी झिन्नत मला ! आणि किती तरी वेळां मी — स्पष्ट-पणें, अस्पष्टपणें माझी सारं विसरायची तयारी तुला दाखवली. पण तुझ्या नाहीं तें नीट ध्यानांत आलं. खरंच झिन्नत, मला खरीच कल्पना नव्हती इतक्या निकरावर हें येईल अशी. पण मीसुद्धां थोडा का मन-स्ताप सोसला — असा रोज तुझ्यावर क्षणाक्षणाचा पहारा...आणि दुसऱ्या कशापेक्षां आपल्या त्या बच्च्यांसाठींच मला तूं जास्त हवी होतीस. जाऊं दे पण तें आतां...आतां होईल सारं नीट...''

दुरून — तिकडून कुठून अनंतांतून आल्यासारखा, त्याचा आवाज तिच्याकडे तरंगत येत होता आणि तो काय सांगतो आहे याची तिला पुरी कल्पनाहि येत नव्हती. तिच्या अंतरंगांत जसे कल्लोळ उसळले होते; सर्व विचारांना नि भावनांना जशी बधीरता आली होती. आणि तरीहि त्याचा तो आवेगी ओष्ठस्पर्श तिला सुखवीत होता. तिच्या केसां-वरून हळुवारपणें फिरणाऱ्या हातांचा स्पर्श नि गालांवर ओघळणारे अश्रु तिला अंधुकपणें समजत होते. तिच्या अंतरंगांतून जणुं अनंत घंटांचा नाद घणघणत होता. नि मग सर्व कांहीं शांत झालें ..ती जागी झाली. कोणी तरी हलक्या हातानें आपल्या अंगावरील कपडे सैल मोकळे करीत आहेसं तिला वाटलं. तिनें डोळे उघडले. अझीझ तिच्याकडे अस्वस्थपणें पण कळवळून पहात आहेसें तिला दिसलें. आणि परत एकदां तिच्या भोंवती विस्मृतीचा घनदाट काळोख पसरला.

पण आतां ती निद्रेची सुखद नि शांतिदायक लाट तिच्या भोंवतीं पसरली होती.

सकाळीं चांगलें फटफटीत उजाडल्यावर ती जागी झाली. तिच्या अंतरंगांतहि सूर्यप्रकाशाचे झोत पसरले होते. तुफानानंतरची नितांत शांतताच जशी तिथे आतां विलसली होती. आदल्या रात्रीचे प्रसंग डोळ्यांसमोर ती उभे करून पहात होती. पण तिला सर्व कांहीं धुक्यानें भरल्यासारखें दिसत होतें. स्वप्नांत वावरल्यासारखे आपण हवेंत जसे तरंगत, हेलावत आहोंत असें तिला वाटलें. आणि या जड सृष्टींत पाऊल टाकण्यासाठीं आपलें सर्वांग तिनें चांचपलें.

— आणि हें काय? ही आंगठी तर बोटांतच आहे...तिला आतां खरी पूर्ण जाग आली. सर्व कांहीं आतां सुसंगत, स्पष्ट, अर्थपूर्ण असें तिला दिसूं लागलें. वीज चमकल्यासारखा, साऱ्या गोष्टींवर आतां पुरा प्रकाश पडला: अझीझचे ते प्रश्न नि फैय्याझचा तो गोंधळ... ढगांचा घनदाट काळा पडदा हलकेच दूर होत होता आणि तिच्या सभोंवतीं पसरलेलें तिला पकडणारें जाळें तिला मग स्पष्ट दिसूं लागलें. कांहींशा लाजेनें आणि मनोवेदनेनें ती अगदीं व्याकुळ झाली. तिचें आंग शहारलें आणि तिची ही जागृती तिला दुःखदायक वाटली. यापेक्षां ती यातनाविरहीत, अगदीं स्वप्नसुद्धां नसलेली गाढ झोंप, किती शांत नि सुखदायक होती! ...

बाहेरून मुलांचा आवाज आंत आला. सकाळच्या सूर्यनारायणाला सामोरें जाणाऱ्या आनंदी पांखरांसारखा त्यांचा किलबिलाट चालला होता. शरफूचा आवाज हा. पण तो हुबेहूब अझीझसारखा होता हें

आजच तिच्या ध्यानांत येत होतें. ती प्रसन्नपणें मंद हांसली; आणि आपल्या जीवनांत आनंद विखरणाऱ्या नि तें सुखमय करणाऱ्या साऱ्या गोष्टींचा अधिक निर्वेधपणें मनसोक्त उपभोग घेण्यासाठीं तिनें परत डोळे मिटले.

तरी दुःखाचें एक बारीक सल अजून आंत सलत होतें. पण आतां भरत आलेल्या जखमेच्या नुसत्या वेदना आहेत त्या; अधिक कांहीं नाहीं. आणि होतील, त्याहि पण लौकर पूर्ण — कायमच्या बऱ्या होतील; तिचं मन तिला ग्वाही देत हुंकारत होतं !

म. ग्रं. सं. ठाणे, वाचनालय शाखा.
क्र. २५५५ नों दि ..........
दि .......... ..........
IRBK-0102585
IRBK-0102585